# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १७/२०१२** **दिनांक ०८.१०.२०१२**
**स्थळ - जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- सायंकाळी ०६.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा सोमवार दि.०८.१०.२०१२ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-३०२०-२०१२, दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१२ रोजीचे फॅक्स पत्रान्वये सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा सोमवार दि.०८.१०.२०१२ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, सदस्य
०३. श्री.किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ०५.०९.२०१२ रोजी मा.जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.८००** दिनांक ०५.०९.२०१२ रोजी मा.जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**(०१) समाधी मंदिर परिसर व जुन्या प्रसादालय परिसरात साईभक्तांसाठी दर्शनरांग व इतर अनुषंगिक सुविधा निर्माण करणेकामी सादरीकरण- सादरकर्ता आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे, पुणे.**

मा. त्रिसदस्य समितीचे दि.२९/०७/२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या सभेपुढे आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे, पुणे यांना दर्शन रांग प्रकल्पासाठी सादरीकरण करणेस बोलविणेत आले होते. त्यावेळी झालेल्या निर्णयानुसार आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे यांना मा.त्रिसदस्य समितीचे आजचे सभेपुढे सादरीकरणासाठी पाचारण करण्यात आले आहे. आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे, पुणे यांनी सदर प्रकल्पासाठी तयार केलेल्या संकल्पनात्मक नकाशात दर्शविल्यानुसार समाधी मंदिरात एका तासाला जास्तीत जास्त १०,००० साईभक्त दर्शन घेवू शकतात ही बाब ध्यानात घेवून दर्शन रांग इमारत डिझाईन करण्यात आलेली आहे. प्रस्तावीत सादरीकरणातील काही ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत.

०१. जुने प्रसादालय परिसरात नविन दर्शनरांग इमारत प्रस्तावीत करताना साईनिवास गेस्ट हाऊस व सुलभ शौचालयाची इमारत तशीच ठेवलेली आहे.

०२. नियोजीत दर्शन रांग इमारतीचे प्रवेशव्दाराजवळ साईभक्तांना मोबाईल व शुज ठेवेणसाठी व्यवस्था करणेत आली आहे. सात स्वतंत्र काउंटरवर साईभक्त सहजतेने आपल्या चप्पल, बुट व मोबाईल जमा करु शकतात. सदर इमारतीच्या तळघरात ०.४x०.४x०.५ मीटर मापाचे एकूण २१६०० लॉकर्स सदर वस्तु ठेवणेसाठी बनवता येतील. तसेच मंदिरातून परत आल्यावर इमारतीचे दक्षीणेकडून स्वतंत्र ठिकाणाहून भक्तांनी जमा केलेल्या वस्तु घेता येतील.

०३. शुज व मोबाईल जमा केल्यावर ४५ स्वतंत्र चेकींग पॉईंट वरुन साईभक्तांची चेकींग करुन त्यांना इमारतीचे मुख्य हॉलमध्ये सोडणेत येईल.

०४. इमारतीचे मुख्य हॉलमध्ये साईभक्तांकरीता बाथरुम टॉयलेटची व्यवस्था तसेच अल्पोपहार व जलपानाची व्यवस्था करणेत आली आहे.

०५. मुख्य हॉलमधून स्वयंचलीत शिडीच्या सहाय्याने पहिल्या मजल्यावरील दर्शन रांगेपर्यंत पोहचविण्यात येईल.

०६. पहिल्या मजल्यावर प्रत्येकी १६०० साईभक्त सामावतील असे ०३ हॉल असतील तसेच १६०० साईभक्तांचे क्षमतेचा एक buffering हॉल असेल. त्याच प्रमाणे दुसऱ्या मजल्यावर १६०० साईभक्त सामावतील असे ०४ हॉल असतील.

०७. प्रत्येक हॉल मध्ये पुरूष व स्त्रियांकरीता टॉयलेट्स असतील तसेच एका भव्य स्क्रिनवर मंदिरातील Live दृष्ये प्रदर्शीत केली जातील.

०८. प्रत्येक हॉल एका कॉरीडॉरला जोडलेला असेल त्यातून समाधी मंदिराकडे दर्शन रांग लावली जाईल. सदरची दर्शन रांग अभिनेता मनोज कुमार गोस्वामी रस्त्याला समांतर एका स्काय वॉक व्दारे मंदिर परिसरात प्रवेश करेल.

०९. सध्या मंदिर परिसरात काहीही बदल सुचविलेला नाही.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे यांचे सादरीकरण पाहून मा.त्रिसदस्यीय समितीने त्यांना खालील बाबींचा समावेश करणेबाबत सुचना केल्या.**

**१. शुज स्टॅण्डजवळ शुज काढणेकरिता बसण्याची व्यवस्था करावी. तसेच साईभक्तांचे शुज ठेवणे व परत देणेसाठी मेकॅनाईज्ड यंत्रणा असावी.**

**२. समाधी मंदिर परिसरातील ऐतिहासीक वास्तु व्यतिरिक्त इतर इमारती काढून परिसर मोकळा करणेत यावा.**

**३. दर्शन रांग इमारतीचे चौथ्या मजल्यावर संस्थान कार्यालये करावीत. तसेच त्यांची वाहने पार्किंग करीता तळघरात व्यवस्था करावी.**

**४. मंदिर परिसरात व जुने प्रसादालय परिसरात चालणाऱ्या इतर गतीविधी उदा. देणगी काऊंटर, कापड कोठी, उदी प्रसाद, पुस्तक विक्री केंद्र, लाडू काऊंटर व प्रथमोपचार केंद्र इ. करीता स्वतंत्र व सुनियोजित व्यवस्था करणेत यावी.**

**आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे, पुणे यांनी नकाशात वरीलप्रमाणे सुधारणा करुन मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करावेत, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**(०२) साईगार्डन प्रकल्प व जलसंपदा विभाग बांधकामे ठेकेदार मे. के. आर. आर. इन्फ्रा प्रोजेक्टस् (प्रा) लि., हैद्राबाद यांचे विनंतीबाबत.**

साईभक्तांच्या सोयी-सुविधेसाठी मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील संस्थान मालकीच्या गट नं. १९८, १९९, २०० व २०१ मधील एकुण २० एकर जमिनींमध्ये साई गार्डन प्रकल्पामधील सिव्हील कामांपैकी पहिल्या टप्प्यातील लेजरशोकरिता आवश्यक असणारे वॉटरबॉडी, प्रेक्षागृह व इतर अनुषंगिक सोयी-सुविधा (कार्यालय, नियंत्रण कक्ष, प्रसाधनगृहे, संरक्षक भिंत आदि) चे बांधकाम करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०७/२०११ चे सभेतील निर्णय क्र. ४९६ अन्वये ५.४७% कमी (रु. ३०,९५,२७,८६६/-) दराची निविदा ठेकेदार मे. के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्टस लि. हैद्राबाद यांची स्विकारणेत येऊन, त्यांना इकडील जा. क्र. २१८२/२०११ दि. ०१ ऑगस्ट, २०११ रोजीचे पत्रान्वये कार्यादेश देणेत आला होता. तसेच जलसंपदा विभागासाठी मौजे निमगांव-कोऱ्हाळे येथील गट नं. ८७,८८ पैकीमध्ये इमारती बांधकामासाठी जा. नं. २१७९/२०११ दिनांक ०१ ऑगस्ट, २०११ चे पत्रान्वये कार्यादेश देणेत आला होता.

ठेकेदार यांना काम करणेस वारंवार संधी देवूनही सदरचे काम करणेस ते असमर्थ ठरल्याने मा.त्रिसस्य समितीचे दि.०६/०४/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५५ व ३५६ अन्वये सदरहू प्रकल्पाचे आर्किटेक्ट यांचेमार्फत दि. १५/०४/२०१२ रोजीचे पत्राने ठेकेदार यांना अंतीम नोटीस देवून काम पूर्ण क्षमतेने सुरु करणेस कळविले होते. परंतू ठेकेदार यांनी साईटवरील काम सुरु केलेले नाही. त्यानुसार साई गार्डन प्रकल्पाचे आर्किटेक्ट मे. माथूर ॲण्ड काप्रे यांनी ठेकेदार यांना संस्थानचे वतीने A-५२३/११-१२/UK/१८, दि.०१/०६/२०१२ अन्वये Termination letter दिलेले आहे. तसेच जलसंपदा विभाग बांधकाम प्रकल्पाचे आर्किटेक्ट सुरेश बाबु ॲण्ड पार्टनर्स, मुंबई यांनी दिनांक १४ जून, २०१२ रोजीचे पत्राव्दारे ठेकेदार यांना " Final Notice of Termination" दिले आहे.

तद्नंतर दिनांक १८ जून, २०१२ रोजी ठेकेदार यांचे प्रतीनिधी श्री. अनिल रेड्डी, कार्यकारी संचालक व श्री. जी. एस. राव,जनरल मॅनेजर यांनी मा. कार्यकारी अधिकारी साो व वरिष्ठ मुख्य अभियंता यांची भेट घेतली व सदरची कामे पुनःश्च सुरु करणेस एक शेवटची संधी मिळावी म्हणून विनंती केली. तसेच या करीता त्यांनी खालील प्रमाणे पुनःर्नियोजन केले असल्याचे त्यांनी दिनांक २० जून, २०१२ रोजीचे पत्राने कळविले.

01. Shuttering material of 25000 sq.ft. will be deployed within 10 days i.e. on or before 29 June 2012.
02. Providing additional required Office areas will be done within 15 days.
03. Providing extra Lab Equipment and personnel for Lab as per site demand will be done by 10th July 2012.
04. Cement of 100 MTs is alredy ordered and will be available on site by 27th June 2012.
05. Reinforcement steel of 150 MT will be procured before 29th June 2012.
06. We have opened our company's Bank Account at Shirdi and we would be transferring funds to the tune of Rs. 2.50 Crs for this project and this will be done before 23rd June 2012.
07. Mobilzation of Labour to the extent of 150 nos. will be done by 10th July 2012.
08. We will be handing over water body within 60 days positively.
09. To recruit or appoint fresh personnel at site i.e.
    1 No. Project Manager.
    2 No.s Senior Engineers and
    6 No.s Junior Engineers along with the administrative staff.
10. Modified Organizational chart as per the requirement for the project will be submitted.

11. Provide additional required office areas for staff, PMC and Sansthan personnel.
12. All the copies of required licenses will be furnished.
13. Additional safety equipment for staff and labour will be provided as per site demand.
14. Additional storage areas are build up as per the requirements.
15. Fresh work force of skilled and un-skilled will be deployed separately for the following works which
    Are bifurcated in to:
    a. Main stadium
    b. Water body
    c. Compound wall
    d. Quarters and office areas for staff.

उपरोक्त नमूद बाबींपैकी ठेकेदार यांनी एकाही बाबीची पूर्तता केली नाही, व सदर काम पून्हा सुरु करणेबाबत सकारात्मक प्रतीसाद दिला नाही. त्यामुळे ठेकेदार यांना संस्थानचे दिनांक २३ जुलै, २०१२ रोजीचे पत्राने, मा. कार्यकारी अधिकारी सो। यांचेकडे बैठकीसाठी बोलविणेत आले. त्यानंतर ठेकेदार यांचे प्रतीनिधी श्री. जी. एस. राव यांनी दिनांक २४ जुलै, २०१२ रोजीचे पत्राने त्यांना काम करतेवेळी आलेल्या अडचणींचा उहापोह करुन पुढे काम करणेसाठी ११ महिन्यांची मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली.

तथापी ठेकेदार हे काम सुरु करणेस असमर्थ ठरल्याने साईगार्डन व जलसंपदा विभाग बांधकामाबाबत ठेकेदार यांना अनुक्रमे जा. नं. २०२४ दिनांक ०६ ऑगस्ट, २०१२ व जा. नं. २०१० दिनांक ०४ ऑगस्ट, २०१२ अन्वये त्यांनी केलेल्या कामाची संयुक्त मोजमापे घेणेकामी प्रतीनिधी पाठविणेबाबत कळविणेत आले. परंतू ठेकेदार यांनी वरिलप्रमाणे आर्किटेक्ट यांनी दिलेली " Final Notice of Termination" व संस्थानतर्फे वरिलप्रमाणे दिलेल्या पत्रास कुठलेही उत्तर अथवा प्रतिसाद दिला नाही.

उपरोक्त साईगार्डन प्रकल्पाकरीता फेर निविदा मागविणेसाठी आर्किटेक्ट यांचे मार्फत जिल्हा दरसूची (DSR) २०११-१२ नुसार सुधारीत अंदाजपत्रक व निविदा तयार करणेत आल्या आहेत. त्यानुसार साईगार्डन प्रकल्पाचे उर्वरीत कामांसाठी रुपये ३४,८७,७१,२८३/- मात्रचा अंदाजीत खर्च त्यांनी कळविला आहे. सदर कामासाठी यापूर्वी मागविणेत आलेल्या निविदेतील अंदाजपत्रकीय रक्कम रु.३२,७४,३८,५५५/- मात्र इतकी होती. म्हणजेच साईगार्डन प्रकल्पासाठी नव्याने निविदा काढल्यास जुन्या निविदा रकमेपेक्षा रु.२,१३,३२,७२८/- मात्र इतका अधिक खर्च येण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे जलसंपदा विभागाचे बांधकामांसाठी अंदाजे रु. ९४,५१,४५२/- मात्र इतका जादा खर्च येईल.

आता, ठेकेदार यांनी त्यांचेकडील दिनांक ०१ सप्टेंबर, २०१२ रोजीचे रोजीचे e-mail पत्रान्वये काम चालू करण्याचे दृष्टीने खालील प्रमाणे कळविले आहे.

०१. आजअखेर साईटवर २२४ टन स्टील पोहच झाले आहे.
०२. येत्या ०१ महिन्यात २०० टन स्टील मागविणेसाठी ऑर्डर दिलेली आहे.
०३. सध्या साईटवर ३५ कामगार काम करणेसाठी आलेले आहेत.
०४. लवकरच अतिरीक्त ११० कामगार उपलब्ध करणेत येत आहे.
०५. साईटवर १०००० चौ. फुट सेंटरींग मटेरियल आणले आहेत.
०६. आणखी १५००० चौ. फुट सेंटरींग मटेरियल उपलब्ध करणेत येत आहे.
०७. २००० मे. टन सिमेंट खरेदीसाठी ऑर्डर देणेत आली असून महाराष्ट्र सेल्स् टॅक्स विभागाकडून 'C' फॉर्म मिळाल्यानंतर त्वरीत सिमेंट उपलब्ध होईल.
०८. विषयांकीत कामे पूर्ण करणेसाठी स्वतंत्र टिम्स् नेमणेत आल्या आहेत.
०९. सध्या साईगार्डन येथील वॉटरबॉडीचे काम तिन आठवड्यात पूर्ण करुन लेजर व्हिजन लि., यांचे पुढील कामासाठी उपलब्ध करुन देऊ असे त्यांनी समक्ष चर्चेत सांगीतले आहे. तसेच जलसंपदा विभाग बांधकामासह इतर भागातील कामे दहा दिवसात सुरु करणेत येतील असे कळविले आहे.

वरिलपैकी साईगार्डन प्रकल्पाचे काम पूर्ण करणेसाठी देणेत आलेली मुदत दिनांक ०७ ऑगस्ट, २०१२ रोजी संपुष्टात आलेली असून, जलसंपदा विभागाचे बांधकामासाठीची मुदत दिनांक १४ नोव्हेंबर, २०१२ अखेर पर्यन्त आहे. लेजर व्हिजन यांचेमार्फत करावयाच्या लेजर शोचे इन्स्टॉलेशन कामासाठी साईगार्डन वॉटरबॉडी स्ट्रक्चर लेजर व्हिजन यांना लवकरात लवकर उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. ठेकेदार यांनी त्यांचेकडील दिनांक ०१ सप्टेंबर, २०१२ रोजीचे e-mail व्दारे सदरहू कामाचे त्यांचे Termination रद्द करुन येथून पुढे ११ महिने (ऑगस्ट, २०१३ अखेर) मुदतवाढ देणेस विनंती केली आहे. तसेच सदरचे कामासाठी निविदा शर्तीनुसार Price Variation Clause प्रमाणे दरवाढ मिळावी अशी विनंती केली आहे.

ठेकेदार के आर. आर. इन्फ्रा प्रोजेक्टस् प्रा. लि., हैद्राबाद यांना संस्थानतर्फे Terminate करण्यात आलेले आहे. त्यामुळे त्यांचे Termination रद्द करुन काम पूर्ण करणेसाठी त्यांना ऑगस्ट, २०१३ अखेर पर्यंत मुदतवाढ द्यावयाची झाल्यास कायदेशीर सल्ल्याने करारनामा इत्यादी आवश्यक पूर्तता करुन घ्यावी लागेल.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील बांधकामांसाठी आता नव्याने निविदा मागविल्यास प्रकल्पाचे खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच त्यासाठी किमान दोन महिन्यांचा कालावधी लागेल. या बाबी व साईगार्डन प्रकल्पाची तातडी विचारात घेता, ठेकेदार के.आर.आर. इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा.लि., हैद्राबाद यांचे Termination रद्द करुन, वरील बांधकामे पुर्ण करणेसाठी त्यांना तुर्त डिसेंबर, २०१२ अखेरपर्यंत मुदतवाढ देणेत यावी व त्यासाठी ठेकेदार यांचेकडून ते पुर्वीचेच निविदा दरात तसेच करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार वाढीव मुदतीत काम करुन देणार असलेबाबत हमीपत्र घेणेत यावे. डिसेंबर, २०१२ पर्यंतचे वाढीव मुदतीत त्यांच्या कामाची प्रगती पाहुन पुढील योग्य तो निर्णय घेणेसाठी प्रस्ताव सभेपुढे सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**(०३) सन-२०१२-१३ करीता साईआश्रम १ व २ विभागातील यांत्रीकीकरणासह हाऊसकिपींग, विदयुत, प्लबींग इ. मेन्टनन्स् कामाबाबतचे Successful Bidder (SB-१) यांचेबरोबर चर्चा/ वाटाघाटी करुन त्यावर अंतिम निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** दि.२५/०८/२०१२ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णयानुसार, साईआश्रम १ व २ साठीचे Successful Bidder (SB-१) मे. बी.व्ही.जी इंडिया लि.पुणे हे साईआश्रम १ व २ साठी पात्र ठरत आहेत.

तथापी, मे.बी.व्ही.जी इंडिया लि.पुणे यांनी देऊ केलेले मनुष्यबळ व यंत्र सामग्रीची संख्या संस्थानच्या गरजेपेक्षा जास्त आहे.त्यामुळे संस्थानला आवश्यक असलेले तेवढेच मनुष्यबळ व यंत्रसामग्री तसेच स्वच्छता साहीत्य पुरवून त्याबदल्यात दरमहाचे त्यांचे मागणी रक्कमेत किती रक्कम कमी करणार आहेत.याबाबत चर्चा करण्यासाठी त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे आमंत्रीत करण्यात आलेले असून त्याचेबरोबर चर्चा वाटाघाटी करुन हाऊसकिपींग कामाच्या प्रस्तावावर अंतिम निर्णयासाठी मा.त्रीसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयास्तव सादर.

**निर्णय-** दि २५/०८/२०१२ रोजी झालेल्या मा व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार सन २०१२-१३ करीता साईआश्रम १ व २ विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग मेन्टनेन्स् इ. कामाबाबतचे Successful Bidder (SB-१) मे. बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांना चर्चा वाटाघाटीसाठी आमंत्रीत करण्यात आले.

याकामासाठीच्या निविदा दि.२८/०३/२०१२ या दरम्यान भरुन आलेल्या असून त्यावेळेचे किमान वेतन दर हे आजच्या तारखेपुर्वी कमी होते.दि.०१/०७/२०१२ पासून सुधारीत किमान वेतन दरात वाढ झालेली आहे.असे मे. बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांचे प्रतिनिधी यांनी चर्चा / वाटाघाटीचे प्रारंभी सांगितले.

**साईआश्रम - १ साठी** मे. बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांनी दि. २९/०७/२०१२ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत दिलेले दराचा तपशील खालील प्रमाणे असुन,कपंनीने त्या एकूण दरामध्ये सर्व्हिस टॅक्स १०.३० % नमुद केलेला असुन त्यावेळी १२.३६ % असा झालेला होता. त्यामुळे १२.३६ % सर्व्हीस टॅक्स नमुद केल्यास दिलेल्या दरामध्ये रु. १,४२,६३९/- ऐवढे रक्कमेने वाढ होईल.

| मशिनरी व उपकरणे संख्या | मनुष्यबळ संख्या | B.V.G. ने दिलेले दर (१०.३० % सर्व्हिस टॅक्स) | १२.३६ % सर्व्हिस टॅक्स ने B.V.G. यांचे एकुण होणारे दर |
|---|---|---|---|
| २३९ | ५२५ | ७६,३७,५४१/- | ७७,८०,१८०/- |

आजच्या चर्चा वाटाघाटीमध्ये साईआश्रम - १ साठी २३९ मशिनरी देऊन, ४५०, ५०० व ५२५ मनुष्यबळासाठी आजमितीला लागु असलेले किमान वेतन दरानुसार व नव्याने लागु झालेले सर्व्हिस टॅक्ससह दरमहा किती रक्कम घेणार याबाबत मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांना विचारणा केली असता त्यांनी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे दर दिले आहेत.

| मशिनरी व उपकरणे संख्या | मनुष्यबळ संख्या | चर्चा वाटाघाटीच्या वेळेस दिलेले दर (१२.३६% सर्व्हिस टॅक्ससह) |
|---|---|---|
| **२३९** | **४५०** | **६४,२८,५७१/-** |
| | ५०० | ७१,४२,८५७/- |
| | ५२५ | ७५,००,०००/- |

**साईआश्रम २ साठी** मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांनी दि. २९/०७/२०१२ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये दिलेले दराचा तपशील खालील प्रमाणे असुन कपंनीने त्या एकूण दरामध्ये सर्व्हिस टॅक्स १०.३० % नमुद केलेला असुन, त्यावेळी १२.३६ % असा सर्व्हिस टॅक्स होता. त्यामुळे १२.३६% सर्व्हीस टॅक्स नमुद केल्यास दिलेल्या दरामध्ये रु. ९९,५००/- ऐवढे रक्कमेने वाढ होईल.

| मशिनरी व उपकरणे संख्या | मनुष्यबळ संख्या | B.V.G. ने दिलेले दर (१०.३०% सर्व्हिस टॅक्स) | १२.३६ % सर्व्हिस टॅक्स ने B.V.G. यांचे एकुण होणारे दर |
|---|---|---|---|
| ८६ | २८७ | ५३,२४,५२४/- | ५४,२४,०२४/- |

याकामासाठी चर्चा वाटाघाटीमध्ये साईआश्रम २ करिता संस्थानला आवश्यक असणारे १०८ मशिनरी / उपकरणे देऊन, १६५, १७५ व २०० मनुष्यबळासाठी आजमितीला लागु असलेले किमान वेतन दरानुसार व नव्याने लागु झालेले सर्व्हिस टॅक्ससह दरमहा किती रक्कम घेणार याबाबत मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांना विचारणा केली असता त्यांनी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे दर दिले आहेत.

| मशिनरी व उपकरणे संख्या | मनुष्यबळ संख्या | चर्चा वाटाघाटीच्या वेळेस दिलेले दर |
|---|---|---|
| **१०८** | **१६५** | **२२,३२,५००/-** |
| | १७५ | २५,३७,५००/- |
| | २०० | २९,००,०००/- |

OFFICE OF THE COMPTROLLER AND AUDITOR GENERAL OF INDIA- NEW DELHI, Tender No. 418/GS/5 - 2011 Dated 06 Septermber, 2011

**या कॅग नियमाअंतर्गत-**

9.2.3 A Bidder should secure mandatorily a minimum of 70% marks (i.e. 70 marks out of total 100 marks as per para 9.2.2.) in Techincal Evaluation in order to be a qualified bidder for being eligible for Technical weightage and subsequently for opening of financial bids.

**या कॅग नियमाअंतर्गत १०० गुणाला ७० गुण पडलेल्या निविदाधारक पात्र आहे. या नियमानुसार १३० गुणाला ९१ गुण पडलेले निविदाधारक पात्र राहतील.**

यानुसार खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे गुण देऊन, ९१ व त्यापेक्षा जास्त गुण असलेले एकच निविदाधारक मे. बी. व्ही. जी. इंडिया, पुणे हे असल्याने त्यांचेसह दि. २९/०७/२०१२ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर पात्र/ अपात्र निविदाधारकांचे प्राइस बीड उघडुन अपात्र निविदाधारक कंपनीचे कामाचा दर्जा, गुणवत्ता व त्यांचे व्यवस्थापन तपासणेकामी त्यांना सादरीकरणाची संधी देण्यात येऊन. त्यांचेसह मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर दराबाबत चर्चा / वाटाघाटी करण्यात आली होती.

| टेक्निकल स्कोअर | फायनाशियल स्कोअर | | एकुण गुण |
|---|---|---|---|
| | १ ते १२ इमारतीसाठी गुण | R - Block & Parking Area गुण | |
| ७० गुण | ३० | ३० | १३० गुण पैकी ९१ गुण पात्रतेसाठी आवश्यक |

या नियमावली नुसार साईआश्रम - १ व साईआश्रम - २ साठी खालील प्रमाणे गुणवत्ता नमुद केलेली आहे.

**अ) साईआश्रम - १**

| अ. नं. | निविदाधारकांचे नाव | १३० पैकी प्राप्त गुण ( ९१ व त्यापेक्षा जास्त गुण असल्यास पात्र) | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Technical Marks | Financial Marks | Total | | |
| | | | | पात्र | अपात्र | |
| १ | स्प्लेंडिड फॅसिलिटीज् मॅनेजमेंट (इ) प्रा. लि पुणे, | ११ | २९ | -- | ४० | १. निविदेतील अटी / शर्तीनुसार कंपनीची वार्षिक उलाढाल कमी असल्याने अपात्र. |
| २ | स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲण्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे | २७ | ५८ | -- | ८५ | १. निविदेतील अटी / शर्तीनुसार I.S.O. मानांकन नसल्याने अपात्र |
| ३ | स्पार्क्ल सर्व्हिसेस प्रा.लि. पुणे | ३७ | १८ | -- | ५५ | १.गुण कमी असल्याने अपात्र. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | कल्पतरु हॉस्पिटालीटी फॅसिलिटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा. लि. अंधेरी ( ई ) | ४२ | १४ | -- | ५६ | १. गुण कमी असल्याने अपात्र. |
| ५ | प्रॉपर्टी सोलुशन इंडीया प्रा. लि मुंबई | ४७ | ३० | -- | ७७ | १. गुण कमी असल्याने अपात्र. |
| ६ | ऑल सर्व्हिसेस ग्लोबल प्रा. लि. मुंबई | ७० | ०६ | -- | ७५ | १. सादरीकरण व चर्चा / वाटाघाटीचे वेळेस निविदेत नमुद केलेले मनुष्यबळ उपकरणे व साहीत्य याबाबतचे सादरीकरण व्यवस्थित सांगता आले नाही.<br>२. गुण कमी असल्याने अपात्र. |
| ७ | मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे | ८५ | ३८ | १२३ | -- | १. दि.०५/०९/२०१२ रोजी झालेल्या चर्चा / वाटाघाटीमध्ये दिलेले दर हे दि.२९/०७/२०१२ रोजी झालेल्या चर्चा / वाटाघाटीमधील SB- २ पेक्षा जास्त असले तरीही त्यांना मिळालेले गुणानुसार सर्व निकष विचारात घेता सर्व अर्थाने SB-१ हे पात्र ठरत आहे.<br>२. दि.२९/०७/२०१२ रोजीचे सादरीकरणामध्ये पुरविण्यात येणारे उपकरणे साहीत्या व्यतिरिक्त परिसराची साफसफाई करणेसाठी रॉड ऑन वाहन देऊ असे सांगितले. |

मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे यांना "साईआश्रम १" चे हाऊसकिपींगचे काम एक वर्षासाठी देणेबाबत निर्णय होऊन यावर खालील प्रमाणे सविस्तर चर्चा करण्यात आली.

१) साईआश्रम - १ साठी संस्थानला आवश्यक असणारे ४५० मनुष्यबळ तसेच इमारतीचे काम नव्याने असल्याने,साफसफाई करण्याचे काम जास्त असणार,त्यामुळे संस्थानला आवश्यक असणारी स्वच्छताकामी मशिनरी / उपकरणे १९९ ऐवजी २३९ घेण्यात यावी.

२) सदरहु ४५० मनुष्यबळ, २३९ मशिनरी / उपकरणांचे दरमहा भाडे, स्वच्छतेसाठी लागणारे केमिकल्स मटेरीयल सर्व करासह दरमहा देय रक्कम रु.६४,२८,५७१/- चे दर निश्चित करण्यात आले.त्यासाठीचे वर्षाचे देय रक्कम रु.७,७१,४२,८५२/- राहील. त्यानंतर साईआश्रम - २ बाबत चर्चा करण्यात आली.

**ब) साईआश्रम - २**

| अ. नं. | निविदाधारकांचे नाव | १३० पैकी प्राप्त गुण ( ९१ व त्यापेक्षा जास्त गुण असल्यास पात्र) | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Technical Marks | Financial Marks | Total | | |
| | | | | पात्र | अपात्र | |
| १ | स्प्लेंडिड फॅसिलिटीज् मॅनेजमेंट (इ) प्रा. लि पुणे, | ११ | ३५ | -- | ४६ | १. निविदेतील अटी / शर्तीनुसार कंपनीची वार्षिक उलाढाल कमी असल्याने अपात्र. |
| २ | कुणाल एन्टप्रायजेस,मुलूंड मुंबई | ३७ | ३९ | -- | ७६ | १. निविदेतील अटी / शर्तीनुसार I.S.O. मानांकन नसल्याने अपात्र. |
| २ | स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲण्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे | २७ | ५४ | -- | ८१ | २. निविदेतील अटी / शर्तीनुसार I.S.O. मानांकन नसल्याने अपात्र |
| ३ | स्पार्क्ल सर्व्हिसेस प्रा.लि. पुणे | ३७ | २२ | -- | ५९ | १. गुण कमी असल्याने अपात्र. |
| ४ | कल्पतरु हॉस्पिटालीटी फॅसिलिटी मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा. लि. अंधेरी ( ई ) | ४२ | ९ | -- | ५१ | १. गुण कमी असल्याने अपात्र. |
| ५ | प्रॉपर्टी सोलुशन इंडीया प्रा. लि मुंबई | ४७ | ३४ | -- | ८१ | १. गुण कमी असल्याने अपात्र. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ऑल सर्व्हिसेस ग्लोबल प्रा. लि. मुंबई | ७० | १२ | -- | ८२ | १. सादरीकरण व चर्चा / वाटाघाटीचे वेळेस निविदेत नमुद केलेले मनुष्यबळ उपकरणे व साहीत्य याबाबतचे सादरीकरण व्यवस्थित सांगता आले नाही. २. गुण कमी असल्याने अपात्र. |
| ७ | संजय एम सर्व्हिसेस, प्रा. लि. परेल मुंबई | ७० | १५ | -- | ८५ | १. गुण कमी असल्याने अपात्र. |
| ८ | मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे | ८५ | ३४ | ११९ | -- | १. दि.२९/०७/२०१२ रोजीचे सादरीकरणामध्ये पुरविण्यात येणारे उपकरणे साहीत्या व्यतिरिक्त परिसराची साफसफाई करणेसाठी रॉड ऑन वाहन देऊ असे सांगितले. |

मे. बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे यांना"साईआश्रम २ "चे एक वर्षासाठी हाऊसकिपींगचे काम देणेबाबत निर्णय होऊन यावर खालील सविस्तर चर्चा करण्यात आली.

१) साईआश्रम २ हे ही नव्यानेच सुरु होणार असल्याने संस्थानला आवश्यक असलेले मनुष्यबळ संख्या १६५ व मशिनरी / उपकरणे संख्या १०८ घेण्यात यावी.

२) सदरहु १६५ मनुष्यबळ, १०८ मशिनरी / उपकरणाचे दरमहा भाडे, स्वच्छतेसाठी लागणारे केमिकल्स मटेरीयल सर्व करासह दरमहा देय रक्कम रु.२२,३२,५००/- चे दर निश्चित करण्यात आले. त्या साठीचे वर्षाचे देय रक्कम रु.२,६७,९०,०००/- राहील

३) साईआश्रम - १ व २ साठी निश्चित केलेले मनुष्यबळ व्यतिरिक्त जादा कुशल/अकुशल मनूष्यबळाची आवश्यता असल्यास, त्याकालावधीत जो किमान वेतन दर असेल त्या सुधारीत दरानुसार रक्कम अदा करण्यात यावी.

मे. बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे हे सध्या संस्थानचे श्री साईप्रसादालय, द्वारावती भक्तनिवास तसेच श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलकडे हाऊस किपींगचे काम पहात आहेत. संस्थानमधील त्यांच्या कामाचा अनुभव, कामाची कार्यपध्दती व गुणवत्ता विचारात घेता, साईआश्रम- १ साठी मान्य करण्यात आलेले ४५० मनुष्यबळ व २३९ मशिनरी / उपकरणेचे भाडे सर्व करासहचे दर तसेच साईआश्रम- २ साठी मान्य करण्यात आलेले १६५ मनुष्यबळ व १०८ मशिनरी/ उपकरणेचे भाडे सर्व करासहचे दर स्विकारणेत येऊन साईआश्रम- १ व २ साठी मे.बी.व्ही.जी इंडिया लि.पुणे यांना कार्यादेश देण्यात यावा.

साईआश्रम १ व २ विभागासाठी- प्रशासकीय इमारती, रुम बुकींग काऊंटर व पार्किग परिसरसाठी आवश्यक लागणारे दररोजचे मनुष्यबळ व मशिनरी संख्या तसेच इमारतीनुसार मनुष्यबळ व मशिनरी संख्या पुरविणे बाबत अट घालण्यात यावी, त्यानुसार दरमहा देय रक्कमेची विभागणी करुन आकारण्यात यावी, असे चर्चे अंती ठरले. (कार्यवाही- अधिक्षक, साईआश्रम-१ व २)

---

**(०४) मा.विश्वस्तानी खालील प्रमाणे सुचना केल्या त्या मान्य करण्यात आल्या.**

**अ)** श्रीमती स्वाती मित्रा, दिल्ली यांनी, श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येणाऱ्या भाविकांची गर्दी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे. श्रीचे समाधी मंदिर व येणाऱ्या भक्तांच्या सुरक्षितता लक्षात घेता आपत्ती व्यवस्थापन व त्याबाबत आराखडा त्यांनी तयार केलेला आहे. त्यासंदर्भात सविस्तर प्रात्यक्षिकासह माहिती देणेकामी त्यांना व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे बोलविण्यात यावे याकामी त्यांना प्रत्यक्ष होणारा प्रवास खर्च, संस्थान वाहन, जेवण, निवास व्यवस्था संस्थानमार्फत पुरविण्यात यावी. (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

**ब)** संस्थानमध्ये श्रींचा प्रसाद म्हणून मोतीचुर लाडूची विक्री करण्यात येते. सदरचे मोतीचुर लाडू तयार करणेकामी गावरान तुपाचा वापर होत असतो. दिवसेंदिवस लाडूची मोठ्याप्रमाणात साईभक्तांकडून मागणी होत असल्याने त्याप्रमाणात लाडूची निर्मिती करावी लागते. त्यामुळे मोठ्याप्रमाणावर गावरान तुप खरेदी करावे लागते. सदर खरेदी करण्यात आलेल्या तुपाचे प्रत्येक नमुन्याची तपासणी यापुढे अश्वमेध लॅबॉरेटरी, नाशिक यांचेकडून करुन घेण्यात यावी.

त्याच प्रमाणे सदरहू तुपाची तसेच तयार होऊन भक्तांना पुरविण्यात येणारे अन्न पदार्थ तपासणेकामी संस्थानची स्वत:ची प्रयोगशाळा असणे आवश्यक आहे. याकरीता संस्थानने फुड सेफ्टी ॲण्ड स्टॅंडर्डस् ॲक्ट २००६, रुल्स ॲण्ड रेग्युलेशन २०११ ची अंमलबजावणी, मार्गदर्शन, कर्मचारी प्रशिक्षण परवाना घेणे व नुतनीकरण करणे इत्यादीकामी ॲड.श्री.पी.बी. सोबले,पुणे यांची सल्लागार म्हणून नियुक्ती केलेली आहे. त्यांचे मार्गदर्शन घेऊन संस्थानची प्रयोगशाळा तयार करणेकामी सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा. (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी)

**क)** व्यवस्थापन समितीचे दि.१४.०७.२०१२ चे सभेमध्ये निर्णय क्र.५३८ नुसार लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत पुरविण्यात येणारे काही कंत्राटी कुशल, अकुशल व सुरक्षा कामगार माहे- ऑक्टोबर-२०११ ते माहे- मार्च-२०१२ याकालावधीत ३१ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक जास्त दिवस कामावर गैरहजर राहिल्याने एकुण २३८ कंत्राटी अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचाऱ्यांना कामावरुन कायमस्वरुपी बंद (कमी) करण्यात यावे, असे ठरले होते.

संस्थानच्या मागणीनुसार आवश्यक तेवढे कंत्राटी कामगार पुरविणे ही संबधीत कंत्राटदाराची जबाबदारी असल्याने याबाबतीत झालेले निर्णय कायम ठेवून संस्थानचे मागणीनुसार आवश्यक तेवढे कंत्राटी कामगार पुरवठा न केल्यास संबंधीत कंत्राटदारांवर करारातील तरतुदीप्रमाणे दंडात्मक कारवाई करणेत यावी. (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.०२ दिनांक १५.०९.२०१२ रोजी झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.८०१ दिनांक १५.०९.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०३ दिनांक २५.०९.२०१२ रोजी झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.८०२ दिनांक २५.०९.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०४ (अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) माहे ऑगस्ट, सप्टेंबर- २०१२ मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(ब) माहे ऑगस्ट, सप्टेंबर २०१२ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**(A)** दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या माहे ऑगस्ट, सप्टेंबर- २०१२ मधील अनुक्रमे जमा रु.१६,७३,०१,८१७/- व रु.१३,११,६३,४५८/- चा तक्ता, श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा माहे ऑगस्ट, सप्टेंबर- २०१२ मधील अनुक्रमे रु.३,३३,२३३/- व रुपये २,६७,८९०/- च्या अहवालाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८०३ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**०२. श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑगस्ट- २०१२ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान मागणी अर्जाबाबत.**

**(B)** श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे ऑगस्ट- २०१२ मधील रुपये ३४,६८,९७१/- मात्र रकमेच्या देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८०३ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०३. श्री साईनाथ रुग्णालयात माहे जुलै, ऑगस्ट- २०१२ मध्ये गरीब रुग्णांना बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

**(C)** श्री साईनाथ रुग्णालयात जुलै, ऑगस्ट- २०१२ मधील अंतररुग्ण व बाह्यरुग्णसाठी अनुक्रमे रुपये ७५,०३२/- व रुपये ६२,५९७/-, थॅलसेमिया व हिमोफेलिया रुग्णांसाठी अनुक्रमे रुपये ४६,१००/- व रुपये ५४,३५०/- मात्र रकमेची वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८०३ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०४. श्री साईबाबा रुग्णालयात माहे जुलै, ऑगस्ट- २०१२ मध्ये गरीब रुग्णांना बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

**(D)** श्री साईबाबा रुग्णालयात माहे जुलै, ऑगस्ट- २०१२ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये अनुक्रमे रुपये ३१,७९,७५६/- व रुपये २९,१२,०६१/- याप्रमाणे देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८०३ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०५. माहे ऑगस्ट, २०१२ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**(E)** माहे ऑगस्ट, २०१२ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर ४७,१९१ मनुष्य दिनांच्या कर्मचाऱ्यांच्या/ कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८०३ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ८०३** **(F)** नोंद घेण्यात येऊन तक्ता "ब" मधील खालीलप्रमाणे बांधकामाची अंतिम बिले आदा करण्यास मान्यता देण्यात आली.

(१) रोहन नानासाहेब निकम, नांदगाव यांचे लिक्वीड ऑक्सीजन प्लाँटसाठी मशिन फौंडेशन, प्लॅटफॉर्म संरक्षण भिंत व किरकोळ कामे करणे याबाबतचे अंतिम बील रु.३,४१,४०६/- मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०५ सोने व चांदी नाण्यांच्या विक्री किंमतीचे बदलाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्रींची प्रतिमा असलेली सोन्याची ५ ग्रॅम, १० ग्रॅम वजनाची व चांदीची २० ग्रॅम वजनाची नाणी तसेच २.५ ग्रॅम सोन्याचे पेंडन्टस साईभक्तांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८ जुलै, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५९८ अन्वये, सोने-चांदीच्या बाजाराभावात वेळोवेळी जसजशी वाढ अथवा घट होईल त्याप्रमाणात यांच्या विक्री मुल्यात वाढ अथवा घट करण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

उपरोक्त निर्णयान्वये, दिनांक १९ जुन, २०१२ ते १७ सप्टेबर, २०१२ या कालावधीत सोने व चांदीचे बाजारभावात वाढ तथा घट (संदर्भः- दैनिक सकाळ) झाल्याने मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात वेळोवेळी, सोने-चांदी नाणी व पेडेंन्टसच्या विक्री मुल्यात बदल करण्यात आलेला आहे. उपरोक्त प्रमाणे विक्री मुल्यात केलेल्या बदलाचे विवरण खालील प्रमाणे-

| अ. क्र. | दरात बदल केल्याचा दिनांक | सोने २.५ ग्रॅम | सोने ५ ग्रॅम | सोने १० ग्रॅम | चांदी २० ग्रॅम |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | १२.०७.२०१२ | ७,८००/- | १५,४००/- | ३०,६००/- | १,२००/- |
| ०२. | २८.०७.२०१२ | ८,०००/- | १५,८००/- | ३१,३००/- | १,२००/- |
| ०३. | २४.०८.२०१२ | ८,२००/- | १६,१००/- | ३२,०००/- | १,२५०/- |
| ०४. | ०५.०९.२०१२ | ८,४००/- | १६,५००/- | ३२,८००/- | १,३५०/- |
| ०५. | १५.०९.२०१२ | ८,६००/- | १७,०००/- | ३३,७००/- | १,४००/- |

तरी सोने-चांदीच्या बाजारभावात झालेल्या बदलाच्या पार्श्वभुमीवर सोने व चांदीचे नाणी व पेडेंन्टसच्या विक्रीमुल्यामध्ये दिनांक १९ जुन, २०१२ ते १७ सप्टेबर, २०१२ या कालावधीत वेळोवेळी केलेल्या बदलास कार्योत्तर मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८०४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी )

---

**विषय न.०६ शिर्डी शहर रस्ते विकास योजनेतील संस्थानमार्फत विकसित करणेत येत असलेले रस्त्यांच्या कामाचे सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे यांचे मुदतवाढ व वाढीव मुदतीतील फी बाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत प्रथम प्राधान्य गटातील अंदाजे रु. ८८ कोटी मात्र इतक्या रकमेचे ११ रस्ते विकसीत करणेचे काम संस्थान व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचेमार्फत सुरु आहे. सदर कामापैकी रु. २८ कोटी रकमेस शासन मान्यता प्राप्त आहे.

सदरहू प्रकल्पातील ११ रस्त्यांपैकी सहा रस्त्यांचे ७.१७ कि.मी. लांबीचे रस्ते विकसित करणे प्रकल्पाचे काम ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि.यांचेमार्फत प्रगतीपथावर आहे. ठेकेदार यांना देण्यात आलेल्या सहा रस्त्यांपैकी रस्ता क्र.०३, ०६, ०७ व ०८ या चार ३.३३ कि. मी. लांबीचे रस्त्यांची कामे प्रगतीपथावर असुन रस्ता क्र.०५ व ०९ या २.३४ कि.मी. लांबीचे वळण रस्त्यांचे कामास ठेकेदार यांनी अद्याप सुरुवात केलेली नाही व ९अ हा १.५० कि.मी. वळणरस्ता शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी काम करणेसाठी हस्तांतरीत केलेला नाही.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८/०४/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३७६ अन्वये, शिर्डी शहरातील रस्ते विकसित करणे कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि., पुणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यासाठी त्यांना कामाचे एकूण किंमतीचे २.५% रक्कम फी अधिक सर्व्हीस टॅक्स देणेकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

सल्लागार यांचे समवेत झालेले करारनाम्यानुसार प्रकल्प किंमत रु.३३,८३,२६,१९९/- च्या २.५% फी रु. ८४,५८,१५५/-अधिक प्रचलित दराने सर्व्हिस टॅक्स खालील तपशीलानुसार अदा करणेबाबत ठरले आहे. सल्लागार यांना दिनांक ०५/०७/२०१२ अखेर खालील टप्प्यानुसार रु.६४,२७,७८३/- फी अधिक प्रचलित दराने सर्व्हिस टॅक्स अदा करणेत आला आहे.

| **Estimated cost for roads in Phase -I - Rs.33,83,26,199/-**<br>**Toatal Fees as per 2.5% - Rs.84,58,155/-** | | | |
|---|---|---|---|
| **Sr. No** | **Stage** | **Percentage of fees payable** | **Amount In Rs.** |
| 1 | **Stage-1** (15% of total fees payable) On completion services mentioned under clause 1.1 and 1.2 of agreement i.e. Pre tender stage, Tendering process & award of Contract: Payable Amount- Rs.12,68,723/- | 15% | 12,68,723.00 |
| 2 | **Stage-2a** (50% of total fees payable) during progress of work– Rs.2,34,900/month for 18 months (10 months) Upto 05/06/2011: Payable Amount - Rs. 23,49,000/- | 50% | 23,49,000.00 |
| | **Stage-2a** (50% of total fees payable) during progress of work - As per revised **Rs.1,87,959/-/month** for 10 months from 06/06/2011 to 05/04/2012 - Bill for 10 months : Payable Amount - Rs. 18,80,078/- | - | 18,80,078.00 |
| 2 A | **Stage-2a-Rev.** (monthly fees payable) during progress of work- As per revised **Rs.1,87,959/-/month** from 06/04/2012 to 05/07/2012 -Bill for 03 months | - | 5,63,877.00 |
| 3 | **Stage-3** (25% of total fees payable) progressively pro-rata with contractors running bill during the execution of the work – RTL **RA bill no. 03** - Rs. 5,85,76,873/-<br>As per 25% = 21,14,539/338326199*58576873/- =366105/- : Payable Amount - Rs. 21,14,539/- | 25% | 3,66,105.00 |
| 4 | **Retension 10%-** Amount -Rs. 8,45,815/- | 10% | - |
| | | **Total Paid amount of fees:** | **64,27,783**/- |

सदर कामाची १५ महिने मुदत दि.०५/११/२०११ रोजी संपुष्टात आली होती. त्यानंतर ठेकेदार यांचे विनंतीवरून त्यांना मार्च २०१२ अखेर मुदतवाढ देण्यात आली होती. ठेकेदार यांचे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही. दिनांक २४/०८/२०१२ रोजीचे पत्रान्वये ठेकेदार यांनी रस्त्यांची कामे पूर्ण करणेसाठी दि. ३१/०५/२०१३ अखेर मुदतवाढ मिळणेबत विनंती केली असून त्याबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव मा. त्रीसदस्य समितीचे मान्यतेसाठी सादर करणेत आलेला आहे. सदरचे वाढीव कालावधीमध्ये कामाचे पर्यवेक्षण व बिले तपासणी करणे इत्यादि कामांसाठी सल्लागार यांचे सेवेची आवश्यकता आहे.

सल्लागार यांचे सेवेची मुदत दिनांक ०५/०४/२०१२ रोजी संपुष्टात आलेली आहे. सल्लागार यांनी दि.२२/०५/२०१२ रोजीचे पत्रान्वये सदरचे कामासाठीचे फीचे दर दोन वर्षापुर्वीचे असल्यामुळे वाढीव कालावधीत कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर अनुषंगिक खर्च भागविणेसाठी रु.२.३४ लक्ष प्रतिमाह ऐवजी रु. २.४० लक्ष प्रतिमाह दराने वाढीव कालावधीत पेमेंट करणेत यावे अशी मागणी विनंती केली आहे.

सल्लागार यांचे प्रस्तावाबाबत मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे उपस्थितीत दि. ३० जुलै, २०१२ रोजी बैठक झाली. त्यावेळी श्री. देशपांडे व श्री. किरणाळी, मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि., पुणे तसेच वरिष्ठ मुख्य अभियंता श्री. आहेर व शाखा अभियंता श्री. देसाई उपस्थित होते. वाढीव कालावधीत कर्मचाऱ्यांचे वेतन तसेच इतर अनुषंगिक खर्च भागविणेसाठी सल्लागार यांचे मागणीनुसार रु.२.४० लक्ष प्रतिमाह ऐवजी देय फीच्या टप्प्यातील Stage२-A नुसार रु. १,८७,९५९/- प्रती महिना फी अदा करावी अशी सल्लागार यांची विनंती मान्य करण्यात आली आहे.

तरी प्रकल्पाचे उर्वरीत काम पूर्ण करणेकामी सल्लागार यांना करारानुसार देय फी व्यतिरिक्त दि.०६/०४/२०१२ ते दि.०५/०६/२०१३ या चौदा महिने वाढीव कालावधीकरिता एकुण फी रुपये २६,३१,४२६/- फी व नियमानुसार सर्व्हिस टॅक्स अदा करणेस निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.८०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमध्ये सध्या चालु असलेले अथवा प्रलंबीत असलेले सर्व प्रकल्प, रस्ते व त्यासाठीचा खर्च इ.कारणांसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मंजुरी घ्यावयाची असल्याने सदरचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा व मा.खंडपीठाचे मान्यतेनंतर प्रस्तावाबाबत कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय न.०७ श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील लिफ्ट बदलणेकामी करावयाचे सिव्हील वर्कबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटल येथील ३ स्ट्रेचर लिफ्ट व श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे थायसन मेकच्या ४ लिफ्ट सन २००८ मध्ये बसविणेत आल्या होत्या. आता, सदर लिफ्ट काढून नविन जॉन्सन मेकच्या लिफ्ट बसविणेकामी खालील प्रमाणे आवश्यक सिव्हील वर्क करुन मिळणेबाबत विद्युत विभाग प्रमुख यांनी त्यांचेकडील दिनांक २० ऑगस्ट, २०१२ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

१. मशिन रुमचा दरवाजा बाहेरील बाजूने उघडेल असे करणे.
२. मशिनरुमला ३'x२' आकाराच्या दोन नविन खिडक्या तयार करुन ॲल्युमिनीअम लुवर्ड विंडो बसविणे.
३. अनावश्यक आर. सी. सी. फॉंडेशन काढून त्या ऐवजी नवीन फॅंडेशन तयार करणे.
४. कोर कटींग मशिनच्या सहाय्याने रोपसाठी होल्स करणे.
५. लिफ्ट शाफ्ट व लिफ्ट मशिन रुमचे रंगकाम करणे.
६. लिफ्ट शाफ्ट पिटचे वॉटरप्रुफींग करणे.
७. नविन हुक (छताममध्ये) टाकणे.
८. साफ-सफाई व इतर किरकोळ कामे करणे.

उपरोक्तप्रमाणे भक्तनिवासस्थान व श्री साईबाबा हॉस्पीटल येथील लिफ्टसाठी कामे करणेसाठी एकुण रुपये ३,४६,८१५/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी याकामी येणारे खर्चास व सदरचे काम विहित पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८०६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील लिफ्ट बदलणेकामी करावयाचे सिव्हील वर्कबाबत येणारे रुपये ३,४६,८१५/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८ संस्थानचे वाहन विभागासाठी कार पार्किंग व कर्मचारी वाहन पार्किंग शेड तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे वाहन विभाग गौरी शेडचे पूर्वेकडील संस्थानचे मालकीचे स.नं.१०९ पै. मधिल जागेत स्थलांतरीत करण्यात आले आहे. मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये याठिकाणी इकडील विभागामार्फत वाहनांकरीता शेड्स, वाहन तळाचे खडीकरण व डांबरीकरण करणे, नविन कार्यालय बांधकाम, कार वॉशर रॅम्प, पाण्याची साठवण टाकी, टॉयलेट, स्टोअर रुम, चेनलिंक फेसींग इ. कामे पूर्ण करुन देण्यात आली आहे.

वाहन विभाग प्रमुख यांनी दि.०२/०८/२०१२ रोजीचे पत्रान्वये वाहनांसाठी शेड अपुरे पडत असल्याने कार्यालयासमोरील जागेत कार्यालयीन वाहनांसाठी व कर्मचाऱ्यांचे टु व्हीलर पार्किंगसाठी शेड तयार करणेस विनंती केली आहे. त्यानुसार कार्यालयीन कामांसाठीचे आठ वाहनांसाठी २४.०mx५.५m चे शेड बांधता येतील, तसेच कर्मचाऱ्यांचे टु व्हिलर आठरा वाहन पार्किंगसाठी १८mx३m चे शेड बांधता येईल. याकामी सन २०११-२०१२ चे DSR दराने केलेल्या अंदाजपत्रकानुसार रु.८,३५,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. शेडचे फ्लोरींग साठी पेव्हींग ब्लॉक टयुबलर सेक्शन स्ट्रक्चर व कलर कोटेड शिट्स गृहीत धरण्यात आलेले आहेत.

तरी वरीलप्रमाणे नियोजीत शेड्सचे कामांसाठी येणारे रक्कम रु.८,३५,०००/- मात्रचे खर्चास मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.८०७ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे वाहन विभागासाठी कार पार्किंग व कर्मचारी वाहन पार्किंग शेड तयार करणेसाठी येणाऱ्या रक्कम रु.८,३५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९ साईनिवास अतिथीगृहामधील तीन नग सोफासेट व सहा खुर्च्या दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** साईनिवास अतिथीगृहाचे खोल्यांमधील २३ नग सोफा सेटला नविन रेक्झीन बसवून त्यामध्ये आवश्यकतेनुसार भर (बॉण्डेड फोम, युफोम) घालून दुरुस्तीचे काम करुन घेणेत आले आहेत.

दि.१८/०६/२०१२ रोजीचे डी.पी. अन्वये, उर्वरीत ०३ नग सोफासेट व सहा नग खुर्च्या दुरुस्त करुन मिळणेबाबत प्रशासकीय अधिकारी, साईप्रसाद निवासस्थान यांनी कळविले आहे.

करीता सदरहू तीन नग सोफासेट व सहा नग खुर्च्या दुरुस्तीकरीता अंदाजे ४०,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम अशाप्रकारचे काम करणारे ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागावून करुन घेता येईल.

तरी याकामी येणारे अंदाजे रु.४०,०००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम कोटेशन मागवून करुन घेणेस मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृहामधील तीन नग सोफासेट व सहा नग खुर्च्या दुरुस्ती करणेऐवजी त्या अन्य ठिकाणी वापरात आणाव्यात व साईनिवास अतिथीगृहामध्ये वापरासाठी नवीन सोफासेट व खुर्च्या विहित पध्दतीने खरेदी करणेत याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०** **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव (दसरा) सन २०१२ करीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान मार्फत सालाबाद प्रमाणे याही वर्षी मंगळवार, दि. २३ ऑक्टोबर, २०१२ ते शुक्रवार दि.२६ ऑक्टोबर, २०१२ अखेर ०४ दिवस "श्रीं " चा पुण्यतिथी (दसरा) उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीमध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, धर्मशाळा, जुने प्रसादालय व साईनगर परिसरांमध्ये तात्पुरत्या स्वरुपाची अतिरिक्त निवास व्यवस्था व्हावी म्हणुन तसेच मंदिर परिसरात उत्सवाच्या कालावधीत खालील परिशिष्ट प्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे.

**अ) समाधि मंदिर, साईनगर, भक्तनिवासस्थान (५०० रुम) व इ. परिसरात ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे. :-**

**०१) एम. एस. पाईप, कैच्या वापरुन वरिल बाजूने ताडपत्री व आतिल बाजूने सुशोभित कापड असलेले मंडप.**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर उत्तर बाजूस, चावडी गेट ते नगरव्दार गेटपर्यन्त | २८४'x१९'.३" | ५४६७.०० |
| ०२ | समाधी मंदिरा समोरील सभाकुंडामध्ये (कनात व बिछायतीसह) | ६५'x६०' | ३९००.०० |
| ०३ | साई कॉम्प्लॅक्स समोरील जागेवर (१६ आर मध्ये) | २१०'x ७०' | १४७००.०० |
| | | **एकुण चौ. फुट-** | **२४०६७.००** |

**०२) पाईप / बांबू व गोल्टे वापरुन वरिल बाजूने ताडपत्री व आतिल बाजूने सुशोभित कापड असलेले मंडप.**

| अ. नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर दक्षिण बाजूस, व्दारकामाई ते पालखी गेटपर्यन्त | १४०'x१९' | २६६०.०० |
| ०२ | अ) समाधी मंदिर बाहेर पडण्याचा मार्ग (गुरुस्थान गेट) ते गुरुस्थान समोरील बेसमेंट पर्यंत | १५०'x१०' | १५००.०० |
| | ब) गुरुस्थान समोरील बेसमेंटचे दक्षिण बाजूस | ५०'x१०' | ५००.०० |
| | क) गुरुस्थान समोर पश्चिम बाजूस दक्षिण-उत्तर असा. | ४५'x३०' | १३५०.०० |
| ०३ | गेट नं. ३ ते श्री मारुती मंदिर पर्यंत १५ फुट उंचीचा | १००'x २०' | २०००.०० |
| ०४ | श्री मारुती मंदिर ते शाम सुंदर हॉल पर्यंत. | ५०'x २५'<br>१५'x २०' | १२५०.००<br>३००.०० |
| ०५ | गेट नं. ०४ समोर | ४०'x २०' | ८००.०० |
| ०६ | श्रीं चे चावडी समोर शामसुंदर हॉल पर्यंत | १०५'x ३०' | ३१५०.०० |
| ०७ | शनि मंदिर, महादेव, श्री गणेश मंदिरा समोर | ५०'x ४०' | २०००.०० |
| ०८ | शनि मंदिर व्हि. आय. पी. गेट समोर दर्शन रांगेकरीता | ११५'x १०' | ११५०.०० |
| ०९ | मंदिर परिसरामध्ये कॅलेंडर विक्री काउंटर समोर | १५'x२०' | ३००.०० |
| १० | श्री साई प्रसादालय मुख्य गेट ते तिकीट बुकींग काउंटर पर्यंत | १५०'x१५' | २२५०.०० |
| ११ | जनसंपर्क कार्यालयाचे पश्चिम बाजूस | ७०'x१०' | ७००.०० |
| १२ | लेंडीबागेत श्री दत्त मंदिरा समोर | १०५'x ३५' | ३६७५.०० |
| १३ | जुना पिंपळवाडी रस्ता दर्शन रांगेच्या पूर्व व पश्चिम बाजूने | ३०'x४५'<br>२०'x१५' | १३५०.००<br>३००.०० |
| १४ | साईप्रसाद नं.२ समोर चौकशी कार्यालया समोर | १५' x ६०'<br>१५' x २०' | ९००.००<br>३००.०० |
| १५ | जुने प्रसादालय परिसरात मोबाईल लॉकर्स समोर व बाहेरील बाजूस फुटपाथवर | ४५'x२५'<br>३०'x१०' | ११२५.००<br>३००.०० |
| १६ | लाडू विक्री काउंटर समोर | ५०'x१५' | ७५०.०० |
| **एकुण चौ. फुट..** | | | **२८६१०.००** |

### ब) साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्था :-

| अ. नं. | ठिकाण | साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | सदरहू स्टेजवर सुमारे ४० ते ५० कलाकारांसाठी ३'-६" उंचीचे स्टेज अँगल फ्रेममध्ये मजबूत बांधी तयार करुन, स्टेजचे वरिल बाजूने भक्कम असे प्लायवूड वापरुन व मजबूत सपोर्ट देऊन ३०' x२०' साईजचे स्टेज तयार करणे., तसेच सदरहू स्टेजचे वरिल बाजूने ताडपत्री बांधून, आतिल बाजूने सुशोभित एकाच रंगाचे कापड बांधून, स्टेज फ्रेमचे चारही बाजूने सुशोभित एकाच रंगाचे कापड बांधणे, स्टेजचे पुढील भागासाठी सुशोभित एकाच रंगांचा सुमारे ३५' लांबीचा व १५' उंचीचा पडदा बसविणे. तसेच स्टेजचे बाजूस कलाकारांचे मेकअपसाठी २०'x१५' साईजच्या ०२ ग्रीन रुम जाड कापडामध्ये तयार करणे. स्टेजवर व साईभक्तांना बसणेकामी १०,००० चौ. फुट मॅटीन, १००० नग फायबर खुर्च्या पुरविणे व कार्यक्रमाचे वेळी व्यवस्थीत मांडणी करुन देणे इ. सह. स्टेज व्यवस्था | ३०' x२०' | ६००.०० |
| ०२ | **<u>मंदीर परिसरामध्ये सभाकुड येथे :-</u>**<br>सदर स्टेजवर सुमारे २० ते २५ कलाकारांकरीता २'-६" उंचीचे स्टेज अँगल फ्रेममध्ये स्टॅण्ड उभारणी करुन प्रत्येकी ३' x ३' अंतरावर खालील बाजूस सपोर्ट देऊन त्यावर भक्कम प्लायवूड एकाच लेव्हलमध्ये बांधणेत यावेत. स्टेजचे पाठिमागील भागात निळ्या रंगाचा प्लेन पडदा लावून साईडणे सफेद (पांढरे) कापड तसेच स्टेजचे प्लॅटफॉर्मला पुढील बाजूने तसेच साईडणी चॉकलेटी / सफेद रंगाचे कापड लावण्यात यावेत. स्टेजचे बाजूस कलाकारांचे मेकअप करीता १०'x१०' साईजचे दोन (०२) ग्रीन रुम, जाड कापडी पार्टीशनमध्ये तयार करणे. स्टेजवर मॅटीन टाकुण स्टेज समोर ३०० नग फायबर खुर्च्या टाकणे.<br>तसेच स्टेजचे बाजूने स्पीकर ठेवणेकरीता ६x६ साईजचे व ३ फुट उंचीचे प्लॅटफॉर्म तयार करुन देणे. व स्टेज करीता दोन बाजूने अंदाजे ३' ते ४' रुंदीच्या पायऱ्या (जिने) तयार करुन बसविणे. इ. सह स्टेज व्यवस्था करणे. | .१६x२४ | ३८४.०० चौरस फुट |

### क) दर्शन रांगेसाठी व श्री साईप्रसादालय येथे तिकीट रेलिंगसाठी बॅरेकेटींग करणे.

| अ. नं. | तपशिल | साईज | रनिंग फुट |
|---|---|---|---|
| ०१ | दर्शन रांगेकरीता व श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांचे रेलिंग व्यवस्थेकामी व इतर आवश्यक ठिकाणी ४' उंचीचे लोखंडी पाईप / बांबू वापरुन भक्कम बांधी करुन बॅरेकेटींग करणे. | १४०० रनिग फुट | **१४००** |

### ड) साईभक्तांचे बाथरुम व्यवस्थेसाठी पार्टीशन उभारणे.

| अ.नं. | तपशिल | साईज | रनिंग फुट |
|---|---|---|---|
| ०१ | साईनगर व नविन प्रसादालय बाहेरील बाजूस १२ फुट उंचीचे जी. आय. पत्रे वापरुन आतिल बाजूने सुशोभित कापड बांधून बाथरुम व्यवस्थे कामी ६' उंचीचे पार्टीशनची उभारणी करणे. | ३००.०० रनिंग फुट | ३००.०० |

### इ) दर्शन रांगेच्या बाजूने ६ फुट उंचीची कनात बांधणे

| अ.नं. | तपशिल | साईज | रनिंग फुट |
|---|---|---|---|
| ०१ | दर्शन रांगच्या बाजूने शामियाना मंडपासाठी वापरण्यात येणाऱ्या कापडाची ६ फुट उंचीची कनात बांधणे. | ८०० रनिग फुट | **८००** |

उपरोक्त प्रमाणे ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज, दर्शन रांगेसाठी बॅरेकेटींग, साईभक्तांचे सोयीसाठी तात्पुरते बाथरुम व्यवस्थेसाठी पार्टीशन व दर्शन रांगेच्या बाजूने कनात बांधणे इ. व्यवस्था करणेकामी अंदाजे रु. १२.६५ लक्ष मात्र अपेक्षित आहे. उपरोक्त श्री पुण्यतिथी उत्सव (दसरा) २०१२ करीता साईभक्तांचे सोयी सुविधेसाठी मंडप उभारणीसह इतर अनुषंगीक सुविधा पुरविणेकामी सिलबंद निविदा मागविणेकामी वर्तमान- पत्रात व संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविता येतील. उत्सवा निमीत्ताने उभारणेत येणारे डेकोरेशन करीता आवश्यक असणारे बांबू व गोल्टे भाडेतत्वावर घेणेकामी येणारे अंदाजे रु.२५,०००/- मात्रचे खर्चास तसेच मंदिर परिसरात आवश्यक ठिकाणी रंगकाम करणेकामी येणारे रु.१०,०००/- मात्रचे खर्चास असे अंदाजे एकुण रु.१३.०० लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

शिर्डी साई ट्रस्ट चेन्नई यांचेमार्फत देणगीदाखल बांधकाम करण्यात येत असलेल्या साई आश्रम इमारती श्री साईबाबा पुण्यतिथी (दसरा) उत्सवापूर्वी साईभक्तांचे निवासाकरीता उपलब्ध झाल्यास वरीलपैकी जुने प्रसादालय परिसर साईनगर व भक्तनिवास (५०० खोल्या) येथील निवास व्यवस्थेसाठी असलेल्या मंडपाची आवश्यकता भासणार नाही. सदर मंडपाचा तपशिल खालीलप्रमाणे

०१. एम.एस.पाईप, कैच्या वापरुन वरिल बाजूने ताडपत्री व आतिल बाजूने सुशोभित कापड असलेले मंडप.

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | साईनगर परिसर (कनात व बिछायतीसह) | १०५'x१०५'<br>९०'x२१०' | ११०२५.००<br>१८९००.०० |
| | | | २९९२५.०० |

०२. पाईप / बांबू व गोल्टे वापरुन वरिल बाजूने ताडपत्री व आतिल बाजूने सुशोभित कापड असलेले मंडप.

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | साई उद्यान इमारत परिसरात (कनात व बिछायतीसह) | ४५' X ६०' | २७००.०० |
| ०२ | मंगल कार्यालयामध्ये (कनात व बिछायतीसह) | ९०' X १५' | १३५०.०० |
| ०३ | जुने प्रसादालय पार्किंगचे जागेवर (कनात व बिछायतीसह) | १५०'X १००' | १५०००.०० |
| ०४ | जुने प्रसादालय तिकीट विक्री काउंटर समोर | १५०'X ४०' | ६०००.०० |
| ०५ | सुलभ प्रसाधनगृहा समोर | ८०'X ४०' | ३२००.०० |
| ०६ | शिर्डी नगरपंचायत जवळ पालखी स्वागता करीता | २०'X १०' | २००.०० |
| ०७ | शिर्डी पोलीस स्टेशन जवळ पालखी स्वागता करीता | २०'X १०' | २००.०० |
| ०८ | नविन भक्तनिवासस्थान ( ५०० रुम) वाहन पार्किंगचे ठिकाणी (कनात व बिछायतीसह) | ४५'X३९०' | १७५५०.०० |
| ०९ | नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम) पश्चिम बाजूस जेवणासाठी (कनात व बिछायतीसह) | ६०'X४५' | २७००.०० |
| | | | ४८,९००/- |

उपरोक्त निवास व्यवस्थेसाठी मंडप उभारणी करावयाची झाल्यास याकामी रक्कम रु.१६.५३ लक्ष मात्र खर्च येईल अशाप्रकारे " श्री " चे पुण्यतिथी उत्सवानिमीत्त मंडप व्यवस्था करणेकामी एकुण २९.५३ लक्ष मात्र खर्च येणार आहे

तरी वरिल प्रमाणे मंडप व इतर व्यवस्था करुन घेणेकामी निवास व्यवस्थेचे मंडप उभारणी व्यतीरीक्त येणारे एकुण रु.१३.०० लक्ष मात्रचे खर्चास व सदरहू कामी वर्तमान पत्रात व संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करुन सिलबंद निविदा मागविणेस मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८०९ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम प्रकल्पातील इमारती निवासाकरीता उपलब्ध होणार असल्याने वरीलप्रमाणे प्रस्तावित करणेत आलेल्या निवासव्यवस्थेचे मंडप उभारणी व्यतिरिक्त इतर मंडप व अनुषंगिक व्यवस्था करणेसाठी वर्तमानपत्रात व संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करुन सिलबंद निविदा मागविणेस व त्यासाठी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, निवासव्यवस्थेचे मंडपांची गरज भासल्यास आवश्यकतेनुसार ते मंडप मंजूर दराने करुन घेणेस व त्यासाठी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.११ सन २००० पासून सुरु असणारे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १४८/१ मधील क्षेत्र ०५ हे ०२ आर चे भूसंपादनाचे प्रस्तावाबाबत श्रीमती संजीवनी दशरथ महांबरे व इतर २ यांचा दि.०३.०८.२०१२ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्रीमती संजीवनी दशरथ महांबरे, श्रीमती रजनी विश्वास जोगळेकर व सौ. सोनिया देवीदास पाटील, राहणार शिर्डी, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर यांनी उपरोक्त विषयांस अनुसरुन मा. त्रिसदस्यीय समितीचे मा.अध्यक्ष तसेच सदस्य मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर व मा. कार्यकारी अधिकारी यांचेकडेस दिनांक ०३ ऑगष्ट, २०१२ रोजी केलेले अर्ज इकडील कार्यालयास दिनांक २० व २१ ऑगष्ट, २०१२ रोजी यथोचित कार्यवाहीसाठी प्राप्त झालेले आहेत. या सर्व अर्जामधील तपशील एक समान व सारखा आहे, त्याचा थोडक्यात तपशील व अन्य महत्वाच्या बाबी खालीलप्रमाणे :

**०१.** अर्जदार या स्त्रीया आहेत. अर्जदारांपैकी अ.नं. १ व २ या विधवा आहेत. ते त्यांच्या उदरनिर्वाहासाठी मिळकतीची देखभाल करतात. केवळ अर्जदार या स्त्रिया आहेत म्हणून अधिकारी दुष्ट हेतूने व काही कारण काढून अर्जदाराच्या जमिनी घेण्याचे विचारात आहेत. असे असतांना अर्जदार यांना कोणाचाही पाठिंबा नाही. त्यामुळे अधिकाऱ्याचा हेतू तोच आणि तोच आहे की, अर्जदाराची जमीन ताब्यात घ्यावी. याच उद्देशाने सन २००० मध्ये स.नं. १४८/१ क्षेत्र ०५ हे ०२ आर जमिनीचे भूसंपादनाचा प्रस्ताव पाठविला. श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक एसएसएस / वशी ०२ / ११६११ / ९९, दिनांक २७ डिसेंबर, १९९९ ने भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस पाठविला. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक १६ अ / ५७ / २००० / एस आर / ४ / २००० ने मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना प्राधिकृत केले.

**०२.** अर्जदार यांच वडील कै. श्री. हरिभाऊ शेळके यांचा स.नं. १४८ क्षेत्र १० हे ०७ आर होत त्यातून क्षेत्र ०५ हे ०३ आर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना भूसंपादनाच्या माध्यमातून दिली त्या ठिकाणी धर्मशाळा २०० रुम बांधली आहे. (सार्वजनिक हितासाठी व वापरासाठी) त्यानंतर श्री साईबाबा संस्थानने दिनांक ०५ एप्रिल, २००९ रोजी च्या निर्णयानुसार ०१ हेक्टर जमीन घेण्याचे व बाकीची जमीन सोडून देणेबाबत निर्णय घेतलेला आहे. श्री साईबाबा संस्थानच्या अधिकाऱ्यांना माहिती आहे की, कै. हरीभाऊ शेळके यांच्या कुंटूंबियांकडून २० एकर जागा संस्थानने व शासनाने भूसंपादनाचे माध्यमातून घेतलेली आहे. तसेच कै. हरिभाऊ शेळके यांनी जमीन दान दिलेली आहे. त्यानंतर सदर भूसंपादनाने जमीन घेणेचा प्रस्ताव वगळणे आवश्यक होते.

**०३.** शिर्डी नगरपंचायत यांनी त्यांचे पत्र क्रमांक जेके / एनपी / केव्ही ५ / २०४५ / २००१, दिनांक २२ मार्च, २००१ ने संस्थानला कळविले की, सर्व्हे नंबर १४८/१ ही जमीन निवासी पट्टयांत येत आहे. अर्जदार ०१ व ०२ या विधवा आहेत. त्यांचे पती सन १९९९ / २००० मध्ये निधन पावले. त्यांना दोन मुले आहेत. त्यांना विषयांकित भूसंपादीत होणारी एव्हढीच जमीन आहे. अर्जदार तीन यांना २ मुले आहेत. त्यांना त्यांच्या जमिनीचा विकास करणेचा, त्याचा लाभ घेण्याचा पुर्ण हक्क आहे. अर्जदाराच्या कुंटूबांनी शासनास व श्री साईबाबा संस्थानला जनतेच्या कल्याणासाठी व उपयोगासाठी जमीन दिलेली आहे. तसेच त्यांनी अत्यंत कमी किंमतीत श्री साईबाबा संस्थानला जमिनी विकत दिलेल्या आहेत. शासकीय विभागांनी जमिनी संपादीत केलेल्या आहेत. आमची अशी आशा आहे की, आमच्या विनंतीचा व नमुद केलेल्या बाबींचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन बेकायदेशीर सुरु असलेले भूसंपादनाचे प्रकरण हे कायद्याचा विचार करुन वगळण्यात यावे.

**(ब) अर्जदार श्रीमती महांबरे व इतर ०२ यांचे अर्जातील उपरोक्त बाबींबाबत थोडक्यात कार्यालयीन टिपणी खालीलप्रमाणे :**

**०१.** मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी संस्थानने दिनांक २९ डिसेंबर, १९९९ रोजी सादर केलेल्या, मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १४८/१ मधील क्षेत्र क्षेत्र ०५ हे ०२ आर (पोटखराबासह) या जमिनीचे धर्मशाळा व इतर बांधकामाचे प्रयोजनार्थ भूसंपादन प्रस्तावात कलम ५२ अ नुसार मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांना दिनांक ०८ फेब्रुवारी, २००० रोजी प्राधिकृत केलेले आहे.

**०२.** श्री साईंचे दर्शनासाठी हजारोच्या संख्येने येणाऱ्या भक्तांसाठी संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या निवास, भोजन, दर्शन रांगा आदि व्यवस्था अपुऱ्या पडतात. तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळांनी / समितीने भक्तांसाठी जादा सेवा-सुविधा उपलब्ध करुन देणेचे दृष्टीने संस्थानने यापुर्वी सर्व्हे नंबर १४८/२, १४८/३ व १४८/४ मधील जमिनी खरेदी करुन त्याठिकाणी भक्तनिवासस्थान इमारत तसेच वैद्यकिय सेवा-सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर जमिनीचे दक्षिणेस विषयांकित सर्व्हे नंबर १४८/१ असून, या जमिनीचा पुर्व पश्चिम बांध एकच आहे. सन १९९९-२००० मध्ये सर्वांगीण विचार करुन तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने संस्थान मालकीच्या सर्व्हे नंबर १४८/२, १४८/३ व १४८/४ चे लगत असलेली सर्व्हे नंबर १४८/१ मधील जमीन भूसंपादनाचे माध्यमातून घेण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार विषयांकित जमिनीचा भूसंपादन प्रस्ताव सादर करणेत आला. यामध्ये अधिकाऱ्यांचा दुष्ट हेतू आहे, हे अर्जदारांचे म्हणणे खरे व उचित नाही.

**०३.** अर्जदार यांचे वडील कै. श्री. हरिभाऊ त्र्यंबक शेळके यांचेकडून भूसंपादनाच्या माध्यमातून स. नं. १४८ मधील जमीन घेतली हे अर्जदारांचे म्हणणे खरे नाही. कै. हरिभाऊ त्र्यंबक शेळके यांना दोन पत्नी (कै.सौ. साखरबाई व श्रीमती शांताबाई) होत्या. त्यापैकी श्रीमती शांताबाई हरिभाऊ शेळके व त्यांच्या विवाहीत ०२ मुली यांचेकडून सर्व्हे नंबर १४८/२, १४८/३ व १४८/४ मधील क्षेत्र ०५ हे ०३ आर ही जमीन रितसर चर्चा वाटाघाटीने जमिनीची योग्य व उचित किंमत ठरवून नोंदणीकृत खरेदीखताव्दारे खरेदी करणेत आलेली आहे. सदरच्या जमिनी कै. हरिभाऊ शेळके यांचे वारस म्हणून मिळालेल्या नाहीत. या जमिनींशी कै. हरिभाऊ त्र्यंबक शेळके यांचा अथवा विषयांकित अर्जदारांचा सुतराम संबंध नाही. त्यामुळे विषयांकित अर्जदारांचे, त्यांचे वडिलांची जमीन संस्थानने भूसंपादनाने घेतली हे म्हणणे खरे नाही व सदरची जमीन त्यांचे हिश्श्याची होती असे समजून त्याचा फायदा घेण्याचे कारण नाही.

०४. अर्जदारांना विषयांकित भूसंपादन प्रस्तावातीलच जमीन उदरनिर्वाहासाठी उपलब्ध आहे हे त्यांचे म्हणणे खरे नाही. मौजे शिर्डी येथील अर्जदारांचे जमिनींचे खातेउतारे पाहिला असतां, खालीलप्रमाणे जमिनी त्यांचे नांवावर आहेत :

**I.** श्रीमती महांबरे व इतर ०२ अर्जदार यांचे नांवावर एकत्रित सर्व्हे नंबर १२५/४ (क्षेत्र ०० हे ०८ आर) / सर्व्हे नंबर १७१/३ (क्षेत्र ०० हे ०४ आर) / सर्व्हे नंबर १४८/१ (क्षेत्र ०५ हे ०२ आर) अशा जमिनी आहेत

**II.** श्रीमती रजनी विश्वास जोगळेकर यांचे नांवावर स्वतंत्ररित्या सर्व्हे नंबर १७१/१ क्षेत्र ०० हे २०.५०आर हे बिनशेती क्षेत्र असून, याचा वापर वाणिज्य कारणासाठी करणेत येत आहे.

**III.** श्रीमती संजीवनी दशरथ महांबरे यांचे नांवावर स्वतंत्ररित्या सर्व्हे नंबर १७१/८ (क्षेत्र ०० हे ७० आर) / सर्व्हे नंबर ९४/१ (क्षेत्र ०१ हे २० आर) मध्ये जमिनी आहेत. यापैकी स.नं. १७१/८ हे क्षेत्र बिनशेती असून, त्याचा वापर वाणिज्य कारणासाठी करणेत येत आहे.

**IV.** सौ. सोनिया देवीदास पाटील यांचे नांवावर स्वतंत्ररित्या सर्व्हे नंबर ९४/५ क्षेत्र ०५ हे २३ आर आहे.

**V.** याशिवाय, अर्जदार श्रीमती महांबरे व इतर ०२ यांचे नांवावर एकत्रितरित्या मालमत्ता क्रमांक २३६७ या ठिकाणी बांधलेली पक्की इमारत असून, तिचा वापर वाणिज्य कारणासाठी सध्या करणेत येत आहे.

**०५.** संस्थानने सुरु केलेले भूसंपादनाचे प्रकरण हे बेकायदेशीर आहे, असे अर्जदारांचे म्हणणे खरे व वस्तु:स्थितीस धरुन नाही. मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेमार्फत सदर भूसंपादनाची प्रस्तावाची कार्यवाही भूसंपादन कायदा, १८९४ मधील तरतुदीनुसार करणेत येत आहे.

**(क) अर्जदारांनी दिनांक ०३ ऑगष्ट, २०१२ रोजीचे अर्जात नमुद केलेल्या मौजे शिर्डी हद्दीतील सर्व्हे नंबर १४८/१ पैकी क्षेत्र ०४ हेक्टर ७५ आर ५० चौमीचे भूसंपादन प्रस्तावासंबंधीत पूर्वपीठीका व त्याचा सविस्तर तपशील** :

**०१.** श्रीमती साखरबाई हरीभाऊ शेळके (मयत), राहणार शिर्डी यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १४८/१ क्षेत्र ०४ हेक्टर ८६ आर पोटखराबा ०० हे १६ आर असे एकूण क्षेत्र ०५ हेक्टर ०२ आर धर्मशाळा व इतर बांधकाम या प्रयोजनार्थ भूसंपादनाने घेणेबाबत मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस दिनांक २९ डिसेंबर, १९९९ रोजी प्रस्ताव सादर केलेला आहे. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी भूसंपादन कायदा, १८९४ चे कलम ५२ अ नुसार भूसंपादन अधिकारी म्हणून मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना दिनांक ०८ फेब्रुवारी, २००० चे आदेशान्वाये प्राधिकृत केलेले आहे.

या प्रस्तावित भूसंपादन क्षेत्रातून विकास आराखडयातील रस्त्याचे भूसंपादन झाल्याने, रस्त्याचे क्षेत्र वजा जाता उर्वरित क्षेत्र ०४ हेकटर ७५ आर ५० चौमी चे भूसंपादनाचे प्रकरण सुरु आहे.

सदर भूसंपादन प्रस्तावाच्या अनुषंगाने कै. श्रीमती साखरबाई हरिभाऊ शेळके यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्रमांक ३९०/२००२ दाखल केलेला होता. मा. न्यायालयाने सदर रिट पिटीशनचे दाव्यात जैसे थे चा आदेश दिलेला आहे.

**०२.** श्रीमती साखरबाई हरीभाऊ शेळके ह्या दिनांक ०५ ऑगष्ट, २००८ रोजी मयत झालेल्या असून, त्यांना अर्जदार श्रीमती संजीवनी दशरथ महांबरे, श्रीमती रजनी विश्वास जोगळेकर व सौ. सोनिया देवीदास पाटील या तीन (०३) मुली वारस आहेत. या वारसदार मुलींनी (आताच्या अर्जदार ) दिनांक ०१ एप्रिल, २००९ रोजी इकडील कार्यालयास विनंती अर्ज दिलेला होता, त्यामध्ये खालीलप्रमाणे नमूद केलेले होते :

*.. .. जिल्हा अहमदनगर, तालुका राहाता, मौजे शिर्डी येथील जमीन सर्व्हे नं. १४८ क्षेत्र साडेबारा एकर अशा जमीनीवर श्री साईबाबा संस्थान यांचे आरक्षण आहे. आम्ही नामदार हायकोर्टात त्या विरुध्द रिट पिटीशन करुन स्टे घेतला आहे.*

*संस्थान संबधीत जमीनीबाबत तडजोड करण्यास तयार असेल तर त्यानुसार श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने दिड एकर क्षेत्र देण्यास तयार आहोत. मात्र आम्ही दिड एकर क्षेत्र संस्थानला बाजारभावाने खरेदी दिल्यास, राहिलेल्या संपुर्ण क्षेत्रावरील आरक्षण उठविण्यात आले पाहिजे. तसेच भविष्यात पुन्हा पुन्हा आमच्या जमीनीवर आरक्षण करण्यात येऊ नये. तडजोड झाल्यावर आम्ही रिट पिटीशन काढुन घेऊ, तरी याबाबत योग्य तो निर्णय चर्चेत घेण्यात यावा. संबंधीत विषय राहिल्या अनेक वर्षापासून तडजोडीसाठी प्रलंबीत असुन तडजोड मात्र होत नाही. सदर क्षेत्र आम्ही जमिनीच्या पश्चिम बाजुने देण्यास तयार आहे. तरी योग्य तो निर्णय घ्यावा, ही आपणांस विनंती.*

**०३.** उपरोक्त वारस मुलींचे अर्जावर (आताच्या अर्जदार) तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५ एप्रिल, २००९ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ३७७ खालीलप्रमाणे झालेला आहे :

**.. ..** या अनुषंगाने, मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर साधकबाधक चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला :

०१. श्रीमती जोगळेकर व इतर २ यांनी समक्ष केलेल्या विनंतीनुसार, सर्व्हे नंबर १४८/१ पैकी मधील ०१ हे ०० आर जमीन (विकास योजनेतील रस्त्याचे क्षेत्र सोडून) जमीनमालकांच्या सर्व्हे नंबर १४८/१ च्या पश्चिम बाजूने खरेदी करणेत यावी. यदाकदाचित जमीनमालक खरेदी देऊ इच्छित असलेल्या जमिनीच्या क्षेत्रात जर विहीर अथवा कुपनलिका उपलब्ध असल्यास, सदरहू विहीर अथवा कुपनलिकेवर अथवा त्यावरील पाण्यावर आदिंवर जमीनमालकांचा कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा वहिवाट राहणार नाही.

०२. सर्व्हे नंबर १४८/१ पैकी मधील ०१ हे ०० आर जमीन रक्कम रुपये २,५०,०००/-मात्र प्रति आर या दराने खरेदी करणेत यावी. सदरहू जमिनीचे खरेदीखत करतांना प्रत्यक्ष ताब्यात मिळणारे जमिनीचे एकूण किंमतीचे ८० टक्के रक्कम खरेदीखत नोंदणीचे वेळेस व उर्वरित २० टक्के रक्कम जमिनीस संस्थानचे नांव लागलेनंतर व विहीत पध्दतीने संस्थानमार्फत सरकारी मोजणी झालेनंतर प्रत्यक्ष ताब्यात मिळणारे जमिनीचे प्रमाणांत आदा करण्यात यावी.

०३. उपरोक्त जमीन खरेदी करणेकामी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांची रितसर परवानगी घेणेत यावी.

०४. सर्व्हे नंबर १४८/१ पैकी मधील खरेदी करावयाची ०१ हे ०० आर जमीन वगळतां उर्वरित ०३ हे ७५ आर ५० चौमी जमीन भूसंपादनातून वगळणेबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेमार्फत सादर करण्यात यावा.

०५. भूसंपादनाचा प्रस्ताव वगळणेसाठी / रद्द करणेसाठी शासनाकडे जो आस्थापना खर्च संस्थानला भरावा लागणार आहे, तो आस्थापना खर्च संबंधीत जमीनमालकांनी भरणे आवश्यक राहिल. सदरहू आस्थापना खर्चाची रक्कम खरेदीखताचे अगोदर भरणे आवश्यक राहील. जर सदरहू रक्कम संबंधीत जमीनमालकांनी भरली नाही तर जमीनमालकांची खरेदीखताव्दारे राखून ठेवणेत येणाऱ्या २० टक्के रक्कमेतून सदरहू आस्थापना खर्चाची रक्कम वसूल करण्यांत यावी. सदरहू शर्त / अट खरेदीखतात नमूद करण्यात यावी.

०६. जमीन खरेदी करणेकामी परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव अथवा भूसंपादनातील जमीन वगळणेबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस सादर करणेपूर्वी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे कै.साखरबाई हरीभाऊ शेळके यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशनमध्ये अर्जदार यांचे वकील व संस्थानचे वकील श्री. आर. एन. धोर्डे यांच्या मार्गदर्शनाने समझोत्याचा अर्ज दाखल करणेत यावा.

तसेच उपरोक्त सर्व कायदेशीर, महसुल संबंधीत कार्यवाहीस विलंब लागण्याची शक्यता गृहीत धरुन कै.साखरबाई हरीभाऊ शेळके यांच्या वारस मुलींकडून याबाबत योग्य अटी व शर्तीचा समावेश असलेला समझोता करारनामा करुन घेणेत यावा. तत्पूर्वी सदरहू निर्णय संबंधीत वारस मुलींना लेखी कळविणेत यावा. त्यांचेकडून सदरहू निर्णय मान्य असलेबाबत / सदरहू निर्णयास संमती आहे, असे कार्यालयास लेखी कळविण्यांत आल्यानंतर सदरहू प्रस्तावाबाबत करावी लागणारी उचित कार्यवाही करणेत यावी.

०७. उपरोक्त सर्व कार्यवाहीसह खरेदीखतासाठी करावे लागणारे कायदेशीर बाबींसाठी संस्थान वकीलांचा अभिप्राय घेणे, सर्च रिपोर्ट घेणे, खरेदीखताचा मसुदा तयार करणे, खरेदीखत नोंदणी करणेकामी मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, जमिनीचे सरकारी मोजणीकामी मोजणी शुल्क भरणे, वकिल फी आदा करणे इत्यादी अनुषंगिक बाबींसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावशेक अनुषंगिक खर्चास मान्यता देणेत आली.

**०४.** उपरोक्त अ.नं. ०३ मध्ये नमुद केलेला तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय संबंधित वारसांना यांना दिनांक ०२ जून, २००९ रोजीचे पत्राने कळविणेत आला. त्यास त्यांनी दिनांक ०४ जून, २००९ रोजीचे पत्राने उत्तर दिले, त्यामध्ये सदर भूसंपादन प्रस्तावाचा आस्थापना खर्च द्यावयास तयार नाही, असे नमुद केलेले होते.

त्यानंतर उपरोक्त वारसांनी दिनांक २० जून, २००९ रोजी पुन:श्च अर्ज दिला. या अर्जात त्यांनी, विहीर व डी. पी. रस्त्याचे क्षेत्र वगळून एक हेक्टर जमीन देण्याचे व आस्थापना खर्च देण्याचे मान्य केले तसेच सदर जमीन प्रती आर रक्कम रुपये ०६ (सहा) लाख या दराने खरेदी करणेत यावी, अशी विनंती केली.

**०५.** उपरोक्त वारसांनी (आताच्या अर्जदारांनी) दिनांक २० जून, २००९ रोजीचे पत्राने कळविलेल्या बाबींबाबत तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २१ जून, २००९ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ५६० पारित करणेत आला, त्यामध्ये पुर्वीच्या निर्णय क्रमांक ३७७ मधील अ.नं. ०१ ते ०३ बाबींमध्ये बदल होऊन, इतर बाबी पुर्वीच्या निर्णयातीलच नमुद करणेत आल्या :

०१. सर्व्हे नंबर १४८/१ मधील ०१ हेक्टर ०० आर जमीन सदर सर्व्हे नंबरचे पश्चिम बाजूस पश्चिम - उत्तर बाजूने घेणेत यावे.

०२. विकास योजनेतील रस्त्याचे क्षेत्र विकत घेण्यात येऊ नये.

०३. सर्व्हे नंबर १४८/१ पैकी मधील ०१ हे ०० आर जमीन रक्कम रुपये ४,००,०००/-मात्र प्रति आर (अक्षरी रुपये चार लाख मात्र) या दराने खरेदी करणेत यावी. सदरहू जमिनीचे खरेदीखत करतांना प्रत्यक्ष ताब्यात मिळणारे जमिनीचे एकूण किंमतीचे ८० टक्के रक्कम खरेदीखत नोंदणीचे वेळेस व उर्वरित २० टक्के रक्कम जमिनीस संस्थानचे नांव लागलेनंतर व विहीत पध्दतीने संस्थानमार्फत सरकारी मोजणी झालेनंतर प्रत्यक्ष ताब्यात मिळणारे जमिनीचे प्रमाणांत आदा करण्यात यावी.

**०६.** उपरोक्त अ.नं. ०५ मध्ये नमुद केलेला तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय संबंधित वारसांना (आताचे अर्जदार) यांना दिनांक १० ऑगष्ट, २००९ रोजीचे पत्राने कळविणेत आला.

**तद्नंतर,** उपरोक्त वारसांनी (आताचे अर्जदार यांनी) दिनांक १३ फेब्रुवारी, २०१० रोजीचे पत्राने / अर्जाने, तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक २१ जून, २००९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५६० मध्ये नमुद केलेल्या बाबीं मान्य आहेत व त्याप्रमाणे कार्यवाही करणेस आमची लेखी संमती आहे, असे कळविले.

**०७.** तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने दिनांक २१ जून, २००९ रोजीचे सभेत घेतलेल्या निर्णय क्रमांक ५६० नुसार व उपरोक्त वारसांनी (आताचे अर्जदारांनी) दिनांक १३ फेब्रुवारी, २०१० रोजी दिलेल्या संमतीनुसार, निर्णयात नमुद केलेला समझोता अर्ज तयार करणेकामी संस्थान वकिल ॲड. श्री. आर. एन. धोर्डे, उच्च न्यायालय वकील, औरंगाबाद खंडपीठ यांना माहे एप्रिल, २०१० मध्ये कळविणेत आले.

**(ड)** उपरोक्त **परिच्छेद अ, ब** व **क** मध्ये नमुद केलेल्या सर्व बाबींचा विचार करतां, अर्जदारांनी त्यांचे दिनांक ०३ ऑगष्ट, २०१२ रोजीचे अर्जात नमुद केलेला तपशील / बाबी या वस्तु:स्थितीला धरुन नाहीत, त्याबाबत सविस्तर विवेचन उपरोक्त परिच्छेदांमध्ये करणेत आलेले आहे.

**आता,** अर्जदार श्रीमती संजीवनी दशरथ महांबरे व इतर ०२ यांनी दिनांक ०३ ऑगष्ट, २०१२ रोजी दिलेल्या अर्जात नमुद केलेल्या विनंतीनुसार खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती :

**०१.** विषयांकित मौजे शिर्डी हद्दीतील सर्व्हे नंबर १४८/१ पैकी क्षेत्र ०४ हे ७५ आर ५० चौमी चे भूसंपादन प्रस्तावाबाबत तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक २१ जून, २००९ रोजीचे निर्णय क्रमांक ५६० नुसार कार्यवाही पुर्ण करणेत यावी किंवा कसे ?

**०२.** अर्जदार यांनी दिनांक ०३ ऑगष्ट, २०१२ रोजीचे अर्जाने विनंती केलेनुसार, विषयांकित भूसंपादन प्रस्ताव पूर्णपणे वगळणेत यावा किंवा कसे ?

**निर्णय क्र.८१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती संजीवनी दशरथ महांबरे व इतर २ यांचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १४८/१ मधील क्षेत्र ०५ हे ०२ आर चे भूसंपादनासंदर्भात मा.न्यायालयात न्यायप्रविष्ठ असलेल्या केसमध्ये होणाऱ्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय न.१२** **साईनगर कर्मचारी वसाहत परिसरात साईचिंतन, समर्पण व साईध्यान इमारतीचे भोवती पेव्हिंग ब्लॉक बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे साईनगर परिसरातील कर्मचारी वसाहत परिसरातील इमारतींच्या भोवतालच्या भागात पावसाळयात चिखल होवू नये तसेच परिसर स्वच्छ राहावा व साफसफाईचे काम करणे सोयीचे व्हावे या दृष्टीने साईनगर, समर्पण, साईचिंतन व साईध्यान इमारतींचे भोवती पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि. १४/०१/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ०४ अन्वये रु. १९,७६,२०३/- मात्र रकमेचे काम ठेकेदार मे. बनकर पाटील ॲण्ड कंपनी, श्रीरामपूर यांना देणेत आलेले असून ठेकेदार यांनी सदरहू काम पूर्ण केलेले आहे.

समर्पण, साईनगर, साईध्यान क्र. १ व २ या इमारतींचे मागील भागातून ड्रेनेज व पाण्याच्या लाईन गेलेल्या आहेत, तसेच सदरचे भागात पावसाळ्याचे दिवसात पाणी साचून, गवताची वाढ होऊन मोठ्या प्रमाणात डासांचा प्रादुर्भाव होत असतो, तसेच सदर भागाची साफ-सफाई करणे जिकीरीचे होत असल्याने, या भागातही पेव्हिंग ब्लॉक बसविणे आवश्यक आहे.

करीता उपरोक्त भागात सुमारे १८०० चौ. मीटर भागामध्ये खोदाई करणे, सोलींग करणे व ६० एम. एम. जाडीचे पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी सन २०११-१२ चे जिल्हा दरसूची (DSR) नुसार तयार करणेत आलेल्या अंदाजपत्रकानुसार रु. १४,३१,५००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी विषयांकीत कामासाठी येणारे रु. १४,३१,५००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहित पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मंजूरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर कर्मचारी वसाहत परिसरात साईचिंतन, समर्पण व साईध्यान इमारतीचे भोवती पेव्हिंग ब्लॉक बसविणेस व त्याकामी येणाऱ्या रु. १४,३१,५००/- मात्रचे खर्चास तसेच सदरचे काम विहित पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मान्यता देणेत आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय न.१३** **साई गार्डन प्रकल्पाचे आर्किटेक्ट माथुर अँड काप्रे असोसिएटस् प्रा.लि., नवी दिल्ली यांचे लेजर शो कामापोटी फी मागणीबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे विवीध निर्णयांन्वये, मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं. १९८,१९९, २०० व २०१ मधील जागेत साई गार्डन प्रकल्पाचे काम करणेस मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार नियोजित साईगार्डन प्रकल्पाचे लेजर शो करीता आवश्यक सिव्हील कामांसाठी आराखडे, अंदाजपत्रके व निविदा कागदपत्रे तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२४१ अन्वये रु.४६ कोटी खर्चाचे प्रस्तावास मान्यता देणेत आली होती. सदर काम तीन टप्प्यात करण्याचे ठरले होते. तसेच आर्कीटेक्ट माथुर अँड काप्रे असोसिएटस् प्रा. लि., नवी दिल्ली यांची प्रकल्पाचे किंमतीचे २.५% अधिक सर्व्हिस टॅक्स याप्रमाणे फीवर नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आली आहे.

लेजर शो उभारणीबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५ सप्टेंबर, २०१० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६९३ अन्वये, खालील प्रमाणे निर्णय झाला.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रकल्प हा BOT तत्वावर राबविणेऐवजी थेट संस्थानतर्फे राबविण्यात यावा, असे ठरले. याकामी लेझर शो उभारणीसाठी जागतिक पातळीवर निविदा मागविणेत याव्यात. लेझर-शोचे उभारणीसाठी आवश्यक सिव्हील वर्क व संपूर्ण गार्डन विकसीत करणेसाठी आवश्यक असलेल्या इतर कामांसाठी स्वतंत्ररित्या राष्ट्रीय पातळीवर निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले.

तसेच, ४D शो व इतर वैशिष्ट्यपूर्ण कामांचे परिपूर्ण उभारणीसाठी राष्ट्रीय पातळीवर निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले."

वरील निर्णयानुसार साईगार्डन प्रकल्पाचे लेजर शोसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५ डिसेंबर, २०१० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ९७४ अन्वये लेजर व्हिजन मेगा मिडीया लि., हॉंगकॉंग यांना US$ ५५,००,००० मात्रचा कार्यादेश देणेत आला आहे.

लेजर शो प्रकल्पाकरीता आर्किटेक्ट काप्रे यांचेमार्फत घ्यावयाच्या सेवांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

०१) लेजर शो प्रकल्पासाठी Request for Propsal (RFP) document अंतीम केले.

०२) लेजर शो करीता ठेकेदारांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे मुल्यांकन केले. व योग्य ठेकेदाराची शिफारस केली.

०३) लेजर व्हिजन यांची करारनाम्यानुसार देय्य बिले प्रमाणीत करणे.

०४) लेजर व्हिजन यांचेशी समनवय साधणे.

लेजरव्हिजन लि. हॉंगकॉंग यांचेमार्फत उभारण्यात येणारे लेजर शोचे काम हे अतिविशिष्ठ स्वरुपाचे आहे. त्यामुळे सामान्यपणे आर्कीटेक्ट यांचेमार्फत सिव्हील वर्कसाठी देण्यात येणाऱ्या सेवांची तुलना सदर कामाशी करता येणार नसल्याने, आर्किटेक्ट यांनी लेजर शो प्रकल्प किमतीच्या २.५% फी ऐवजी १.५०% फी अधिक सर्व्हिस टॅक्ससह कामाचे प्रगतीनुसार मागणी केली आहे. त्यानुसार त्यांनी लेजर शो प्रकल्पासाठी रु. २५ कोटी रकमेच्या १.५% प्रमाणे फी रुपये ३७,५०,०००/- मात्र अधिक सर्व्हिस टॅक्स इतक्या फी ची मागणी केली आहे.

आर्किटेक्ट यांनी मागणी केलल्या फी बाबत तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ फेब्रुवारी, २०१२ रोजीचे सभेत झालेल्या निर्णयानुसार, त्यांना मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे समक्ष चर्चेस बोलवून, त्यांना आदा करावयाचे फी बाबत निर्णय घेता येईल.

तरी याकामी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईगार्डन व या प्रकल्पासारखे सध्या चालु अथवा प्रलंबीत असलेले इतर सर्व प्रकल्प व त्यासाठीचा खर्च इ.कारणांसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मंजुरी घ्यावयाची असल्याने सदरचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा व मा.खंडपीठाचे मान्यतेनंतर उपरोक्त प्रस्तावाबाबत कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय न.१४** **साई गार्डन प्रकल्पाचे आर्किटेक्ट माथुर अँड काप्रे असोसिएटस् प्रा.लि., नवी दिल्ली यांचे सिव्हील वर्क पोटी फी मागणीबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीचे विवीध निर्णयांन्वये, मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं. १९८,१९९, २०० व २०१ मधील जागेत साई गार्डन प्रकल्पाचे काम करणेस मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार नियोजित साईगार्डन प्रकल्पाचे सिव्हील वर्कसाठी आराखडे, अंदाजपत्रके व निविदा कागदपत्रे तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२४१ अन्वये रु.४६ कोटी खर्चाचे प्रस्तावास मान्यता देणेत आली होती. तसेच आर्कीटेक्ट माथुर अँड काप्रे असोसिएटस् प्रा. लि., नवी दिल्ली यांची प्रकल्पाचे किंमतीचे २.५% अधिक सर्व्हिस टॅक्स याप्रमाणे फीवर नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आली आहे.

**०१)** आर्कि. काप्रे यांनी संस्थानमार्फत करावयाचे नियोजित साई गार्डन प्रकल्पासाठी जुलै, २००९ मध्ये प्रथम अंदाजपत्रक, नकाशे व निविदा मसुदा तयार केले होते. यावर मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ सप्टेबर, २००९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७३१ (८) अन्वये, खालील प्रमाणे निर्णय झाला.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे यांचेमार्फत याकामी सविस्तर आराखडा व अंदाजपत्रक तयार केलेले आहेत, त्यानुसार ३० वर्षाचे कालावधी करिता बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (B.O.T.) या तत्वावर उपरोक्त नमूद केल्यानुसार साईगार्डनची निर्मिती करण्यास व याकामी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (B.O.T.) या तत्वावर साईगार्डन निर्मितीसाठी इच्छुकांकडून कालावधी, अपेक्षीत खर्च, संस्थानसाठी यामधून किती उत्पन्न मिळेल यासर्व बाबींसह सविस्तर प्रस्ताव मागविणेत यावेत, असे ठरले."

०२) उपरोक्त निर्णयानुसार काप्रे यांनी तयार केलेले अंदाजपत्रक, नकाशे व निविदा पुस्तीका रद्द करुन त्यांचेकडून BOT तत्वावर साईगार्डन प्रकल्पाची उभारणी करणेसाठी आवश्यक असणारे RFP Document, नकाशे तयार करुन घेणेत आले व त्यानुसार प्रस्ताव मागविणेत आले सदरचे प्राप्त झालेले प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५ सप्टेंबर, २०१० रोजीचे सभेत उघडणेसाठी सादर करणेत आले. सदर सभेतील निर्णय क्रमांक ६९३ अन्वये, खालील प्रमाणे निर्णय झाला.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रकल्प हा BOT तत्वावर राबविणेऐवजी थेट संस्थानतर्फे राबविण्यात यावा, असे ठरले. त्यामुळे BOT तत्वावरील प्रकल्पासाठी प्राप्त झालेले दोन प्रस्ताव रद्द करण्यात यावेत. याकामी लेझर शो उभारणीसाठी जागतिक पातळीवर निविदा मागविणेत याव्यात. असे ठरले.

वरील निर्णयानुसार साईगार्डन प्रकल्पाचे सिव्हील कामासाठी ठेकेदार के. आर. आर. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., हैद्राबाद यांना रुपये ३०,९५,२७,६६६/- मात्र रकमेचा कार्यादेश देणेत आला आहे. २.५% फी अधिक सर्व्हिस टॅक्ससह एकुण रु.८५,३५,२२६/- मात्र इतकी रक्कम याकामी फीपोटी द्यावी लागणार आहे. त्यापैकी आर्किटेंक्ट यांनी दिलेल्या सेवेनुसार त्यांना आजपावेतो सर्व्हिस टॅक्ससह रु.१८,६९,९६०/- मात्र फी अदा करणेत आली आहे. उर्वरीत फी त्यांना करारनाम्यातील शर्तीनुसार टप्प्याटप्प्याने अदा करणेत येईल.

**(ब)** आर्किटेक्ट यांचे समवेत झालेल्या करारनाम्यानुसार सदर प्रकल्पासाठी आर्किटेक्ट यांना प्रकल्पाचे किंमतीच्या २.५% फी अधिक सर्व्हिस टॅक्ससह खालील टप्प्याने फी अदा करावयाची आहे.

| | | |
|---|---|---|
| Stage-1 | On signing of contract, awarding the architectural work | 5% of total fees payable |
| Stage-2 | on approval of plans & estimates | 10% of total fees payable, less amount paid at Stage 1. |
| Stage-3 | on award of the work to the contractor finally selected for its execution and release of working drawings | 20% of total fees payable, less amount paid up to Stage 2. |
| Stage-4 | During the progress and on completion of the construction work. | 70% of the total fees payble at prorata with the progress of work. |
| Stage-5 | On Completion of the project. | Balance 10% of the total fees payable on successful completion of the project and commissioning of all equipments and on release of as-built drawings. |

आर्किटेक्ट काप्रे यांनी यापूर्वी वरिल **"अ"** मधील ०१ व ०२ नुसार दिलेल्या सेवांपोटी मिळून एकुण रुपये १९,५७,२७४/- मात्र अतिरीक्त बिलाची मागणी केली होती. त्यांचे फी बाबत मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ फेब्रुवारी, २०१२ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन, निर्णय क्रमांक २१८ अन्वये, आर्किटेक्ट यांचेशी मा. उपसमितीचे सभेपुढे चर्चा करुन निर्णय घेणेत यावा असे ठरले.

त्यानंतर आर्किटेक्ट यांनी त्यांचे दिनांक ०३ ऑगस्ट, २०१२ रोजीचे पत्राने उपरोक्त अ मधील ०१ व ०२ नुसार सिव्हील वर्कसाठी दिलेल्या सेवांपोटी रुपये १६,८५,४००/- मात्र सुधारीत फीची मागणी केली आहे. त्यांचे सुधारीत फीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **Sr. no.** | **Fee Stage** | As per architect's bill | |
|---|---|---|---|
| | | Initial Estimate Rs.23.66 crores | RFPDocuments made for BOT, Rs.23.66 crores |
| | | **A** | **B** |
| 01 | Stage-1 (5% of total fees payable) On signing of contract, awarding the architectural work | Lump Sum | Lump Sum |
| 02 | Stage-2 (10% of total fees payable) on approval of plans & estimates | Lump Sum | Lump Sum |
| 03 | Stage-3 (20% of total fees payable, less amount paid up to Stage 2.) on award of the work to the contractor finally selected for its execution and release of working drawings | Lump Sum | Lump Sum |

| | | |
|---|---|---|
| Total Amount of fees | 10,00,000/- | 5,00,000/- |
| Add Service tax @ 12.36% | 1,23,600/- | 61,800/- |
| Total Amount Rs. | 11,23,600/- | 5,61,800/- |
| Total A+B Rs. | 16,85,400/ | |

आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो., नवी दिल्ली यांनी उपरोक्त तक्यात दर्शविलेप्रमाणे A व B चे कामांपोटी सर्व्हीस टॅक्ससह एकुण रुपये १६,८५,४००/- मात्र रक्कमेची मागणी केली आहे.

आर्किटेक्ट यांनी मागणी केलेल्या फी बाबत तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ फेब्रुवारी, २०१२ रोजीचे सभेत झालेल्या निर्णयानुसार, त्यांना मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे समक्ष चर्चेस बोलवून, त्यांना आदा करावयाचे फी बाबत निर्णय घेता येईल.

तरी याकामी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईगार्डन व या प्रकल्पासारखे सध्या चालु अथवा प्रलंबीत असलेले इतर सर्व प्रकल्प व त्यासाठीचा खर्च इ.कारणांसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मंजुरी घ्यावयाची असल्याने सदरचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा व मा.खंडपीठाचे मान्यतेनंतर उपरोक्त प्रस्तावाबाबत कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय न.१५** **शिर्डी शहरासाठी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजना राबविणेकामी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना संस्थान मालकीची जमीन उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी माहे जानेवारी, २००९ व तद्नंतर वेळोवेळी केलेल्या पत्रव्यवहारानुसार व तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयानुसार, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस दिनांक २६ डिसेंबर, २०११ रोजी, शिर्डी शहरासाठी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजना राबविणेकामी संस्थान मालकीची मौजे निमगांव कोऱ्हाळे, तालुका राहाता हद्दीतील गट नंबर २५० पैकी मधील क्षेत्र ०१ हे ८५ आर ही जमीन शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस विनामुल्य हस्तांतरीत करणेस मान्यता देणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने, मा. कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक सासंवि-२०१२/५१/प्र.क्र.७/का.सोळा, दिनांक ११ सप्टेंबर, २०१२ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे कळविले आहे :

*" .. दरम्यानचे कालावधीत जनहित याचिका क्र. २७ /२०१२ प्रकरणी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने मा. प्रधान जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती नियुक्ती केली असून सद्य :स्थितीत श्री साईबाबा संस्थानचा कारभार सदर समितीकडून हाताळण्यात येत असल्याने उपरोक्त प्रस्ताव त्रिसदस्यीय समितीसमोर ठेवून समितीचे अभिप्राय घेण्यात यावेत, ही विनंती. "*

मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी कळविलेप्रमाणे विषयांकित प्रस्तावाबाबत मा. त्रिसदस्यीय समितीचे अभिप्रायार्थ खालीलप्रमाणे प्रस्ताव करणेत येत आहे :

**(ब)** विषयाची पूर्वपीठीका :

**०१.** शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांच्या तत्कालीन नगराध्यक्षा तथा मा. व्यवस्थापन समितीच्या सदस्या यांनी तसेच मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दिनांक २२ जानेवारी, २००९ रोजीचे पत्राने व तद्नंतर वेळोवेळी करणेत आलेल्या पत्रव्यवहाराने, केंद्र शासनाच्या शहरी विकास व शहरी रोजगार दारिद्रय निर्मुलन मंत्रालयाने, जवाहरलाल नेहरु पुनरुत्थान अभियानांतर्गत शिर्डी शहरातील झोपडीपट्टीवासियांचे निर्मुलन व पुन:र्वसन करणेसाठी, शिर्डी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजना राबविणेसाठी संस्थान मालकीची मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील गट क्रमांक २५० पैकीमधील जमीन मिळावी म्हणून विनंती केलेली होती.

**०२.** उपरोक्त प्रस्तावावर, तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८ फेब्रुवारी, २००९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७५ (३६) नुसार, संस्थान मालकीच्या मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील गट नंबर २५० पैकी मधील आवश्यक अशी जागा / जमीन उपलब्ध करुन देणेस अधिनियमातील तरतुदीस व शासनाच्या मान्यतेस अधिन राहून तत्वत: मान्यता देणेत आली.

**०३.** मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, इकडील दिनांक ३० जानेवारी, २००९ रोजीचे पत्राने मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना, शिर्डी शहरासाठी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमासाठी संस्थानमार्फत जागा उपलब्ध करुन देणेबाबत, अधिनियमातील तरतुदीस व शासन मान्यतेस अधिन राहून तत्वत: मान्यता देणेत आलेली आहे, तसेच शिर्डी शहरातील झोपडपट्टीवासियांचे प्राथमिक सर्व्हेक्षण करुन, याकामी किती जमीन उपलब्ध करुन द्यावी लागेल याबाबतचा प्राथमिक अहवाल संस्थानकडे सादर करणेबाबत कळविणेत आले होते. तसेच, इकडील दिनांक १९ जुलै, २०११ रोजीचे पत्राने, विषयांकित प्रकल्पासाठी नियोजित केलेली संस्थान मालकीची मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील गट नंबर २५० क्षेत्र ०१ हे ८५ आर

आवश्यक आहे किंवा कसे, तसेच सदर जमिनीची किंमत सन २०११ चे शासकीय मुल्यांकन तक्त्यानुसार रुपये ८०.९३ लक्ष होत आहे, ती देणेस तसेच जागा हस्तांतरणासाठी येणारा खर्च करणेस नगरपंचायत तयार आहे किंवा कसे, याबाबत विचारणा करणेत आली होती.

**०४.** त्यावर, मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक २२ सप्टेंबर, २०११ रोजीचे विनंती पत्राने खालीलप्रमाणे कळविले होते, त्याचा थोडक्यात तपशील :

I. मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट क्रमांक २५० क्षेत्र ०१ हे ८५ आर चे जमिनीची किंमत, सन २०११ चे शासकीय मुल्यांकन तक्त्यानुसार रुपये ८०,९३,७५०/- इतकी नगरपंचायतीस भरणे शक्य होणार नाही, तरी सदर जागा नगरपंचायतीस विनामुल्य मिळावी.

II. सदरची जागा बक्षीसपत्राने घेणेसाठी बक्षीसपत्र नोंदविण्यासाठी मुद्रांक शुल्क, नोंदणी फी इ. येणारा खर्च शिर्डी नगरपंचायत करण्यास तयार आहे.

III. एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजने अंतर्गत ३७६ घरे बांधण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीने सादर केलेल्या प्रकल्प अहवालास केंद्र शासनाने त्यांचेकडील दिनांक २७ जुन, २०११ रोजीचे पत्राने मंजुरी दिलेली आहे. सदर प्रकल्पाचा खर्च अंदाजे रुपये ७७३.७३ लक्ष मात्र इतका आहे.

**०५.** तद्नंतर, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे उपरोक्त दिनांक २२ सप्टेंबर, २०११ रोजीचे विनंतीपत्र- वजा- प्रस्तावावर तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ व दिनांक १४ जानेवारी, २०१२ रोजीचे सभेत अनुक्रमे निर्णय क्रमांक ८११ व ०१ मध्ये खालील निर्णय घेणेत आलेला होता :

" .. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना त्यांनी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे शिर्डी शहरातील झोपडपट्टी निर्मूलन करणे / झोपडपट्टीवासियांचे पुर्नवसन करणेसाठी मा. शासनाने नगरपंचायतीच्या मंजूर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन शिर्डी शहरासाठी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजना राबविणेसाठी संस्थान मालकीची मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील गट नंबर २५० पैकी मधील क्षेत्र ०१ हेक्टर ८५ आर ही जमीन विनामुल्य उपलब्ध करुन देणेत यावी / हस्तांतरीत करणेत यावी. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी जमीन हस्तांतरणासाठी करावे लागणाऱ्या बक्षिसपत्राचा नोंदणी खर्च (मुद्रांक व नोंदणी शुल्क आदि) करावा. संस्थान वकिलांमार्फत नगरपंचायतीकडून प्राप्त होणारा बक्षिसपत्राचा मसुदा तपासणी करणे, अभिप्राय घेणे आदि कार्यवाही करणेत यावी, याकामी लागणारा अनुषंगिक खर्च संस्थानने करावा. तसेच अधिनियमातील तरतुदीनुसार मा. शासनाकडे जमिनीचे विनामुल्य हस्तांतरणासाठी प्रस्ताव सादर करुन शासन मान्यता घेणेत यावी, असे ठरले. याकामी संस्थान कायदे सल्लागार यांचा अभिप्राय घेण्यात यावा, असे ठरले. सदरहू निर्णयास मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर यांनी विरोध दर्शविला."

**०६. दरम्यानचे कालावधीत,** मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दिनांक ०४ नोव्हेंबर, २०११ व २५ नोव्हेंबर, २०११ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे कळविले होते :

" .. .. सदर प्रकल्पास केंद्र शासनाकडून २७ जून, २०११ अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. शिर्डी नगरपंचायत मार्फत प्रकल्पाच्या रु. ७,१७,३७,३१६/- मात्र रक्कमेच्या अंदाजपत्रकांना तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली आहे. त्यापैकी रु.२८२.९२९ लक्ष एवढे अनुदान केंद्र शासनामार्फत दिनांक २५ ऑक्टोबर, २०११ रोजी नगरपंचायतीस प्राप्त झालेले असून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांचेकडील जा. क्र. प्राधि / विनि / मनिनि / आयएचएचडीपी / २७७९ / ११, दिनांक ०१ नोव्हेंबर, २०११ रोजीचे पत्राने प्राप्त निधीचा विनियोग ज्या योजनेसाठी केला आहे, त्याच योजनेसाठी तीन महिन्यात करणे आवश्यक आहे. अन्यथा शासनाचे परिपत्रक क्रमांक जनियो-२००९/प्र.क्र.१२८/गृनियो-२, दिनांक ०१ डिसेंबर, २००९ अन्वये वितरीत करण्यात आलेल्या निधीवर पी.एल.आर.नुसार व्याज आकारण्यात येईल, याबाबतच्या सुचना दिल्या आहेत.

कृपया सदर योजनेकरीता प्रकल्पाच्या कामाच्या निविदा मागवुन प्रत्यक्ष कामास सुरुवात करावयाची असलेने व सदरचे काम शासनाने ठरवुन दिलेल्या मुदतीत करावयाचे असल्याने प्रकल्पाची जागा गट क्रमांक २५० मधील क्षेत्र ०१ हे ८५ आर नगरपंचायतीकडे त्वरीत वर्ग करणेस विनंती आहे. "

**०७.** तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयांनुसार, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस इकडील दिनांक २६ डिसेंबर, २०११ रोजीचे पत्राव्दारे, विषयांकित प्रकल्प राबविणेसाठी संस्थान मालकीची मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील गट नंबर २५० मधील क्षेत्र ०१ हेक्टर ८५ आर ही खुली जागा / जमीन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ण), कलम २१(२)(दोन) आणि कलम १७(३) तरतुदीनुसार शिर्डी

नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस विनामुल्य हस्तांतरीत करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

०८. सद्यःस्थितीत आता, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी परिच्छेद अ मध्ये नमुद केलेप्रमाणे दिनांक ११ सप्टेंबर, २०१२ रोजीचे पत्राने, विषयांकित प्रस्ताव त्रिसदस्यीय समितीसमोर ठेवून समितीचे अभिप्राय घेणेत यावेत, असे कळविले आहे. त्यास अनुसरुन, विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यालयीन टिपणी सादर करणेत येत आहे :

**(क) विषयांकित प्रस्तावाच्या अनुषंगाने महत्वाच्या बाबी :**

**०१.** मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी सन २००५ मध्ये जाहिर केलेल्या भूसंपादन निवाडयानुसार, मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील विखुरलेल्या स्थितीतील क्षेत्र ४५ हेक्टर ६४ आर या पूर्वी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मालकीच्या असलेल्या जमिनी संस्थानला भूसंपादनाच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. भूसंपादन कायदा, १८९४ मधील तरतुदीनुसार मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना करुन देणेत आलेल्या करारानुसार, सदरच्या जमिनी रुग्णालये व तद्अनुषंगाने इतर सार्वजनिक कामाचे / वापराचे प्रयोजनार्थ मिळालेल्या आहेत. या जमिनीपैकीच विषयांकित प्रकल्पासाठी उपलब्ध करुन द्यावयाची मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील गट नंबर २५० पैकी मधील क्षेत्र ०१ हेक्टर ८५ आर ही जमीन आहे.

**०२.** तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १४ जानेवारी, २०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७५ नुसार, मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील भूसंपादनाने मिळालेल्या जमिनींच्या वापराच्या प्रयोजनामध्ये भक्तोपयोगी / लोकोपयोगी विविध सार्वजनिक उपक्रमांसाठी / कामासाठी / विकास प्रकल्प राबविणे असा बदल करणेसाठी मा. महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस दिनांक ०७ ऑगष्ट, २०१२ रोजी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदर प्रस्ताव मा. शासन स्तरावर विचाराधीन आहे.

**०३.** विषयांकित प्रकल्पासाठी उपलब्ध करुन द्यावयाची संस्थान मालकीची जमीन ही संस्थानला भूसंपादनाच्या माध्यमातून मिळालेली असल्याने, सदर जमीन शिर्डी नगरपंचायतीस उपलब्ध करुन देणेकामी मा. महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणे आवश्यक राहील.

०४. तसेच, विषयांकित प्रकल्पासाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधील कलम १७ (२) (ण) मधील *मानवजातीचे कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल* तसेच कलम २१ (२) (दोन) मधील *स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करणे* या तरतुदींनुसार जमीन उपलब्ध करुन देता येईल. तथापि, तसेच अधिनियमातील कलम १७ **(३)** मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रामित करण्यात येणार नाही या तरतुदीनुसार संस्थानची स्थावर मालमत्ता नगरपंचायतीस विशिष्ट कारणासाठी उपलब्ध करुन देणेबाबत मा. शासनाची मंजुरी मिळणे आवश्यक राहील.

**(ड)** उपरोक्त परिच्छेदांत विवेचन केलेनुसार, शिर्डी शहरासाठी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजना राबविणेकामी संस्थान मालकीची मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील गट नंबर २५० पैकी मधील क्षेत्र ०१ हे ८५ आर जमीन शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना विनामुल्य हस्तांतरीत करणेस/ उपलब्ध करुन देणेस मा. त्रिसदस्यीय समितीचे अभिप्रायास्तव सादर.

**निर्णय क्र.८१४ यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांच्या एकूण असणाऱ्या सर्व मागण्यांचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो पुढील सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय न.१६ श्री साईबाबा रुग्णालयातील मध्यवर्ती औषध भांडारातील Walk in Fridge ची सुरक्षेच्या दृष्टीने जागा बदलणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे मध्यवर्ती औषध भांडारात दोन्ही रुग्णालयाचे लॅब केमीकल्स, इंजेक्शन त्यासाठी फ्रिजमध्ये (२ to ८°c) ठेवणे गरजेचे असते. अशी केमीकल्स व इंजेक्शन ठेवण्यासाठी सन २००९ मध्ये मा. व्य. स. दि. २१.०६.२००९ चे सभेतील निर्णय क्र. ५१६ अन्वये एक नग मे. मेगास्टार इंजिनिअरींग, पुणे यांचे कडून Blue Star कंपनीचा Walk in fridge रु. ५८५९७४/- इतक्या रकमेत खरेदी करुन तो दि. १९.०९.२००८ रोजी औषध भांडारात बसविण्यात आलेला आहे.

सदर फ्रिज बसवल्यापासून आजतागायात व्यवस्थित काम देत आहे. सदर फ्रिज हा २४ तास चालू ठेवावा लागतो. परंतु सदर फ्रिज औषध भंडाराचे मागील बाजूस आहे. औषध भांडार बंद

करते वेळी इतर सर्व विदयुत पुरवठा बंद करण्यात येतो प्रशासन शाखेकडील दि. ३१.०७.२०१२ चे परिपत्रकान्वये आगीचे संरक्षणापासून बचाव करणेसाठी विद्युत विभागाने संपूर्ण औषध भांडार (तळमजल्या) साठी एक मेनस्विच बसवून दिलेला आहे. परंतु सदर फ्रिज हा २४ तास चालू ठेवावा लागत असल्यामुळे तो मेन स्विचवर घेता येणार नाही कारण औषध भांडार बंद झाल्यावर भांडारचा विद्युत पुरवठा बंद होईल. तेव्हा सदर फ्रिज हा २४ तास चालु ठेवण्याचे दृष्टीने त्याची जागा बदलून तो मध्यवर्ती औषध भांडाराचे आत येण्याचे जिन्या समोरील असलेल्या रिकामे जागेत बसवलेस सुरक्षेचे दृष्टीने योग्य होईल कारण रुग्णालयात इतर ठिकाणी जागा शिल्लक नाही. व मुख्य औषध भांडाराचे बाहेरील बाजुस असल्यामुळे २४ तास विद्युत पुरवठा देखील चालु ठेवता येईल.

याकामी में. मेगास्टार इंजिनिअरींग, पुणे यांचे प्रतिनिधी यांना रुग्णालयात समक्ष बोलावण्यात आले होते त्यांनी जागेची पाहणी करुन आपण सुचविलेल्या जागेत सदर फ्रिज बसवता येईल असे सांगितले असून सदर फ्रिज स्थलांतरीत (Shifting) साठी रु.८८८३३/-खर्च दि.१७/०८/२०१२ चे इ-मेल पत्राअन्वये कळविले आहे, त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे -

| Sr. No. | Description | Rate | Qty. | Value | + 12.5 % Vat |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Supply of cupper pipe, Sealant, Wiring harness, Insulation, R22 top up gas | 49000.00 | Lot | 49000.00 | 55125.00 |
| 2 | Dismantling of existing cold room (81.5″x81.5″x77″) and installation of same | 30000.00 | Lot | 30000.00 | 33708.00 |
| | Grand total | | | **79000.00** | **88833.00** |

वरील पैकी मटेरियलसाठी ७०% रक्कम आगऊ ३०% फ्रिज चालू झालेनंतर मागणी केलेली आहे.

सुरक्षेच्या दृष्टीने सदर फ्रिज प्रस्तावित जागेवर स्थलांतरीत करणे योग्य होईल तेव्हा मे. मेगास्टार इंजिनिअरींग, पुणे यांना आजचे सभेपुढे दरात सुट मिळणेकामी समक्ष बोलावून निर्णय घेता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती .

**निर्णय क्र.८१५ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. मेगास्टार इंजिनिअरींग, पुणे यांना पुढील सभेपुढे समक्ष बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं. १७ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कँटीन चालविणेकामी मुदतवाढ देणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री प्रदिप रमेश येवले, श्री साईप्रभा अपार्टमेंट, प्लॅट नं.०४, श्री साईश्रध्दा हौसिंग सोसा. जवळ, शिरडी ता. राहाता, जि.अ.नगर यांना जा.क्र.एसएसएस/वशी-एसएसबीएच/१०२६/२०१० दि. १६/०६/२०१० चे आदेशातील अटी-शर्तीस अनुसरुन जा.क्र.एसएसएस/एसएसबीएच/एचआर / १५०६/२०११, दि.२१.०६.२०११ चे आदेशान्वये श्री साईबाबा हॉस्पीटलमधील कॅन्टीन दि. १८/०६/२०११ पासून पुढे १२ महिने कालावधीसाठी मासिक रु. १८,०००/- भाडेतत्वावर चालविणेस देण्यात आलेली आहे. सदर मुदत दि. १७/०६/२०१२ रोजी संपुष्टात आलेली आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटल कॅन्टीनमध्ये ठेवण्यात येणारे खाद्यपदार्थ व पेय यांचे दर मा. कार्यकारी अधिकारी व वैद्यकिय संचालक यांनी निश्चित करुन जाहिरातीव्दारे निविदा मागविणेत याव्यात. दरम्यानचे कालावधीत सध्याचे कॅन्टीन ठेकेदार यांना दि. १८/०६/२०१२ पासून पुढे तीन महिने कालावधीसाठी अथवा नवीन कॅन्टीन ठेकेदार नेमणूक करणेची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत या दोहोंपैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पूर्वीचेच अटी-शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी असा निर्णय मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. १२/०६/२०१२ रोजीचे सभेमध्ये घेण्यात आलेला आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन जा. नं. एसएसएस/एसएसबीएच/एचआर/४३७/२०१२ दि. ३१/०७/२०१२ नुसार श्री प्रदिप येवले यांना तीन महिने कालावधीसाठी मुदतवाढ आदेश देण्यात आलेला आहे.

मा. त्रिसदस्यीय समितीचे निर्णयानुसार व मा. कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार एच आर मॅनेजर व अधिक्षक, श्रीसाईप्रसाद निवासस्थान विभाग यांनी एकत्र बसून साईआश्रम येथे सुरु करण्यात येणारी कॅन्टीन व श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये सुरु असलेली कॅन्टीन या दोन्ही कॅन्टीनमध्ये ठेवण्यात येणारे खाद्य पदार्थ व पेय यांचे दरपत्रक तयार केले असून सदर दरपत्रकास दि. १७/०८/२०१२ रोजीचे टिपणीअन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर दरपत्रकानुसार श्री साईबाबा हॉस्पीटलमधील कॅन्टीन चालविणेकामीची निविदा विक्रीबाबत वर्तमान पत्रामध्ये द्यावयाच्या जाहिरातीचा मसुदा मान्यतेसाठी सादर केला आहे. वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देणे, निविदा विक्री करुन नवीन कॅन्टीन ठेकेदार नेमणूक करणे या प्रक्रियेस साधारणतः दोन महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

श्री प्रदिप येवले यांना कॅन्टीन चालविणेकामी देण्यात आलेली मुदतवाढ दि. १७/०९/२०१२ अखेर संपुष्टात येत आहे. श्री साईबाबा हॉस्पीटलमधील रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक यांची चहा, नाष्टा आदींची गैरसोय होऊ नये म्हणून कॅन्टीन चालविणकामी निविदाप्रक्रियेव्दारे नवीन कॅन्टीन ठेकेदार नेमणूक करणेची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत श्री प्रदीप रमेश येवले यांना मुदतवाढ द्यावी लागणार आहे.

तरी, श्री साईबाबा हॉस्पीटलमधील कॅन्टीन चालविणेकामी नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत श्री प्रदिप रमेश येवले यांना मुदतवाढ देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.८१६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलमधील कॅन्टीन चालविणेसाठी नवीन ठेकेदाराची नेमणूक प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सध्याचेच ठेकेदार श्री. प्रदिप रमेश येवले, शिर्डी यांना सध्याचेच अटी/ शर्तीवर मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं. १८ सि.टी स्कॅन (64 Slice) मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागात मे. सिमेन्स लि. मुंबई या कंपनीचे Somatom Sensation 64 CT Scanner हे मशीन इकडील पुरवठा आदेश क्र. २८३३/२००५, दि. १५/०३/२००५ अन्वये एकुण रू. ३,९८,३७,८३५/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले असुन सदर मशिन करीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. १६/०७/२००६ रोजी संपला आहे. सदर सि. टी. स्कॅन मशिनची दि. ३१/०३/२०१२ रोजी घसारा वजा किंमत रू. ६२,०३,९९३.९० इतकी आहे. सदर मशीन खरेदी करतेवेळी मा. व्यवस्थापन समितीच्या दि. १३/०३/२००४ च्या सभेतील निर्णय क्र.९५ अन्वये पुढील कालावधीतील दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार कंपनीस देण्यात आलेल्या दि.१५/०३/०५ च्या पुरवठा आदेशातील अ.क्र .१५ अन्वये-

Comprehensive Maintenance Contract (CMC) price for the second year is Rs.30 Lacs. For subsequent years the escalation of 5% will be applicable. The service tax will be extra.

The CMC includes even the Tube of the CT. Under this contract all parts & labor will be given free of cost. Payment for CMC to be done at start of each year after the demand of company.

वरील अटीनुसार आजपावेतो मे. सिमेन्स लि. मुंबई यांचेकडे दरवर्षी सदर मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट खालीलप्रमाणे करण्यात आले होते.

| Sr. No. | Period | CAMC Amount Incl. of all Taxes in Rs. | Approx. Cost of Spare Parts in Rs. (replaced by Company in CAMC) | Total No. of Patients Done |
|---|---|---|---|---|
| 1 | 17/7/06 to 16/7/07 | 33,67,200.00 | 15,39,540.00 | 4919 |
| 2 | 17/7/07 to 16/7/08 | 35,39,340.00 | 89,596.00 | 7163 |
| 3 | 17/7/08 to 16/7/09 | 37,16,307.00 | 57,00,000.00 | 7684 |
| 4 | 17/7/09 to 16/7/10 | 38,30,581.00 | 74,00,000.00 | 9303 |
| 5 | 17/7/10 to 16/7/11 | 40,22,110.00 | 91,00,000.00 | 10662 |
| 6 | 17/7/11 to 16/7/12 | 42,23,216.00 | 65,00,000.00 | 11044 |

सध्या उपरोक्त वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दि. १६/०७/२०१२ रोजी संपत असुन मशीनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता करारनाम्यानुसार मे. सिमेन्स ली. मुंबई यांना खालीलप्रमाणे एकुण रू. ४५,१७,१९५/- इतकी रक्कम देय होत आहे.

| Sr. No. | CT Scan 64 slice CAMC Period | Last Year CAMC Basic amount in Rs. | 5 % Escalation in Rs. | Current Year Basic amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Dt. 17/07/2012 to Dt. 16/07/2013 | 38,28,845.00 | 1,91,442.25 | 40,20,287.25 |
| Service Tax 12.36 % | | | | 4,96,907.50 |
| Total Amount ( R/O) in Rs. | | | | 45,17,195.00 |

सदर कालावधीमध्ये कंपनी इंजिनीअर एकुण ४ वेळा नियमित सर्व्हीसींग करून मशिन ब्रेकडाऊनचे वेळी दुरूस्ती करीता आवश्यक असणारे सर्व स्पेअर पार्ट (एक्स-रे टयुबसह) बदलणार आहेत. त्याकरीता आवश्यक तितक्या वेळा भेटी देणार आहेत.

तरी Somatom Sensation 64 CT Scanner चे मे. सिमेन्स ली. मुंबई यांचेकडे दि. १७/०७/२०१२ ते दि. १६/०७/२०१३ या कालावधीसाठी कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु.४५,१७,१९५/- इतक्या रक्कमेच्या खर्चाची नोंद घेणेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.८१७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, Somatom Sensation 64 CT Scanner चे मे. सिमेन्स लि., मुंबई यांचेबरोबर दि.१७/०७/२०१२ ते दि.१६/०७/२०१३ या कालावधीसाठी केलेल्या कॉम्प्रेन्सीव्ह**

**वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट व सदर सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट साठी येणाऱ्या एकुण रु.४५,१७,१९५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं. १९ सन २०११-१२ मधील वार्षीक खरेदीमधील मंजुर दराने औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१०-२०११ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण १२२ पुरवठा धारकांना एकुण रक्कम रु. २३,३७,३८,६७४/- चे दि.२४/०९/२०११ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्यापैकी काही आयटमचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. सदरचे औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. तसेच कार्डीयाक रुग्णांच्या सततच्या वाढणाऱ्या संख्येमुळे औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याचा वापर देखील वाढलेला आहे.

त्यामुळे तुर्तास एक महिने पुरु शकेल इतकी औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्य खरेदी करावी लागणार आहेत.

सन २०१२ -२०१३ या वर्षाची वार्षीक औषधे खरेदीची प्रक्रिया पुर्ण झालेली असून त्यास मा उच्च न्यायलय औरंगाबाद यांचेकडून मान्यता प्राप्त होणे आहे. मान्यता मिळाल्यानंतर पुरवठा आदेश देणे व पुरवठा आदेश दिल्यानंतर माल प्राप्त होण्यास १५ दिवसांचा कालावधी असा एकुण १ महिन्याचा कालावधी लागेल असा अंदाज आहे. तोपर्यंत कामाची गैरसोय होऊ नये म्हणून खरेदी करावी लागणार आहे. त्याचा तपशिल सोबतच्या तक्त्यात दर्शविलेला आहे. ती मा. व्यवस्थापन समिती सभेचे मान्य दराने (सन २०११-१२) खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

सदर औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळया मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु.१२,६९,०५८/- (अक्षरी रु. बारा लाख एकोणसत्तर हजार अठ्ठावन्न मात्र) इतका खर्च येणार आहे.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२४/०९/२०११ निर्णय क्रमांक ६७५ Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे. सदर निर्णयानुसार सदरचे खरेदीकामी रु.२५,०००/- पेक्षा जास्त खर्च आलेला आहे.

तरी औषधे व सर्जिकल साहित्य वरीलप्रमाणे वार्षिक मंजुर दराने खरेदी करुन झालेल्या खरेदीस व याकामी पुर्णांकित रक्कम रु.१२,६९,०५८/- (अक्षरी रु. बारा लाख एकोणसत्तर हजार अठ्ठावन्न मात्र) इतका खर्च आलेला आहे.

सदर खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.८१८ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०११-१२ मधील वार्षीक मंजुर दराने औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याच्या अतिरिक्त केलेल्या खरेदीची व याकामी आलेल्या रु.१२,६९,०५८/- मात्रचे खर्चाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं. २० प्रशिक्षणार्थ्यांना प्रॅक्टीस करणेस परवानगीबाबत.**

**प्रस्ताव-** सेन्ट लुक हॉस्पिटल, श्रीरामपुर मध्ये सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षामध्ये ते P.B. Bsc नर्सिंग ट्रेनिंग कोर्स सुरु करणार आहेत. MUHS ची पुर्तता करणेकरिता सदर कोर्सच्या थेअरी व क्लिनीकल अनुभवासाठी हॉस्पिटलच्या प्रशासकाने त्यांच्या विद्यार्थ्यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्रॅक्टीस करणेस परवानगी मिळणेबाबत दि. १३.०९.२०१२ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे.

दि. २६.३.२०११ रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये शिवा ट्रस्ट, औरंगाबाद, यांचे श्रीरामपुर येथील नर्सिंग कॉलेजच्या प्रशिक्षणार्थ्यांना प्रॅक्टीस करणेस परवानगी बाबतचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता, त्यास विषय नं. १५ निर्णय क्र. २५६ नुसार मान्यता देणेत आलेली आहे. व त्यांनी याकामाकरिता हॉस्पिटलला भेटही दिलेली आहे.

P.B.Bsc नर्सिंग कोर्स हा Bsc नर्सिंग नंतर केला जाणारा कोर्स असल्याने सदर कोर्सचे प्रशिक्षण घेत असलेले विद्यार्थी हे Bsc नर्सिंगच्या कोर्समध्येच प्रशिक्षीत झालेले असतात, त्यामुळे

त्यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्रशिक्षणाकरिता परवानगी दिल्यास त्यांची रुग्ण सेवेमध्ये चांगली मदत होऊ शकते.

तरी सेन्ट लुक हॉस्पिटल, श्रीरामपुर, यांचे P.B. Bsc नर्सिंग ट्रेनिंग कोर्सच्या प्रशिक्षणार्थ्यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्रॅक्टीसला परवानगी देणेबाबतच्या प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.८१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सेन्ट लुक हॉस्पिटल, श्रीरामपुर यांचे P.B. Bsc नर्सिंग ट्रेनिंग कोर्सच्या प्रशिक्षणार्थींना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्रॅक्टीस करणेस परवानगी देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं. २१** **जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत शस्त्रक्रियांचे सुधारित दर अंमलबजावणीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक यांनी दि.०१/१०/२०१२ रोजी ईमेल व्दारे संदर्भीय शासन निर्णयाची प्रत इकडील कार्यालयाकडे पाठविलेले आहे. सदर शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय एकसमान दरप्रणाली लागू करण्याच्या उद्देशाने, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतील शस्त्रक्रिया व उपचारांसाठी निश्चित केलेले दर, प्रचलित (सध्याच्या) जीवनदायी आरोग्य योजनेसाठी दि.०१/१०/२०१२ रोजी पासून लागू करण्यात आले आहेत.

संदर्भ क्र.०२ नुसार उपरोक्त विषयी मा.कार्यकारी अधिकारी यांचे समवेत चर्चा करण्यात आलेली असून सदर सभेत खालीलप्रमाणे अधिकारी/मॅनेजर्स उपस्थित होते.

(०१) डॉ.कौशिक मकवाना, प्र.वैद्यकीय संचालक, (०२) डॉ.हरिष बजाज, कार्डीओलॉजिस्ट,
(०३) डॉ.गौरव वर्मा, कार्डीओलॉजिस्ट, (०४) श्री.अशोक वाळुंज, जनसंपर्क अधिकारी,

सदर नवीन दरपत्रकानुसार काही शस्त्रक्रिया व प्रोसिजर्सचे दर, हे सध्याच्या दरांपेक्षा कमी असून विशेषतः कॅथलॅब प्रोसिजर्स, कार्डीयॅक सर्जरीमधील डबल व्हॉल्व रिप्लेसमेंट Bileflet Bioprothestic दोन व्हॉल्वस् करावयाचे शस्त्रक्रियांसाठी मोठया रकमेचा फरक आहे. सोबत विभागवार दरपत्रकाचे सविस्तर विवरण जोडण्यात आलेले आहे.

**SHRI SAIBABA HOSPITAL, SHIRDI**

**CATH LAB**

**Break-up of Estimated Expenses - Jeevandai Yojana, w.e.f. 1/10/2012**

| S. N. | Procedures/Surgeries | Pkg. Days | Cost of Implants | Consumables Disposables | Life Saving Medicine | Total Est. Expenses | J.D.Rates w.e.f. 1/10/2012 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | BMV | 3 | 13,750 | 10,000 | 4,250 | 28,000 | 20,000 |
| 2 | BAV / BPV / BCP | 3 | 31,250 | 6,000 | 2,750 | 40,000 | 30,000 |
| 3 | Angioplasty – 1 BM / Cobalt Chromium Stent | 3 | 24,000 | 30,000 | 9,000 | 63,000 | 60,000 |
| 4 | Angioplasty – 2 BM / Cobalt Chromium Stents | 3 | 48,000 | 35,000 | 9,000 | 92,000 | 80,000 |
| 5 | Angioplasty – 1 DE Stent | 3 | 40,000 | 30,000 | 9,000 | 79,000 | 60,000 |
| 6 | Angioplasty – 1 DE + 1 BM / Cobalt Chromium Stent | 3 | 60,000 | 35,000 | 9,000 | 104,000 | 80,000 |
| 7 | Peripheral Angioplasty | 3 | 86,000 | 30,000 | 9,000 | 125,000 | 125,000 |
| 8 | Renal Angioplasty – 1 Stent without Balloon | 3 | 33,000 | 25,000 | 9,000 | 67,000 | 60,000 |
| 9 | Renal Angioplasty – 2 Stents without Balloon | 3 | 66,000 | 27,000 | 9,000 | 102,000 | 80,000 |
| 10 | Balloon Angioplasty (POBA) | 3 | - | 30,000 | 9,000 | 39,000 | 60,000 |
| 11 | PDA Closer by Device | 3 | 44,000 | 21,000 | 7,000 | 72,000 | 60,000 |
| 12 | ASD / VSD Closer by Device | 3 | 67,000 | 21,000 | 7,000 | 95,000 | 80,000 |
| 13 | Pace Maker – V.V.I. | 4 | 53,000 | 15,000 | 7,000 | 75,000 | 75,000 |
| 14 | Pace Maker – V.V.I.R. | 4 | 58,000 | 15,000 | 7,000 | 80,000 | 75,000 |
| 15 | IVC Filter | 4 | 72,000 | 21,000 | 7,000 | 100,000 | 100,000 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 16 | Single Coil Immobilization | 3 | 6,000 | 9,000 | 5,000 | 20,000 | 20,000 |
| 17 | Multiple Coil Immobilization | 3 | 16,000 | 9,000 | 5,000 | 30,000 | 30,000 |

**CVTS**

| S. N. | Procedures/Surgeries | Pkg. Days | Cost of Implants | Consumables Disposables | Life Saving Medicine | Total Est. Expenses | J.D. Rates w.e.f. 1/10/2012 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | CABG (On Pump) | 13 | - | 80,000 | 45,000 | 125,000 | 125,000 |
| 2 | CABG (Off Pump) / Micas | 13 | - | 80,000 | 45,000 | 125,000 | 125,000 |
| 3 | CABG (On/Off Pump) with IABP | 13 | - | 80000 + 40000 = **120000** | 45,000 | 165,000 | 150,000 |
| 4 | AVR/MVR – (Mono Leaflet) | 13 | 32,000 | 50,000 | 20,000 | 102,000 | 120,000 |
| 5 | AVR/MVR – (Bi-leaflet) | 13 | 50,000 | 50,000 | 20,000 | 120,000 | 120,000 |
| 6 | MVR + TV Repair | 13 | 80,000 | 50,000 | 20,000 | 150,000 | 150,000 |
| 7 | MV / TV Repair | 13 | 30,000 | 50,000 | 20,000 | 100,000 | 100,000 |
| 8 | DVR – (Mono Leaflet) | 13 | 64,000 | 50,000 | 20,000 | 134,000 | 150,000 |
| 9 | DVR – (Bi-leaflet) | 13 | 100,000 | 50,000 | 20,000 | 170,000 | 150,000 |
| 10 | ASD/VSD Closer (ICR) | 13 | - | 60,000 | 15,000 | 75,000 | 75,000 |
| 11 | Peri Cardioctomy | 10 | - | 20,000 | 10,000 | 30,000 | 30,000 |
| 12 | PDA Closer | 8 | - | 15,000 | 5,000 | 20,000 | 20,000 |
| 13 | A V Fistula – Wrist | 2 | | 5,000 | 5,000 | 10,000 | 10,000 |
| 14 | A V Fistula – Elbow | 2 | | 12,000 | 8,000 | 20,000 | 20,000 |
| 15 | Peripheral embolectomy (without graft) | 5 | | 15,000 | 10,000 | 25,000 | 25,000 |
| 16 | TAPVC | 13 | | 75,000 | 20,000 | 95,000 | 95,000 |
| 17 | TOF | 13 | | | | | |
| 18 | Ruptured sinus of valsalva correction | 13 | | | | | |
| 19 | Amulus aortic ectasia with valved conduits | 13 | 90,000 | 50,000 | 20,000 | 160,000 | 150,000 |
| 20 | Ross procedure with special conduit | 13 | | | | | |

तरी उपरोक्त दरप्रणाली शासनाकडून तात्काळ लागू करण्यात आलेली असल्याने, उपरोक्त संदर्भ क्र.०२ चे झालेल्या चर्चेत ठरल्याप्रमाणे सोबत जोडण्यात आलेल्या दरपत्रकानुसार व खालील नियमानुसार प्रोसिजर्स/ शस्त्रक्रिया करण्यात याव्यात, असे ठरले आहे.

(०१) ज्या प्रोसिजर्स/ शस्त्रक्रियांसाठी हॉस्पिटलमध्ये तज्ञ कन्सल्टंट उपलब्ध नसून, बाहेरुन तज्ञ कन्सल्टंटस्ना निमंत्रित करुन करावयाच्या प्रोसिजर्स/ शस्त्रक्रिया शासन मान्य दरांमध्येच करण्यात याव्यात. उदा.VSD Closer by Device, ही प्रोसिजर ASD Closer च्या दरामध्येच करण्यात यावी.

(०२) एकाच रुग्णासाठी कोणत्याही कारणासाठी २ Drug Eluting Stent वापरण्यात येऊ नयेत, तसेच कार्डीओलॉजिस्ट यांनी Bear Metal / Chromium Plated Stents व Drug Eluting Stent चा उच्च दर्जा व त्यामुळे रुग्णांस होणारा लाभ, इत्यादी बाबींचे सविस्तर लेखी स्पष्टीकरण सादर करतील.

(०३) हॉस्पिटल खरेदी विभागाने, कार्डीओलॉजिस्ट यांच्या समन्वयाने कंपन्या / पुरवठादार यांचेकडून Drug Eluting Stent रु.४०,०००/- व त्यापेक्षाही कमीत-कमी किंमतीत उपलब्ध करण्याबाबत संबंधित कंपनी / पुरवठादारांकडून त्याबाबत त्यांचे लेखी संमतीपत्र प्राप्त करुन घेता येईल.

(०४) ज्या प्रोसिजर्स / शस्त्रक्रियांसाठी जादा फरकाची रक्कम रु.२५,०००/-, किंवा त्यापेक्षा अधिक राहणार असून मोठया रकमेची सवलत / चॅरिटी दयावी लागेल, अशा प्रोसिजर्स / शस्त्रक्रिया करण्यापूर्वी, उच्च दर्जाच्या इमप्लान्टस्ची उदा. Drug Eluting Stent, Rate Reponsive Pacemakers – VDDR, DDDR, Bileflet Bioprothestic Valves, इ. ची मागणी करणा-या

किंवा त्यासाठी आग्रह धरणा-या लाभार्थीकडून, अशा प्रोसिजर्स/शस्त्रक्रियांसाठी कमीत कमी Implant ची किंमत लाभार्थीने भरणे बंधनकारक राहील.

(०५) जीवनदायी योजनेसाठी लागू केलेल्या या दर पत्रकाव्यतिरिक्त इतर रुग्णांसाठी रुग्णालयात सध्या मंजूर असलेले दरपत्रक लागू राहील.

(०६) सदर दर अंमलबजावणीमुळे हृदय शस्त्रक्रिया विभागातील CVTS व Cath Lab या दोन्ही विभागांची सरासरी मासिक साधारणतः दीड ते दोन लाखांपर्यंत जादा खर्च येईल. सदर खर्च वैद्यकीय बिलात सवलत खाती खर्ची टाकता येईल.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही दि.०१/१०/२०१२ रोजी पासून करण्यात आली असून कार्योत्तर मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.८२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत शस्त्रक्रियांचे सुधारित दरांबाबत दि.०१/१०/२०१२ पासून केलेल्या अंमलबजावणीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

**तसेच प्रस्तावात नमुद केलेल्या कॅथलॅबचे संदर्भातील तक्त्यामध्ये अ.नं.७ चे Peripheral Angioplasty मधील Cost of Implants या रकान्यामध्ये रु.८६,०००/- ऐवजी रु.५६,०००/- Total Est. Expenses रकान्यामध्ये १,२५,०००/- ऐवजी रु.९५,०००/- व J.D. Rates रकान्यामध्ये रु.१,२५,०००/- ऐवजी रु.६०,०००/- असे वाचण्यात येऊन ग्राहय धरण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं. २२** **नवीन राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची नोंदणी व अंमलबजावणी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.त्रिसदस्यीय समिती सभेच्या, दि.२९.७.२०१२ रोजीच्या सभेमध्ये, मा.व्यवस्थापन त्रिसदस्यीय समितीचे अध्यक्ष, सदस्य आणि एमडी इंडिया हेल्थ केअर सर्व्हिसेस् (TPA) प्रा.लि., पुणे, नॅशनल इन्शुरन्स कं. लि., मुंबई यांच्या वरिष्ठ प्रतिनिधींनी योजने अंतर्गत करावयाच्या Memorandum of Understanding (MoU)/ करारातील Terms & Conditions बाबत सविस्तर चर्चा करण्यात येवुन, सदर योजने अंतर्गत श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलची नोंदणी करून अंमलबजावणी करण्याबाबत ठराव करून योजने अंतर्गत मंजुरी देण्यात आलेल्या महत्वाच्या बाबी खालील प्रमाणे :-

१. मोफत केस पेपर्स् व मोफत ओपीडी तपासण्या करणे.
२. प्रत्येक विभागात किमान २५% खाटा राखीव ठेवणे.
३. प्रोसिजर्स/सर्जरीज्: उपलब्ध सोयी सुविधांनुसार करणे.
४. हार्डवेअर/सॉफ्टवेअर व माफक दरात AMC करणे.
५. रूग्णांस दयावयाचे परतीचे भाडे देणे.
६. वैद्यकीय आर्थिक मदत स्विकारणे.
७. बिले सादर करणे (One Line Billing.
८. नामंजुर बिले फेर सादर करणे.
९. संस्थान चॅरिटी/सवलतींचे दर स्वतंत्र रहातील.
१०. विमा रकमेपेक्षा जादा खर्च रूग्णांकडुन भरून घेणे.
११. On Line पध्दतीने बिले सटल करणे.
१२. मेडिकल कॅमप्स् घेण्याची अट बंधनकारक न करणे.
१३. साईबाबा व साईनाथ हॉस्पिटलला समान दर देणे.

इत्यादी महत्वाच्या मुद्यांसह **(१)** उच्च दर्जाचे इमप्लांटस् उदा.Drug Eluting Stents, इ.साठी जादा दर देणे व **(२)** शिस्त भंग/ Empanelment Disciplinery Committee (EDC) कमिटीवर हॉस्पिटल प्रतिनीधीची नेमणुक करणे हया महत्वाच्या २ मुद्यांबाबत सविस्तर चर्चा करून मंजुरी देण्यात आली होती.

त्या नंतर, सदर मंजुर मुद्यांचा सुधारीत मसुदा (Annexure-C), एमडी इंडिया-TPA व नॅशनल इन्शुरन्स कंपनीस त्यांच्या अंतिम मंजुरीस्तव Email व्दारे पाठविण्यात आला असता, एमडी इंडिया-TPA व नॅशनल इन्शुरन्स कं.कडुन, सदर **(१)** उच्च दर्जाचे इमप्लांटस् उदा.Drug Eluting Stents इ.साठी दर वाढवुन देणे, व **(२)** शिस्त भंग कमिटी/Empanelment Disciplinery Committee (EDC), हया २ मुद्यांस शासनाच्या धोरणानुसार मान्यता देता येणे शक्य नसल्याचे, परंतु इतर महत्वाच्या मुद्यांस मंजुरीचा उपरोक्त संदर्भ क्र.३ च्या, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी, मुंबई, यांचे मुख्य वैद्यकीय सल्लागार, डॉ. एस. बी. चव्हाण, यांचेकडुन दि.२९.९.२०१२ रोजीच्या Email व्दारे कळविण्यात आले आहे.

सदर Email मधील संस्थानकडुन उपस्थित केलेले महत्वाचे मुद्दे, व राजीव गांधी जीवनदायी योजना सोसायटी, मुंबई, यांचे कडुन प्राप्त झालेला संमती दर्शक खुलासा पुढील प्रमाणेः-

<u>Annexure – C</u>

Following Terms & Conditions have been agreed upon in the meeting of Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi's, Management Committee & The Representatives of MDIndia Health Care Services (TPA) Pvt. Ltd., National Insurance Co. Ltd., held at Shirdi, Tal.Rahata, Dist.Ahmednagar, on Sunday, 29.7.2012.

| S.n. | Issues Flagged by Shirdi Sansthan | Response of Society |
|---|---|---|
| 1 | OPD Investigations :- Free OPD consultations & all investigations of eligible Patients, will be conducted as per MoU.<br>However, the reports of such tests, investigations will be kept with hospital, and will not be given to the patients, to avoid misuse or disadvantage. | We agree |
| 2 | Beds :- Agreed to provide minimum 25% Beds in each specialty for RGJAY Patients. | We agree |
| 3 | Superior Quality Implants :- As a special case for Sansthan Hospitals, it is agreed that,<br>A) **PTCA-Angioplasty** with **1 Drug Eluting Stent** (i.e.Rs.60,000/- + Add. Rs.20,000/- = **Rs.80,000/-**),<br>B) **PTCA-Angioplasty** with **2 Drug Eluting Stents**, Add. Rs.40,000/- (i.e. Rs. 80,000/- + Rs.40,000/- = **Rs.1,20,000/-**.<br>C) **PTCA-Angioplasty** with **3rd Stent** in rear cases, as a life saving emergency, (if Patient requires 3rd add. Stent, due to dissection in Coronary Artery/Vessel) Rs.30,000/-. | **It may not be possible to revise the rates of procedures as these rates have been built in floated tender and therefore it is not possible at this juncture to alter the terms and conditions of bid.** |
| 4 | Procedures/Surgeries :- Out of 840 Procedures/Surgeries, only those Procedures/Surgeries could be done in Shri Saibaba Hospital, Shirdi, for which facilities are available in the Hospital.<br>Patients requiring Procedures/Surgeries other than, those could be done in the Hospital, such Patients will be not be admitted/entertained & will be referred to other Empanelled Hospitals. | We agree |
| 5 | IT Net Work :- **Maximum MBPS** Internet Lease Line to be procured & installed by Shri Saibaba Sansthan Trust/Hospital on its own expenses.<br>MDIndia to provide supporting Hardware/Software, Scanner, Camera etc. with commissioning of the same at a reasonable cost to Shri Saibaba Sansthan/Hospital.<br><br>MDIndia (TPA) will undertake comprehensive Annual Maintenance Contract (AMC) at a reasonable cost to Shri Saibaba Sansthan/Hospital | We agree |
| 6 | Return Journey Fare :- Hospitals will pay single return journey lumpsum fare to the admitted patients only, as below:-<br>1. Patients from Rahata Taluka = **Rs.50/-**<br>2. Patients from Ahmednagar District (other than Rahata Taluka) = **Rs.100/-**<br>3. Patients from all Dists.(other than Ahmednagar Dist.= **Rs.150/-** | We agree |
| 7 | Financial Aid :- Hospitals will not give Estimates of Expenses to the patients for obtaining Financial Aid from the CM to avoid duplication of Govt. Aid.<br>However, Sansthan/Hospitals can give Estimates of Expenses to the patients, who will need Expenses more than Rs.1,50,000/-, and Sansthan/Hospitals can accept Financial Aid/Donations from Devotees, Donars, Trusts, Organizations etc. for such beneficiary patients under RGJAY. | **All beneficiaries of Jeevandayee are treated free of cost till their balance sum insurance get exhausted.** |

| | | |
|---|---|---|
| | Submission of Bills :- Bills will be submitted | |

| | | |
|---|---|---|
| 8 | Patientwise/ Packagewise in totality i.e. One Line Billing and no Break-up of Bill/s Amounts will be insisted/ demanded by MDIndia i.e. Bed Charges, Room Rent, Pharmachy Bills,/Receipts of Medicines, Consumables, Disposables, Consultants Visits/ Charges, Nursing Charges etc. etc. so as to avoid manual/laborious work | **Accepted.** |
| 9 | <u>**Re-submission of Bills**</u> **:-** Non-sanctioned bills can be resubmitted after compliance, MDIndia will sanction the same and payment will be made as per Package Rates. | **We may agree** |
| 10 | <u>**Empanelment & Disciplinary Committee (EDC)**</u> **:-** As confirmed by MDIndia's Asst. General Manager (Operations), Dr.Kasat, 2 retired Doctors, are appointed as Hospital Representatives on EDC Committee, however, it is suggested by Sansthan's Dy.Executive Officer, Dr.Mane, that, hospital representatives should be appointed on the basis of performance of the Hospital or maximum No.of Cases/ Patients.<br>It is agreed and assured by Representatives of MDIndia (TPA), National Insurance Co. that, on the basis of annual performances from all the Hospitals, the appointment representative of such Hospital on EDC Committee will be decided. | **As EDC is constituted as per GR and no representative from any Network hospital has been taken on EDC committee.<br>Society may invite representative of Sansthan as special invitee in instance of discussion of claims and other issues pertaining to Shirdi Sansthan Hospital.** |
| 11 | <u>**Sansthan Charity/Concessional Rates**</u> **:-** For patients other than, beneficiaries under RGJAY Scheme, separate charitable rates will be charged as per Shri Saibaba Sansthan's Policy/Decisions, MDIndia (TPA), National Insurance Co. or RGJAY Society will have no objection for the same. | **We agree** |
| 12 | <u>**Excess of Insured Amount Limit**</u> **:-** In case, if beneficiary Patient/Family's Insured Amount Limit of Rs.1,50,000/- is exhausted during the period of Insurance coverage, and patient needs further expenses, in that case, the, <u>excess amount (over and above Rs.1,50,000/-) can be charged to the beneficiary Patient/s</u>.<br>MoU/MDIndia (TPA), National Insurance Co. or RGJAY Society will have no objection under such circumstances.<br><u>**Consultants Charges / Share**</u> **:-** Sansthan will have sole right to decide the Charges/Share to be paid to the Consultants for RGJAY OPD/IPD Patients. | **We agree** |
| 13 | <u>**On Line Payment**</u> :- MDindia will settle the bills, through on line payment to the Bank Account, **"The Executive Officer, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi, A/c.** <u>Patient's Name</u>**".** | **We agree** |
| 14 | <u>**Medical Camps**</u> **:-** Considering the tremendous flow of Patients in both Hospitals, appointing Medical Camp Coordinator (MCCO) and arranging regular Medical Camps for publicity of the RGJAY Scheme and identifying the Patients is not required, same is accepted and agreed by the Sr.Representatives of MDIndia-TPA & National Insurance Co.<br>Therefore, the compulsion of arranging/holding Medical Camps is withdrawn, hence the condition of Medical Camps is not applicable to the Hospital. | **We agree** |
| 15 | <u>**Authorized Signatory**</u> **:-** The Medical Director/Dy.M.D., is authorized to look after day to day work and take appropriate decisions.<br>However, as per the need and requirement, Medical Director/ Dy.M.D., may delegate the responsibility/ authority in their absence, to the Medical Administrator or to the other Officer/Manager, which Medical Director/ Dy.M.D., may think just & proper. | **We agree** |

तसेच, योजनेच्या अंमलबजावणीबाबत, संदर्भ क्र.२ च्या मा.कार्यकारी अधिकारी साो.यांच्या कक्षात दि.२८.९.२०१२ रोजी पार पडलेल्या बैठकीत राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत, एमडी इंडिया-TPA कं. सोबत करावयाच्या Memorandum of Understanding (MoU)/करारातील Terms & Conditions व योजनेची अंमलबजावणी चालु करण्यामधील अडीअडचणींबाबत खालील मुद्यांवर चर्चा करण्यात येवुन, मा.त्रिसदस्यीय समिती पुढे फेर निर्णयार्थ सादर करावयाच्या महत्वाच्या बाबींचे इतिवृत्त पुढील प्रमाणे :-

**१. कॅथलॅब प्रोसिजर्सचे दर :-** एमडी इंडिया-TPA कं. कडुन कळविण्यात आले आहे की, शासनाच्या धोरणानुसार, कॅथलॅब प्रोसिजर्स्‌साठी जे दर निश्चित करण्यात आले आहेत, त्यामध्ये बदल करता येणे श्यक्य नसुन, टेलीफोन वरून वैद्यकीय संचालक यांना असेही सांगण्यात आले आहे की, राज्यातील इतर हॉस्पिटल्स्‌साठी एक समान दर आणि श्री साईबाबा संस्थानच्या हॉस्पिटल्स्‌साठी वेगळे जादा दर, असे शासनाच्या एकाच योजनेसाठी वेगवेगळे दर मंजुर करणे शक्य नाही.

त्यामुळे, नवीन योजने अंतर्गत, उच्च दर्जाची उपकरणे (इम्प्लान्टस्) वापरून करावयाच्या सर्व प्रकारच्या कॅथलॅब प्रोसिजर्स् उदा.Angioplasty with Drug Eluting Stent, Duel Chamber/Rate Responsive Pace Makers, Devices इ.साठी दर वाढवुन मिळणार नाहीत, त्यामुळे, जुन्या जीवनदायी योजने अंतर्गत सध्या वापरण्यात येत असल्याप्रमाणे, उच्च दर्जाची उपकरणे (इम्प्लान्टस्) वापरण्यात आल्यास, त्याचे आर्थिक दृष्ट्या खालील प्रमाणे विपरीत परिणाम होण्याची जास्त शक्यता आहे :-

१. रूग्णांकडुन उच्च दर्जाच्या व महागडया इमप्लान्टस्‌च्या जादा फरकाची रक्कम भरून घेता येणार नाही.

२. प्रत्येक रूग्णामागे सरासरी ४०,०००/- ते ६०,०००/- रू. इतक्या मोठया रकमेची सवलत दयावी लागली असती, तथापी, नवीन टेंन्डर नुसार व पुरवठादार/कंपन्यांनी लेखी संमती पत्रानुसार, Drug Eluting Stents ची किंमत रू.४०,०००/- करूनही, प्रत्येक रूग्णामागे सरासरी २०,०००/-इतक्या रकमेची सवलत दयावी लागेल, सध्या दरमहा सरासरी २५० Angioplasty करण्यात येतात (Spet.,2012, Actual A'plasties done by Dr.Bajaj = 131 & Dr.Varma = 120 = 251), त्या नुसार दरमहा साधारण पंन्नास लाख इतक्या मोठया रकमेची सवलत फक्त ॲन्जिओप्लास्टीच्या रूग्णांसाठी दयावी लागेल.

३. त्या शिवाय इतर प्रोसिजर्स उदा.महागडे पेसमेकर्स्, डिव्हाईसेस् इ.मिळुन दरमहा साधारण २५ लाख, म्हणजेच वार्षिक सरासरी ७ ते ८ कोटी इतक्या मोठया रकमेची सवलत दयावी लागुन, मोठा आर्थिक बोजा सहन करावा लागेल.

४. योजने अंतर्गत राज्यातील इतर हॉस्पिटल्स्‌मध्ये साधे/Bare Metal Stents इ.वापरले जातात, परंतु, संस्थानच्या हॉस्पिटलमध्ये Drug Eluting Stents वापरण्यात येतात, अशी माहिती/संदेश राज्यभरात जावुन, रूग्णांचा मोठा ओघ आपणाकडे सुरू होण्याची जास्त शक्यता असल्याने, त्याचाही विपरीत परिणाम होण्याची दाट शक्यता आहे.

या बाबत, मा.कार्यकारी अधिकारी साो. यांनी, या विषयी आत्ता पर्यंत खुप चर्चा झालेली असुन, संस्थान एकाच मुद्यावर अडुन धरत असल्याचा संदेश शासन स्तरावर/राज्य पातळीवर जात असल्याने, ते संस्थानच्या लौकिकास साजेसे नाही, तरी, राज्यभरात ज्या प्रमाणे दर मंजुर करण्यात आले आहेत, अशा शासनाच्या धोरणानुसार योजनेची अंमलबलावणी सुरू करण्यात यावी, Drug Eluting Stents इ.साठी आग्रह धरून/आडुन बसु नये, त्या ऐवजी Drug Eluting Stents इ.जास्त किंमतीच्या Implants ची मागणी करणाऱ्या किंवा त्यासाठी आग्रह करणाऱ्या रूग्णांच्या प्रोसिजर्स्/शस्त्रक्रिया, राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत करण्यात येवु नयेत, असे स्पष्ट केले.

**२. जागेचे नियोजन :-** योजनेच्या कामकाजासाठी खालील प्रमाणे जागेची व्यवस्था करण्याचे ठरविण्यात आले.

**१.** श्री साईबाबा हॉस्पिटल :- जनसंपर्क विभागात, दर्शनी भागातील काउंटरवर इंटरनेट, कॉम्प्युटर्स् इ.सुविधा उपलब्ध व कार्यान्वित करून कामकाज चालु करणे.

**२.** श्री साईनाथ हॉस्पिटल :- मा.कार्यकारी अधिकारी साो., यांनी सध्या साईनाथ हॉस्पिटलसाठी योजना स्विकारू नये, असे स्पष्ट करून, त्या बाबत केलेली कारण मीमांसा पुढील प्रमाणे :-

१. मोठया संख्येने स्टाफ नियुक्त करून इतर Infrastructure सुध्दा ताबडतोब उभारावे लागेल.

२. साईनाथ हॉस्पिटलच्या सध्याच्या अत्यल्प दर पत्रकात वाढ करून, ते साईबाबा हॉस्पिटल इतके करावे लागतील, त्यामुळे साईनाथ हॉस्पिटलच्या मुळ उद्देशास छेद जाईल.

३. साईनाथ हॉस्पिटलमध्ये वार्षिक १३ ते १६ कोटी रूपये चॅरिटी करूनही, आसपासच्या परिसरातील/समाजातील शेतमजुर, उस तोडणी व बांधकामांवरील कामगार इ. समाजातील फार मोठा

वर्ग, मुलभूत आरोग्य सुविधां पासुनही वंचित असुन, शासकीय योजना किंवा आपणही त्यांच्या पर्यंत पोहचत नाही, अशा कारणांमुळे साईनाथ हॉस्पिटलचे दर वाढविणे योग्य होणार नाही.

४. श्री साईनाथ हॉस्पिटलच्या माध्यमातुन मागील ४/५ दशकांपासुन, संस्थान करीत असलेल्या वैद्यकीय सेवा कार्यामुळे, संस्थानची सार्वत्रीक एक वेगळी ओळख किंवा नाव लौकीक झालेला आहे, त्यामुळे, सध्या साईनाथ हॉस्पिटलच्या माध्यमातुन करण्यात येत असलेली वार्षिक १३/१६ कोटी रूपये चॅरिटी, ही तुलनेने कमी असुन, त्या मध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे.

५. राजीव गांधी जीवनदायी योजना, श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये लागु करण्यात आल्यास, रूग्णांच्या बिलांपोटी इन्श्युरन्स कं.कडुन का असेना, पर्यायाने शासनाच्या योजनेतुनच रक्कम मिळेल, परंतु त्यामुळे, श्री साईबाबा संस्थानची एक वेगळी Indentity/ओळख निर्माण झालेली आहे, ती संपुष्टात येईल.

६. मा.उच्च न्यायालयाच्या योजने नुसार, १०% गरीब, गरजु (Indigent) रूग्णांस मोफत व १०% दुर्बल घटकांतील (Weaker Section) रूग्णांस सवलतींच्या (किमान ५०% सवलत) दरांत पुरविणे बंधनकारक असल्याने, मा.उच्च न्यायालयाच्या सदर मार्गदर्शक तत्वांचे किंवा सक्तीच्या नियमांचे पुर्णतः पालन होवु शकणार नाही.

त्यामुळे, उपरोक्त बाबी विचारात घेवुन, तुर्तास साईनाथ हॉस्पिटलसाठी राजीव गांधी जीवनदायी योजना स्विकारू नये, सदर विषयी, मा.अध्यक्ष सो. व मा.जिल्हाधिकारी सो. यांचेशी चर्चा करावी लागेल, असे मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी स्पष्ट केले.

**३. मनुष्य बळ** :- योजने अंतर्गत दोन्ही हॉस्पिटल्स्चे कामकाज २ सत्रांमध्ये चालविण्यासाठी Data Entry Operators, Billing Clerks, Checkers इ. एकुण २२ नवीन कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याचे दि.२७.९.२०१२ रोजीच्या एचआर विभागाकडील टिपणीत नमुद करण्यात आले होते.

परंतु, तुर्तास श्री साईनाथ हॉस्पिटलसाठी नवीन योजना स्विकारण्यात येवु नये, असे सुचविण्यात आले असल्याने, फक्त साईबाबा हॉस्पिटलसाठी, सध्याच्या जीवनदायी योजनेच्या बिलींगच्या कामासाठी कार्यरत असलेला स्टाफ (५ टायपीस्ट/क्लर्क, १ मदतनीस = ६) व नवीन ८ कर्मचाऱ्यांची कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने नेमणुक करण्यात यावी असे ठरले.

**४. हार्डवेअर/स्वॉफ्टवेअर :-** १० MBPS Internet Line साधारण ८/१० दिवसांत कार्यान्वित होणे अपेक्षित असल्याचे ज्यु.इडीपी मॅनेजर, श्री कोते, यांनी स्पष्ट केले, तसेच, हॉस्पिटलसाठी नवीन १० कॉम्प्युटर्स् मंजुर झालेले आहेत, त्यामधुन ३/४ कॉम्प्युटर्स् व बाकीचे जुने कॉम्प्युटर्स्, प्रिंटर्स वापरून, कामकाज चालु करता येईल, असे ज्यु.इडीपी मॅनेजर, श्री गवळी, यांनी स्पष्ट केले

**५. On Line/One Line Billing :-** योजने अंतर्गत सादर करावयाची बिले मंजुर पॅकेज रकमेनुसार Lumpsum/एक रकमी On Line पध्दतीने सादर करावयाची असली, तरी सुध्दा, Accounting, Audit, RTI/माहिती अधिकार कायदा इ.साठी Break-up सह सविस्तर बिले तयार करावी लागतील असे स्पष्ट करण्यात आले.

तरी, राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत करावयाचा MoU/करार व अंमलबीवणीबाबत, सदर विषय मा.व्यवस्थापन त्रिसदस्यीय समिती पुढे फेर निर्णयार्थ सादर करण्यात यावा ही विनंती.

**निर्णय क्र.८२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. सदर योजना संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ या दोन्ही हॉस्पिटलसाठी सुरु करणेत यावी.**

**संस्थानचे दोन्ही हॉस्पिटल्समध्ये या योजनेचे कामकाज २ सत्रांमध्ये चालविण्यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी- ८ व श्री साईनाथ हॉस्पिटलसाठी-१४ असे एकूण २२ कंत्राटी कर्मचाऱ्यांची, कंत्राटी पध्दतीने, कंत्राटदारामार्फत नेमणूक करण्यात यावी. तसेच दोन्ही हॉस्पिटल्समध्ये आवश्यक ते हॉर्डवेअर, सॉफ्टवेअर व इफ्रास्ट्रक्चर उभारण्यात येऊन कार्यान्वित करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२३** **श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता नविन इलेक्ट्रीक पॅनेल खरेदी करुन बसविणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटलचे विद्युत पुरवठयाकरीता हॉस्पीटलचे नुतनीकरणाचे वेळेस बेसमेंटचे ठिकाणी स्टोअर विभागाशेजारील रुममध्ये इलेक्ट्रीकल पॅनेल बसविण्यात आलेला आहे. रात्रीचे वेळेस स्टोअर बंद असते. अशा वेळेस पॅनेलमधील फ्युज गेल्यास अथवा एखादा मेनस्वीच जळाल्यास स्टोअर विभागाची चावी वेळेवर उपलब्ध झाली नाही तर पॅनेल रुम उघडून पॅनेल पर्यंत तातडीने जाणे शक्य होणार नाही. त्यामुळे भविष्यात आग लागण्यासारखे अपघात होऊ शकतात. या कारणास्तव सदरील पॅनेल तळमजल्यावर आर्थो O.T. जवळील रुममध्ये शिफ्ट करणे गरजेचे आहे.

सदरील इलेक्ट्रीकल पॅनेलवर ४ ऑपरेशन थिएटर तसेच CRU-I व CRU-II हे वॉर्ड असे महत्त्वाचे विभाग जोडण्यात आलेले आहेत. हॉस्पीटलमध्ये वारंवार नवनवीन मशिनरींची संख्या वाढत

गेल्यामुळे सदरील पॅनेलवर क्षमतेपेक्षा अधिक इलेक्ट्रीकल लोड वाढलेला आहे. त्यामुळे नविन पॅनेल खरेदी करुन तो तळमजल्यावरील आर्थो ऑपरेशन थिएटर जवळील रुममध्ये बसवावा लागणार आहे.

सदरील इलेक्ट्रीकल पॅनेल विद्युत ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागवून खरेदी करुन बसवावा लागणार आहे. खरेदी करावयाच्या पॅनेलचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | CSR NO. | Discription | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01) | NON CSR | Supplying, erecting and commissioning the of panel board for Saibaba Hospital. Panel fabricated from CRCA sheet 2 mm (14 guage) to be used for fabrication of boxes panel board etc. Including, cutting, bending, drilling, welding, rivetling etc. and painting with one coat of red lead paint and two coat of enamel paint. The following MCCB etc complete with hinged doors with tocking arrangement complete wired and erected on angle iron frame from 50 x 50 x 5 mm angle. | 01 | 4,38,262.45 | 4,38,262.45 |
| | NON CSR | 2 Nos. supplying and erecting LT / LK make 4 pole 400 A SFU erected at position in panel board in an approved manner with necessary material and connected with lead etc complete. | | | |
| | NON CSR | 4 Nos. supplying and erecting LT / LK make 4 pole 250 A SFU erected at position in panel board in an approved manner with necessary material and connected with lead etc complete. | | | |
| | NON CSR | 24 Nos. supplying and erecting LT / LK make 4 pole 125 A SFU erected at position in panel board in an approved manner with necessary material and connected with lead etc complete. | | | |
| | NON CSR | Supplying and erecting bus bar Tripple pole with neutral with four Aluminium bar each of required size and cross section 500V, 300A of suitable length complete with bus bar insulator per bar and main cable socket to each bar created in Panel board and connected with leads etc. The panel board should be complete with necessary set of 1 No. of 3 Phase 4 wire C.T.operated KWH meter, 2 Nos of selector switches, 1No.of Volt Meter, 1 No of Ammeter & 3 Nos.piolet lamp etc. duly connected commissioned and tested. | | | |
| 02) | NON CSR | Supplying and erecting M.S.Angle stand frame of required size for electrical panel board. Stand frame fabricated from angel Iron 50 x 50 x 6 mm and painting with one coat of red lead paint & one coat of enamal paint. | 01 | 9,400.00 | 9,400.00 |
| 03) | 7-7-2 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3 to 4 core 6 Sq.mm./2 to 4 core 10 Sq.mm. for PVC armoured cable as per specification no. CB-GL | 05 | 0,064.57 | 00,322.85 |
| 04) | 7-7-3 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3 to 4 core 16 Sq. mm./3 to 4 core 25 Sq.mm./3 core 35 Sq.mm. for PVC armoured cable as per specification no. CB-GL | 20 | 0,108.68 | 02,173.50 |
| 05) | 7-7-5 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 4 core 50 Sq. mm. for PVC armoured cable as per specification no. CB-GL | 15 | 0,151.20 | 02,268.00 |
| 06) | 7-7-7 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3 1/2 core 95 Sq.mm. for PVC armoured cable as per specification no. CB-GL | 04 | 0,176.40 | 00,705.60 |
| 07) | 7-7-9 | Supplying & erecting Flange type brass | 03 | 0,245.70 | 00,737.10 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | cable glands for 3 1/2 core 150 Sq.mm. for PVC armoured cablen as per specification no. CB-GL | | | |
| 08) | 7-10-1 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable upto 16 Sq. mm. complete as per specification no. CB-CL/AL | 10 | 0,005.25 | 00,052.50 |
| 09) | 7-10-2 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 25 Sq. mm. complete as per specification no. CB-CL/AL | 100 | 0,007.35 | 00,735.00 |
| 10) | 7-10-4 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 50 Sq. mm. complete as per specification no. CB-CL/AL | 20 | 0,015.75 | 00,315.00 |
| 11) | 7-10-6 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 95 Sq. mm. complete as per specification no. CB-CL/AL | 10 | 0,022.05 | 00,220.50 |
| 12) | 7-10-8 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 150 Sqmm complete as per specification no. CB-CL/AL | 08 | 0,036.75 | 00,294.00 |
| 13) | 7-11-1 | Dismantling the existing cables of all types & sizes | 30 | 0,019.95 | 00,598.50 |
| 14) | 7-4-1 | Providing & erecting epoxy straight through joint outdoor/indoor for LT PVC armoured cable 2.5 to 16 Sq.mm. cable, with necessary material as per specification no. CB-JT/LT | 05 | 0,730.80 | 03,654.00 |
| 15) | 7-4-2 | Providing & erecting epoxy straight through joint outdoor/indoor for LT PVC armoured cable 25 to 50 Sq.mm. cable, with necessary material as per specification no. CB-JT/LT | 15 | 1,050.00 | 15,750.00 |
| 16) | 7-4-3 | Providing & erecting epoxy straight through joint outdoor/indoor for LT PVC armoured cable 70 to 95 Sq.mm. cable, with necessary material as per specification no. CB-JT/LT | 04 | 1,914.15 | 07,656.60 |
| 17) | 7-4-4 | Providing & erecting epoxy straight through joint outdoor/indoor for LT PVC armoured cable 120 to 185 Sq.mm. cable, with necessary material as per specification no. CB-JT/LT | 04 | 1,713.60 | 06,854.40 |
| | | | Total Amount :- | | 4,90,000.00 |

सदरील पॅनेल विद्युत ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागवून खरेदी करुन बसविणेच्या कामास व येणा-या रक्कम रुपये ४,९०,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता नविन इलेक्ट्रीक पॅनेल बसविणेसाठी कोटेशन मागवून सदर पॅनेल खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये ४,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय न.२४** **मौजे-कोऱ्हाळे येथील सर्व्हे नं.९७ मधील डाळींब बागेची खोती देणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानने कोऱ्हाळे शिवारात दिनाक १४/०१/२०१२ रोजी संस्थानचे नवीन प्रकल्प राबविणेकामी ०१ हेक्टर ६२ आर क्षेत्र खरेदी करण्यात आलेले आहे. या क्षेत्रात मूळ शेतमालक यांनी या क्षेत्रात डाळींब बाग बसविण्यात आलेली आहे. संस्थाने सदरचे क्षेत्र खरेदी केल्यामुळे या क्षेत्रावरील डाळींब बागेसह खरेदी केलेले क्षेत्र संस्थानचे ताब्यात मिळालेले आहे. या क्षेत्रात अंदाजे ६०० डाळींब झाडे आहेत. सदरचे क्षेत्र हे शिर्डी शहरापासून ७ कि.मी अंतरावर आहे.

डाळींब बागेला फळ लागले नंतर या बागेची मोठया प्रमाणात काळजी घ्यावी लागते. वेळेवर खते देणे वेळो-वेळी आवश्यकते नुसार, वातावरणानुसार झाडे औषधांची फवारणी करावी लागते. यासाठी खर्चही जास्त प्रमाणात येतो. यामुळे सदर बागेची ०२ वर्ष कालावधीसाठी खोती देता येईल. या कालावधी मध्ये बागेची देखभाल करणे , झाडांना पाणी देणे, बागेतील गवत काढणे , बागेची चाळणी करणे, आळे तयार करणे, फळे काढणे, खते व औषधे देणे ही जबाबदारी बागेची खोती घेणार यांचेवर राहील. त्यामुळे संस्थानला बागेची देखभाल करण्यासाठी कोणताही खर्च येणार नाही.

मागील वर्षी या बागेची खोती श्री अरुण जयराम चौधरी, नांदुखी यांना रु.२,२१,०००/-( रु.दोन लाख एकवीस हजार ) मात्र रक्केला देण्यात आलेली होती. सदरची खोती ची मुदत माहे- सप्टेंबर १२ अखेर संपत आहे. मौजे-को-हाळे येथील डाळींब बागेच्या जागेवर सध्या दुस-या कोणत्याही कामाचा प्रस्ताव नसल्याने या बागेची ०२ वर्षाची कालावधीसाठी ऑक्टोबर २०१२ ते ऑक्टोबर २०१४ या कालावधीसाठी स्थानिक बागवान / फळविक्रते / लगतचे शेतकरी यांच्या कडून दरा बाबतचे दरपत्रके घेवून खोती देता येईल.

तरी सदरचा प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८२३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

---

**विषय न.२५ शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४ मधील चिक्कू बागेची खोती देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मौजे-शिर्डी, तालुका राहाता येथील सर्व्हे नं १२४ मधील ०१ हेक्टर २० आर क्षेत्र संस्थाने दिनांक १२/१०/२००७ खरेदी केलेले आहे. या क्षेत्रामध्ये फळबाग असून यामध्ये चिक्कू २०२ झाडे, नारळ १३ झाडे, आंबे १५ झाडे, रामफळ ०८ झाडे, सिताफळ ०६ झाडे, जांभूळ ०४ झाडे, चिंच ०१ व इतर ०५ झाडे आहेत.

या वर्षी चिक्कू बागेची ०२ वर्षासाठीची खोती देणे बाबत विचार करणे योग्य आहे. कारण या कालावधी मध्ये बागेची देखभाल करणे ,झाडांना पाणी देणे, बागेतील गवत काढणे , बागेची चाळणी करणे, आळे तयार करणे, फळे काढणे, खते व औषधे देणे ही जबाबदारी बागेची खोती घेणार यांचेवर राहील. त्यामुळे संस्थानला बागेची देखभाल करण्यासाठी कोणताही खर्च येणार नाही.

मागील कालावधीत वर्ष ०१ मुदतीसाठी कालावधीची चिक्कू झाडांची खोती बागवान/ फळविक्रते यांचेकडून दरपत्रक घेवुन चिक्कु बागाची खोती रु.६७,०००/ रक्कमेला श्री.साहेबखॉ सब्जेखॉ पठाण,शिर्डी. यांना देण्यात आलेली होती. सदर खोतीची मुदत जुलै-१२ अखेर संपलेली आहे.

सध्या चिक्कु बागेच्या जागेवर दुस-या कामाचा कोणताही प्रस्ताव नसल्याने ०२ वर्षाची कालावधीसाठी ऑक्टोबर २०१२ ते जुलै २०१४ पर्यंत खोती देणेसाठी स्थानिक फळविक्रेते व बागवान यांचे कडून दरपत्रके घेवुन चिक्कू बागेची खोती देता येईल.

**निर्णय क्र.८२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

---

**विषय न.२६ साईआश्रम प्रकल्प भाग-१ व २ करीता गार्डनसाठी पाणी पुरवठा करणेकामी प्लबींग साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे आर्थिक देणगीतून संस्थान मालकीच्या मौजे शिर्डी हद्दीतील सर्व्हे नं.१०७,१०८,१०९ पैकी मधील जमिनीमध्ये साईआश्रम प्रकल्प भाग १ हा निवासी प्रकल्प व संस्थान मालकीच्या मौजे निमगांव-को-हाळे हद्दीतील गट नं. १७२ पैकी मधील जमीनीमध्ये भक्तांच्या निवास व्यवस्थेसाठी साईआश्रम प्रकल्प भाग २ निवासी प्रकल्प उभारणेचे काम अंतिम टप्प्यात आहे.

साईआश्रम प्रकल्प भाग १ व २ चे परिसरात गार्डन उभारणेचे काम सुरु करण्यात आलेले आहे. गार्डनसाठी पाणी पुरवठा करणेसाठी आवश्यक पाईपलाईन टाकाव्या लागतील. सदरच्या कामांबाबत दि.२०.०९.२०१२ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब, विशेष कार्य अधिकारी, वरिष्ठ मुख्य अभियंता, यांचे उपस्थितीत पाहणी करण्यात आली असता गार्डनसाठी आवश्यक पाईपलाईनचे काम पाणी पुरवठा विभागाकडुन त्वरीत करुन घेणेसाठी सुचना देण्यात आलेल्या आहेत.

सदरचे काम करणेसाठी आवश्यक साहित्य सध्या पाणी पुरवठा विभागाकडे उपलब्ध नाही. यासाठी आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदी करुन पाईपलाईन टाकण्याचे काम पाणी पुरवठा विभागांतर्गत करता येईल. यासाठी आवश्यक साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | मटेरियल तपशिल | कंपनी | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | यु.पि.व्ही.सी.पाईप- २" | फिनोलेक्स | ७५०० | फुट | ४२.०० | ३१५०००.०० |
| ०२ | यु.पि.व्ही.सी.पाईप- १.१/२" | फिनोलेक्स | ६००० | फुट | ३१.०० | १८६०००.०० |
| ०३ | यु.पि.व्ही.सी.पाईप- १" | फिनोलेक्स | २००० | फुट | २०.०० | ४००००.०० |
| ०४ | यु.पि.व्ही.सी.पाईप- ३/४" | फिनोलेक्स | ५०० | फुट | १८.०० | ९०००.०० |
| ०५ | यु.पि.व्ही.सी.सॉकेट- २" | फिनोलेक्स | ३२० | नग | ४०.०० | १२८००.०० |
| ०६ | यु.पि.व्ही.सी.सॉकेट- १.१/२" | फिनोलेक्स | २५० | नग | २८.०० | ७०००.०० |
| ०७ | यु.पि.व्ही.सी.सॉकेट- १" | फिनोलेक्स | ८० | नग | १४.०० | ११२०.०० |
| ०८ | यु.पि.व्ही.सी.सॉकेट- ३/४" | फिनोलेक्स | १० | नग | १२.०० | १२०.०० |
| ०९ | यु.पि.व्ही.सी.एलबो- २" | फिनोलेक्स | ४० | नग | ४२.०० | १६८०.०० |
| १० | यु.पि.व्ही.सी.एलबो- १.१/२" | फिनोलेक्स | ३० | नग | ३५.०० | १०५०.०० |
| ११ | यु.पि.व्ही.सी.एलबो- १" | फिनोलेक्स | ३० | नग | १६.०० | ४८०.०० |
| १२ | यु.पि.व्ही.सी.एलबो (ब्रास)- ३/४" | फिनोलेक्स | १४५ | नग | ८५.०० | १२३२५.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | यु.पि.व्ही.सी. टी- २" | फिनोलेक्स | ९ | नग | ५२.०० | ४६८.०० |
| १४ | यु.पि.व्ही.सी. टी- १.१/२" | फिनोलेक्स | ९ | नग | ४४.०० | ३९६.०० |
| १५ | यु.पि.व्ही.सी. टी- २" x ३/४" | फिनोलेक्स | ७० | नग | ४४.०० | ३०८०.०० |
| १६ | यु.पि.व्ही.सी. टी- १.१/२" x ३/४" | फिनोलेक्स | ५५ | नग | ३५.०० | १९२५.०० |
| १७ | यु.पि.व्ही.सी. टी- १" x ३/४" | फिनोलेक्स | २० | नग | ३२.०० | ६४०.०० |
| १८ | यु.पि.व्ही.सी. रेडयुसर- २" x १.१/२" | फिनोलेक्स | १२ | नग | ५२.०० | ६२४.०० |
| १९ | यु.पि.व्ही.सी. रेडयुसर- १.१/२" x १" | फिनोलेक्स | १२ | नग | ४५.०० | ५४०.०० |
| २० | यु.पि.व्ही.सी.थ्रेडर- २" (बाहेरील आटे) | फिनोलेक्स | १० | नग | ५५.०० | ५५०.०० |
| २१ | यु.पि.व्ही.सी. सोल्युशन | फिनोलेक्स | १५ | किलो | ९००.०० | १३५००.०० |
| २२ | जी.आय. रेडयुसर- २.१/२" x २" | --- | २३ | नग | १००.०० | २३००.०० |
| २३ | पि.व्ही.सी. बॉल व्हॉल-२" | प्रयाग | ४० | नग | ९००.०० | ३६०००.०० |
| २४ | पट्टी व्हॉल- ३/४" | लिडर | १४५ | नग | ५८५.०० | ८४८२५.०० |
| २५ | गेट व्हॉल- २" | लिडर | ४ | नग | ३५००.०० | १४०००.०० |
| | | | | | **एकुण रक्कम-** | **७४५४२३.००** |

साईआश्रम प्रकल्प भाग- १ व २ करीता गार्डनसाठी पाणी पुरवठा करणेकामी वरीलप्रमाणे प्लंबींग साहित्य खरेदी करणे आवश्यक असून त्यासाठी अंदाजे रु. ७,४५,४२३/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचे साहित्य खरेदी विभागामार्फत तातडीने खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रु.७,४५,४२३/- मात्रचे खर्चास मंजुरी मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.८२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम प्रकल्प भाग-१ व २ करीता गार्डनसाठी पाणी पुरवठा करणेकामी लागणारे प्लबींग साहित्य विहित पध्दतीने खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.७,४५,४२३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभाग प्रमुख)

---

**विषय न.२७** **श्रींचे समाधी मंदिरातील मूर्तीचे सुरक्षेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचे दर्शनासाठी समाधी मंदिरात देशाविदेशातुन अनेक साईभक्त येत असतात. श्रींचे भक्तांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याने समाधी मंदिरात दर्शनासाठी भक्तांची नेहमीच गर्दी होत असते. श्रींचे मूर्तीसमोर दर्शन घेत असताना त्यांच्या भावना ब-याच वेळा अनावर होताना दिसतात. त्यामुळे या साईभक्तांकडुन नकळतपणे श्रींच्या मूर्तीवर फुलांचे गुच्छ, हार, सुटे पैसे फेकण्यात येतात. श्रींची मूर्ती ही जगातील एकमेव, अद्वितीय व अनमोल असल्याने सदर मूर्तीची सुरक्षा, संवर्धन व संरक्षण होणे अत्यावश्यक आहे

श्रींचे मूर्तीचे सुरक्षेकरीता भक्त दर्शनासाठी रांगेतून श्रींचे मंदिरात प्रवेश करताच प्रवेशद्वाराजवळ अथवा नंदीजवळ भक्ताने आणेलेले श्रीफळ, हार तसेच पुषगुच्छ तसेच प्रसाद आदी वस्तू संरक्षण विभागाचे पहारेकऱ्यांमार्फत जमा करुन घेऊनच भक्तांना पुजा साहित्य-श्रीफळ, प्रसाद, फुले, फुलांचे गुच्छ वा तत्सम साहित्याव्यतिरिक्त दर्शनास सोडल्यास भक्तांना जलद व व्यवस्थित दर्शन घेऊन बाहेर पडता येईल व श्रींचे पवित्र मूर्तीस होणा-या प्रकारांना आळा बसेल व संरक्षण होईल असे नम्र मत आहे. याप्रकारे व्यवस्था श्रीशनिमंदिर शनिशिंगणापूर येथे केलेली आहे. त्याप्रमाणे योजना संरक्षण विभागामार्फत राबविण्यात यावी असे नम्र मत आहे. यामुळे मूर्तीचे ही संरक्षण होईल व गर्दीमध्ये भक्तांना दर्शन सुलभरित्या घेता येईल.

याबाबत भक्तांनी आणलेले पूजा साहित्य प्रवेशद्वारजवळ अथवा नंदी जवळ संरक्षण विभागामार्फत भक्तांकडून जमा करुन घेऊनच भक्तांना समाधी मंदिरात दर्शनासाठी सोडणेस आदेश होणेस नम्र विनंती आहे. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.८२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,मंदिर विभाग)

---

**विषय नं.२८** **श्री पूण्यतिथी उत्सव २०१२ पुजारी व चोपदार यांचे गणवेशाबाबत.**

**प्रस्ताव-** सालाबादप्रमाणे श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवाचे वेळी मंदिर विभागातील पुजारी व चोपदार यांना नवीन गणवेष शिवण्यात येतात. याही वर्षी श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१२ मध्ये पुजारी व चोपदार यांना गणवेष तयार करुन घेणे आवश्यक आहे. तरी खालीलप्रमाणे खरेदीसाठी रु.४,३७,४९०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. खालीलप्रमाणे खर्चाचा अंदाज सादर करीत आहोत-

**अंदाजपत्रक :-**

| अ.क्र | तपशील | अंदाजे एकूण रुपये |
|---|---|---|
| ०१ | १६ पुजारी व सहाय्यक पुजारी, ०५ कंत्राटी पुजारी<br>प्रत्येकी ०२ सोवळे, ०१ उपरणे, ०१ सुती शॉल याप्रमाणे- | ४६,४१०/- |
| ०२ | एक गवई ०२ धोतरपान, ०२ उपरणे, ०२ नेहरुशर्ट या प्रमाणे - | ५,१९०/- |

| | | |
|---|---|---|
| ०३ | ३९ चोपदारः- संख्या प्रत्येकी ०२ झगे, ०२ सलवार पायजामा, ०१ पगडी, ०२पट्टा, ०२ रुमाल व ०२ पिवळे सोवळे व उपरणे असा संच एकूण ७८ नग | २,०४,७४०/- |
| ०४ | १७ कंत्राटी मदतनीस/चोपदार प्रत्येकी ०१ झगा, ०१ सलवार, ०१ पगडी, ०१ पट्टा, ०१ रुमाल असा संच एकूण १७ नग - | ४३,००५/- |
| ०५ | लाल नेहरु शर्ट व पांढरा पायजमा ड्रेस (कंत्राटी कर्मचारीकरीता) १७ कंत्राटी कर्मचारी प्रत्येकी ०२ नेहरु शर्ट, ०२ पायजमा असा संच एकूण ३४ नग - | १९,६९०/- |
| ०६ | ०२ चोपदार काठ्यांसाठी ०५ मीटर केशरी कापड खरेदी खर्च - | ९७५/- |
| ०७ | स्त्री मदतनीस साड्या ०९ वार ०२ नग, ०६ वार ०२ नग, ब्लाऊज पीस ०६ नग (प्रत्येकी ०२ नग याप्रमाणे) - | ६,१६०/- |
| ०८ | पालखी व वाजंत्री सेवेकरी गणवेष<br>०४ पालखी धारक, ०१ अब्दागिरी धारक यांनाः- प्रत्येकी ०१ झगा, ०१ सलवार, ०१ फेटा, ०१ केशरी शेला<br>तसेच ०६ वाजंत्रीवाले यांनाः- प्रत्येकी ०१ नेहरु शर्ट, ०१ सलवार पायजमा, याप्रमाणे | १५,९६०/- |
| ०९ | शिवणावळः- चोपदार झगे, सलवार, पट्टे, रुमाल, इ. | ४७,७००/- |
| १० | शिवणावळ- लाल ड्रेस ड्रेस व पायजमा | ३,४००/- |
| ११ | शिवणावळः- पालखी सेवेकरी व वाजंत्री ड्रेस. | ३,६८०/- |
| १२ | आराधना विधीनंतर ब्राह्मण व सुवासिनींना वस्त्रदान करणेसाठी वस्त्र खरेदीः | ४०,५८०/- |
| | **एकूण रुपये** | **४,३७,४९०/-** |

उपरोक्तप्रमाणे मंदिर विभागातील पुजारी व सहाय्यक पुजारी, चोपदार, पालखी सेवेकरी, वाजंत्री सेवेकरी, स्त्री बत्तीधारक तसेच आराधना विधीनंतर ब्राह्मण व सुवासिनींना वस्त्रदान करणे कामी कापड खरेदी करणे, चोपदार व मदतनीस यांचे गणवेष शिवणे आवश्यक आहेत. वार्षिक गणवेष खाती रु.४,००,०००/- पर्यंतची तरतूद केलेली आहे. करीता कापड खरेदी व शिवणावळ खर्चास मंजूरी मिळणेस विनंती आहे.

तथापी श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१२ मध्ये मंदिर कर्मचारी यांचेसाठी लागणारे कापड खरेदी करुन व शिवणावळ करुन देण्याची साईभक्तांनी इच्छा प्रदर्शित केली आहे. याकामी येणारा खर्च ते देणगीदाखल करुन देणेस तयार आहेत. तरी वस्त्र खरेदी व गणवेष शिवणावळ करुन घेणेस व यासाठी येणारा खर्च मिळाल्यास देणगी रुपाने स्विकारणेस अथवा थेट खरेदीस मंजूरी असावी व सदर खर्चाची बीले लेखाशाखेमार्फत आदा करणेस मान्यता मिळणेस विनंती आहे.

तरी याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.८२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,मंदिर विभाग )

---

**विषय न.२९ श्रीगुरुस्थान मंदिरातील श्री समर्थ स्वामी पादुका शताब्दी महोत्सव खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री गुरुस्थान मंदिरात स्थापनेलाही १०० वर्षे पुर्ण होत असल्याने सदर कार्यक्रम साजरा करण्यात यावा, याकरीता श्री गुरुस्थान मंदिरामध्ये श्रीसमर्थ स्वामी पादुकांचे स्थापनेचे शताब्दी महोत्सव निमित्त महारुद्राभिषेक पूजा करण्याचे उपरोक्त संदर्भान्वये मा.त्रिसदस्य समितीचे दि.१४/०७/२०१२ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.१०, निर्णय क्र.५६८ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे वतीने बुधवार, दि.०१/०८/२०१२ ते गुरुवार, दि.०२/०८/२०१२ अखेर दोन दिवस "श्रीगुरुस्थान मंदिरातील श्रीसमर्थ स्वामी पादुका शताब्दी महोत्सव- २०१२" साजरा करण्यात आला आहे. या कालावधीत श्रीगुरुस्थान मंदिरामध्ये श्रीसमर्थ स्वामींचे पादुकांना ब्राम्हणांमार्फत संस्थानचे वतीने महारुद्राभिषेक करण्यात आला आहे. सदर विधीचे पौरोहित्याकरीता निमंत्रीत करण्यात आलेले ब्राम्हणांना दक्षिणा देणेकामी खर्च रक्कम रु.३५,०००/- (अक्षरी रुपये पसतीस हजार मात्र) इतका खर्च झाला आहे. तरी सदर महारुद्राभिषेक पूजेकरीता निमंत्रीत ब्राम्हण दक्षिणाकामी झालेल्या खर्चास मा.त्रिसदस्य समितीची कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८२८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीगुरुस्थान मंदिरातील श्री समर्थ स्वामी पादुका शताब्दी महोत्सव विधीचे पौरोहित्याकरीता निमंत्रीत करण्यात आलेल्या ब्राम्हणांना दक्षिणा देणेकामी झालेल्या रक्कम रु.३५,०००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,मंदिर विभाग)

---

**विषय नं.३० श्री साईप्रसादालयाचे दैनंदिन इंधन खर्चात बचत होणेकरीता तसेच फुड वेस्ट डिपोजल समस्या दुर करणेकरीता बायोगॅस प्लॅन्टची उभारणी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांच्या सेवेसाठी दि.०८ जानेवारी २००९ पासून श्री साईप्रसादालय सुरु करण्यात आलेले आहे. प्रसादालय सुरु झालेपासून जून २०१२ पर्यत प्रसाद भोजनचा लाभ घेतलेल्या भक्तांची संख्या व त्यासाठी इंधन म्हणून वापरलेल्या एल.पी. जी. खर्चाचा तपशिल खालील तक्तांत नमूद केलेला आहेत.

| कालावधी | एकुण भक्तांची संख्या | सरसरी प्रती दिन भक्तांची संख्या | गॅस खर्च किलोमध्ये | प्रती दिन एल. पी. गॅस खर्च |
|---|---|---|---|---|
| सन २००९ | १,०४,९७,८७० | २८७६१ | ४५८५८६ | १२५६ |
| सन २०१० | १,०६,२०,२१५ | २९०९६ | ४११२५६ | ११२७ |
| सन २०११ | १,१८,६२,१०४ | ३२४९९ | ४९३६७७ | १३५३ |
| जाने.२०१२ ते जून २०१२ | ७०,०१,२८७ | ३८४७० | २९२५४९ | १६०७ |

दिवसेंदिवस भक्तांची संख्या वाढत असून त्यानूसार वाढणाऱ्या प्रसाद भोजन व्यवस्थेकरीता इंधनाचा खर्च गॅस दरवाढ झालेमुळे वाढलेला आहे. दैनदिन सरासरी भक्तांचे संख्येनूसार प्रतिमाणसी अंदाजे ६० ग्रॅम फुड वेस्ट धरल्यास ३४००० x ६० ग्रॅम = २०४० किलो ओले फुड वेस्ट निघत आहे. त्यात दररोज दोन्ही शिफ्टचा ३०० किलो भाजीपाला वेस्ट (उदा. खराब फळवर्गीय भाजीपाला, भाजीचे देठ इ.) एकत्र केल्यास २०४० + ३०० = २३४० किलो फुड वेस्ट निघत आहे.

एवढे सर्व वेस्ट काही प्रमाणात स्थानिक दुध उत्पादक शेतकरी त्यांचे जनावरांसाठी खाद्य म्हणून घेऊन जातात व शिल्लक फुड वेस्ट कचरा डेपोमध्ये पाठविले जाते. सध्या कचरा डेपो जवळील पिंपळवाडी ग्रामस्थांनी कचरा टाकणेस मनाई केलेमुळे श्री साईप्रसादालयाचे फुड वेस्ट विल्हेवाट लावणे अवघड झालेले आहे. फुड वेस्टची विल्हेवाट लवकर न लावलेमुळे दुर्गंधी सुटून प्रसादालयाचे जवळील रस्ताने प्रसाद घेवून जाणाऱ्या साईभक्तांना दुर्गंधीचा त्रास होत आहे.

श्री साईप्रसादालयाचा दैनंदिन वाढलेला इंधन खर्च कमी करणेसाठी तसेच फुड वेस्ट डिस्पोजल समस्या दूर करणेसाठी श्री साईप्रसादालयाचे उत्तर बाजूस एलओटी सिलेंडर मेनीफोल्ड यंत्रणा जवळील जागेत बॉयोगॅस प्लॅन्टची उभारणी करता येईल.

सध्याच्या फुड वेस्ट प्रमाणानुसार प्रस्तावित बायोगॅस प्रकल्पाचा तांत्रिक तपशिल खालीलप्रमाणे-

- प्रकल्पाची क्षमता = ५ मेट्रीक टन प्रति दिन
- लागणारी जागा = ५००० ते १०००० चौ. फुट
- निर्माण होणारे फुड वेस्ट = २५०० ते ५००० किलो
- पाणी = २५०० ते ३००० लिटर प्रतिदिन
- वीज = २५-३० किलोवॅट
- मनुष्यबळ = ४ (२ प्रतीशिफ्ट )
- भांडवली गूंतवणूक अंदाजे = रु. ५० ते ६० लाख
- पे-बॅक कालावधी = ३ वर्ष ६ महिने

**बायोगॅस प्रकल्पापासून होणारे फायदे**

- गॅस निर्मिती प्रति दिन = १४० किलो
- इंधन खर्चात बचत प्रतिदिन = रु. १०,०००/- (LP गॅसचा प्रचलित दर रु. ६१ प्रती किलो)
- ऑरगॅनिक खत निर्मीती प्रतिदिन = ७०० ते १००० किलो.
- खतापासून मिळणारे उत्पन्न प्रतिदिन = रु. ३०००/- (रु.३/- प्रती किलो)
- शासकिय अनूदान = प्रकल्प खर्चाच्या ५०%(सोलर सिटी अंतर्गत प्रकल्प घेतल्यास)
- कार्बन क्रेडीट = प्रकल्प क्षमता व आंतरराष्ट्रीय युरो दरानुसार

वरील अहवाल हा वेगवेगळया कंपन्याचे तंत्रज्ञानानुसार कमी अथवा जास्त होवू शकतो. याबाबत महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांना लेखीस्वरुपात मार्गदर्शन मिळणेबाबत पत्र देण्यात आलेले होते. तथापि त्यांचेकडील बॉयोगॅस मॅनेजर श्री तायडे यांनी आमचेकडे मनुष्यबळ कमी असल्याने संस्थानच्या प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून असमर्थतता दर्शविली. मात्र प्रस्तून प्रकल्पासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे सांगितले आहे.

श्री साईप्रसादालयातील सोलर एअर कंडीशनींग प्रकल्प व जुन्या प्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे सोलर हॉट वॉटर प्रकल्पामध्ये रुपांतर करणेकामी तज्ञ सल्लागार म्हणून मा. व्यवस्थापन समिती दि.१९.९.२००९ सभेतील निर्णय क्रं. ७३१ (१३) नुसार डॉ. एम.जी ताकवले, माजी कुलगुरु शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना नियुक्त करणेबाबतचा निर्णय झालेला होता. त्याकामी त्यांना रक्कम रु. १,५१,०००/- मानधन व संस्थानमार्फत निवास, प्रवास व भोजन व्यवस्था विनामुल्य करण्याचे मान्य करण्यात आलेले होते. तथापि जुना सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे सोलर हॉट वॉटर मध्ये रुपांतर करणेकामी जास्त खर्च येत असल्याने त्यांनी प्रस्तुत यंत्रणा स्क्रॅप करणेस सांगितले होते. तसेच सोलर एअर कंडीशनींग करणेकामी फक्त सोलर स्टीमवर अवलंबून न राहाता बॉयोगॅस प्रकल्पाद्वारे वाफेची निर्मीती करुन हायब्रीड पद्धीतीने सोलर एअर कंडीशनींग उभारल्यास जास्त यशस्वी होईल असे डॉ. एम. जी. ताकवले यांनी दि.२८.१०.२०१० रोजीचे ईमेलद्वारे कळविलेले होते.

श्री साईप्रसादालयातील प्रस्तुत बॉयोगॅस प्रकल्प उभारणीकामी मार्गदर्शन मिळणेकामी डॉ. एम.जी. ताकवले यांना विचारले असता त्यांनी बॉयोगॅस प्रकल्प हा हायब्रीड सोलर एअर कंडिशनींगचाच भाग असल्याने निश्चित स्वरुपात पुर्वीच्या आपले जा. नं. एसएसएस/वशि/प्रसाद/ १३८८१/ २००९ दि. १२.११.२००९ रोजीचे सल्लागार नियुक्तीचे अटीशर्ती नुसार मार्गदर्शन करता येईल असे सांगितले व तसे दिनांक १२.९.२०१२ चे पत्रात नमुद केले आहे.

तरी डॉ. एम. जी. ताकवले, माजी कुलगुरु शिवाजी विद्यापीठ यांची बॉयोगॅस प्रकल्प उभारणी कामासाठी सल्लागार म्हणून नेमणूक करुन त्यांना रक्कम रु. १,५१,०००/- मानधन देणेस तसेच कामाच्या निविदेची वृत्तपत्रात जाहीरात देणेस व बॉयोगॅस प्रकल्प उभारणीकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ६० लाख पर्यंतच्या खर्चास मान्यता मिळणेकामी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८२९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयाचे दैनंदिन इंधन खर्चात बचत होणेकरीता तसेच फुड वेस्ट डिस्पोजल समस्या दुर करणेकरीता बायोगॅस प्लॅन्टची उभारणी करणेसाठी डॉ. एम. जी. ताकवले, माजी कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ यांना सल्लागार म्हणून नेमणूक देणेसाठी पुढील सभेपुढे समक्ष बोलविण्यात यावे असे ठरले.**

**श्री साई प्रसादालयात फुड वेस्टेज जास्त प्रमाणात जाऊ नये यादृष्टीने काळजी घेण्यात यावी, फुड वेस्टेज संदर्भात इतर ठिकाणचे प्रसादालयाची पाहणी करुन माहिती घेण्यात यावी. तसेच फुड वेस्टेजपासून बायोगॅस प्रकल्पाव्यतिरिक्त दुसरी कोणती योजना राबविता येईल याचीही माहिती घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय न.३१ अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ आणि नियम २०११ नुसार अन्नपदार्थाची क्वालिटी कन्ट्रोल व पृथ्थकरणासाठी प्रयोगशाळा उभारणी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयात दररोज सुमारे ४०,००० साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात.सकाळी ४ ते १० वेळेत १०,००० ते १२,००० अन्नपाकीटे तयार करुन विक्री करणेत येते. तसेच दररोज सरासरी ७५,००० लाडू प्रसाद पाकीटांची तयार करुन विक्री करणेत येते.

एवढया मोठया प्रमाणात अन्न बनविण्याची प्रक्रिया प्रसादालयात अहोरात्र सुरु असते. अन्न शिजविणे, पॅकींग करणे,स्वच्छता ठेवणे इत्यादीबाबत प्रसादालयामार्फत योग्य ती खबरदारी घेतली जाते.तथापी खरेदी विभागाकडून प्राप्त झालेला कच्चा माल उदा.साखर,गावरान तुप,तेल,रवा इत्यादी किरणा साहीत्याची गुणवत्ता तपासणीकामी अथवा भेसळ ओळखणेकामी प्रसादालयात स्वतंत्र रासायनिक प्रयोगशाळा नाही. त्यामुळे पुरवठादार यांचे प्रयोगशाळा अहवालावर निर्भर राहून कच्चा माल स्विकारावा लागतो. यागोष्टीमुळे ऑगष्ट-२०१२ मध्ये गावराण तुपातील भेसळीमुळे लाडू प्रसाद तसेच सत्यनारायण प्रसाद चवीला कडवट असल्याच्या भक्तांच्या,स्थानिक नागरीकांच्या तोंडी तक्रारीमुळे अन्न व औषध प्रशासनाने महाराष्ट्र शासन यांनी शिरडी येथे येवून भेसळयुक्त तुपाच्या डब्यांना तसेच त्यापासून बनविण्यात आलेल्या लाडूंना सील करुन पुढील तपासणीसाठी अन्न व औषध प्रयोगशाळेमध्ये नमुना तपासणीसाठी पाठविण्यात आलेला आहे.

प्रस्तुत घटनेमुळे संस्थान प्रशासनाला बदनामीला सामोरे जावे लागले. त्यामुळे भविष्यात अन्न भेसळ होवून भक्तांच्या आरोग्याला धोका पोहचू नये याकरीता खबरदारीचा उपाय म्हणून संस्थानचे मध्यवर्ती भांडार विभागामध्ये योग्य त्या सेवा सुविधा व उपकरणांसह कच्चा माल तसेच शिजविलेले अन्नपदार्थ यांची गुणवत्ता व भेसळ तपासणीकामी स्वतंत्र रासायनिक प्रयोगशाळा तातडीने सुरु करावी असे नम्र मत आहे.

संदर्भिय अ.नं.३ नूसार अन्नप्रसाद व लाडूप्रसाद तपासणीकामी रासायनिक प्रयोगशाळा सुरु करणेकामी साईभक्त श्री केशू मुर्ती,बेंगलोर यांनी दिनांक २७ ऑगष्ट २०१२ रोजी लेखी पत्राद्वारे अन्न तपासणी प्रयोगशाळेकरीता लागणारे साहित्य देणगी देणेबाबत पत्र दिलेले आहे. त्यानुसार शेजारील प्रकाशने काऊंटरचे रिकाम्या जागेत बांधकाम विभागाकडून आवश्यक प्रयोगशाळा सेटप तयार करुन तसेच लॅब टेक्नीशियन म्हणून Bsc with केमिस्ट्री अर्हता प्राप्त असलेल्या २ तांत्रिक कर्मचाऱ्याची संस्थानमार्फत नियुक्ती करावी लागेल. जेणेकरुन ISO ऑडीटर,अन्न व औषध प्रशासन व सल्लागार यांचे सुचनांची पुर्तता होऊन संस्थान नावलौकीकास भर पडेल.

उपरोक्तकामी प्रयोग शाळा सुरु करणेसाठी Bsc with Chemistry तांत्रिक कर्मचाऱ्याचे नियुक्ती केल्यानंतर लॅबसाठी इतर आवश्यक स्टाफ,इन्स्ट्रमेंट,मशिनरी वगैरेबाबत स्वतंत्र प्रस्ताव सादर करता येईल.

तरी प्रयोगशाळा उभारणीकामी प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.८३० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. संस्थानचे श्री साई प्रसादालयामध्ये अद्ययावत प्रयोगशाळा उभारणी करणेकामी इतर ठिकाणच्या मोठया प्रयोगशाळांची समक्ष पाहणी करणेत यावी. याकामी कुलगुरु, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांचा सल्ला घेण्यात यावा व संस्थानने फुड सेफटी अॅण्ड स्टॅंडर्डस् अॅक्ट २००६, रुल्स**

**ॲण्ड रेग्युलेशन २०११ ची अंमलबजावणी, मार्गदर्शन, कर्मचारी प्रशिक्षण परवाना घेणे व नुतनीकरण करणे इत्यादीकामी सल्लागार म्हणून नियुक्ती केलेले ॲड.श्री.पी.बी. सोबले, पुणे यांचे मार्गदर्शनाने या अगोदर झालेल्या निर्णयाप्रमाणे अद्ययावत प्रयोगशाळेची उभारणी करणेत यावी, याकामी Bsc with Chemistry पात्रताधारक दोन तांत्रिक कर्मचारी संस्थान कर्मचाऱ्यांमधून विभागांतर्गत बदलीने पुरविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय )

---

**विषय न.३२** **साईभक्तांसाठी विनामुल्य प्रसादभोजन चालू करणेबाबत.**

**निर्णय क्र.८३१** **सदरहू विषयावरिल चर्चा पुढे ढकलण्यात आली मात्र याबाबत सर्व माहिती-तपशीलासह सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो पुढील सभेपुढे सादर करावा, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय )

---

**विषय न.३३** **श्री साई प्रसादालयामधील स्वच्छता/ हाऊसकिपींगकामी मे.बी.व्ही.जी. लि., पुणे यांना आऊट सोर्सिंग पध्दतीने दिलेल्या कामास मुदतवाढ देणे अथवा निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयातील स्वच्छता /हाऊसकिपींगचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेण्यात येत आहे. ७ जानेवारी २०१० ते ६ जानेवारी २०११ करीता सदर काम आऊट सोर्सिंग पध्दतीने देणेकामी दि.३०/११/२००९ रोजी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. वृत्तपत्रातील जाहिरातीनूसार आलेले सर्व दरपत्रक मा.व्यवस्थापन समिती दि.१०/०१/२०१० चे सभेपुढे ठेवण्यात आलेले होते. सदर सभेतील निर्णय क्रं.१०६ अन्वये उपरोक्तकामी निवीदा सादरकर्त्याकडून वापरणेत येणारी मशिनरी, मनुष्यबळाची संख्या, कामाचा दर्जा, काम करण्याची पध्दती व कामाचा अनुभव या सर्व बार्बीचा विचार होऊन दि.०७/०१/२०१० ते ०६/०१/२०११ या कालावधीसाठी मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांचे दरमहा रु.७,५०,०००/- दर मान्य करुन काम देण्यात आलेले होते. सदर कालावधीत त्यांनी समाधानकारक काम करुन दिलेले आहे. सदर कामाचा कालावधी दि.०६/०१/२०११ रोजी संपणार होता. तत्पुर्वी त्यांनी दि.१४/१०/२०१० रोजीचे विनंती अर्जाव्दारे सध्याचेच दरात (रु.७,५०,०००/- दरमहा) यापुढील २ वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढीची मागणी केलेली होती.

बी.व्ही.जी. इंडिया प्रा.लि., पुणे यांचा दि.१४/१०/२०१० चा विनंती अर्ज मा.व्यवस्थापन समिती दि.२१/११/२०१० चे सभेपुढे विचारार्थ ठेवण्यात आलेला होता. सदर विनंती अर्जावर दि.२१/११/२०१० चे सभेमधील निर्णय क्रं.९०३ अन्वये सविस्तर चर्चा होऊन यांना पूर्वीचे अटी/शर्तीवर व दरामध्ये दि.०७/०१/२०११ ते ०६/०१/२०१२ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदर कामाची मुदत दिनांक ०६/०१/२०१२ रोजी संपणार होती. तत्पुर्वी त्यांनी दि.०८/१०/२०११ चे विनंती अर्जाव्दारे स्वच्छता/हाऊसकिपींग/पेस्ट कंट्रोलचे कामासाठी सध्याचे दरात (रु.७,५०,०००) मध्ये २५% दरवाढसह पुढील १ वर्षाची मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली होती.

बी.व्ही.जी. इंडिया प्रा.लि., पुणे यांचा दि.०८/१०/२०११ चा विनंती अर्ज मा.व्यवस्थापन समिती दि.१९/११/२०११ चे सभेमध्ये विचारार्थ ठेवण्यात आलेला होता. सदरचे सभेमध्ये बी.व्ही.जी. इंडिया प्रा.लि., पुणे यांचे प्रतिनिधी सोबत समक्ष चर्चा करण्यात आली होती. समक्ष चर्चेअंती सध्याचे दरात २५% ऐवजी १०% दरवाढ करुन एक वर्ष मुदतवाढ देण्याचे मान्य करण्यात आलेले होते. त्यानूसार पुर्वीचा दर रु.७,५०,०००/- + रु.७५,०००/- (१०% प्रमाणे) = रु.८,२५,०००/- ऐवढी रक्कम मान्य झालेली होती.

मा.व्यवस्थापन समिती दिनांक १९/११/२०११ चे सभेतील निर्णय क्रं. ८३९ अन्वये दि.०७/०१/१२ ते ०६/०१/१३ या कालावधीसाठी रु.८,२५,०००/- प्रमाणे जा.नं.एसएसएस/ वशि/ प्रसादा/ ५११६/२०१२ दि.१२/०१/२०१२ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला होता.

बी.व्ही.जी. इंडिया प्रा.लि. यांनी दिनांक ०७/०१/२०१२ ते ०६/०१/२०१३ या कालावधीमध्ये स्वच्छता/हाऊसकिपींग/पेस्ट कंट्रोलचे काम समाधानकारक केलेले आहे. सदर कामाचा कालावधी दिनांक ०६/०१/२०१३ रोजी संपणार आहे.

बी.व्ही.जी. इंडिया प्रा.लि., यांनी दिनांक २७/०९/२०१२ रोजी विनंती अर्ज दिलेला आहे. सदर अर्जामध्ये कर्मचाऱ्यांचे किमान वेतन वाढलेले आहे, मटेरीयल व इतर साहित्याचे दर वाढलेले आहे. रु ८,२५,०००/- मध्ये काम करणे अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे पूर्वीचे दरात (रु.८,२५,०००/-) + २५% वाढ + नियमाप्रमाणे सर्व्हीस टॅक्सची रक्कम मिळावी ही विनंती. बी.व्ही.जी इंडिया प्रा.लि. यांचे विनंती अर्जानूसार पूर्वीची रक्कम रु.८,२५,०००/- + २५% वाढ रु.२,०६,२५०/- = रु.१०,३१,२५०/- एकूण होतील. याशिवाय १२.३६% सर्व्हीस टॅक्सची रक्कम वेगळी मागितलेली आहे. त्यानूसार एकूण रक्कम रु. १०,३१,२५०/- + १,२७,४६३/- = रु.

११,५८,७१३/- एवढी रक्कम होईल. म्हणजेच चालू वर्षापेक्षा पुढील वर्षी ३,३३,७१३/- इतकी रक्कम दरमहा जादा लागणार आहे.

टेंडर कालावधीमध्ये बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांनी श्री साई प्रसादालयातील स्वच्छता/ हाऊसकिपींग व पेस्ट कंट्रोलचे काम चांगल्याप्रकारे करुन दिलेले असल्यामुळे साईभक्त समाधान व्यक्त करतात. त्यामुळे यापुढील कामावधीसाठी स्वच्छता/हाऊसकिपींग/पेस्ट कंट्रोलचे काम आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणे संस्थानचे दृष्टीने हितावह आहे.

बी.व्ही.जी. इंडिया प्रा.लि., पुणे यांचे दिनांक २७/०९/२०१२ चे विनंती अर्जानूसार स्व्च्छता/ हाऊसकिपींग/ पेस्ट कंट्रोलचे कामासाठी मुदतवाढसह सध्याचेच दरात २५% दरवाढ + सर्व्हीस टॅक्स देणे अथवा वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निवीदा मागविणे याबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामधील स्वच्छता/ हाऊसकिपींगचे आऊट सोर्सिंग पध्दतीने काम करीत असलेले ठेकेदार मे.बी.व्ही.जी. इंडिया प्रा.लि., पुणे यांचे कराराची मुदत दि.०६.०१.२०१३ अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे पुढील कालावधीसाठी ठेकेदार नियुक्त करणेसाठी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निवीदा मागविण्यात याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय )

---

**विषय नं.३४** **कॅन्टीन विभागासाठी पोर्टेबल एल.पी.गॅस लिकेज डिटेक्टर खरेदीकरणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईभक्तांना कॅन्टिन विभागामार्फत चहा, कॉफी व दुध पुरविण्यात येते. चहा, कॉफी व दुध बनविणेकामी एल. पी. गॅसचा वापर करण्यात येतो. एल. पी. गॅसच्या भट्टया सतत कार्यरत असतात. काहीवेळेस पाईप लाईन मधून गॅस लिकेज होतो परंतु लिकेज गॅसचे प्रमाण कमी असल्यास कर्मचाऱ्यांच्या लक्षात येत नाही. सुरक्षाच्या दृष्टीने गॅस लिकेज असणे धोकादायक आहे.

कॅन्टिन विभागाकडे तांत्रिक कर्मचारी नसल्याने गॅस लिकेज लक्षात येणेकरीता लिकेज डिटेक्टर असणे आवश्यक आहे. लिकेज डिटेक्टरमुळे कर्मचाऱ्यास लिकेजचे ठिकाण तात्काळ लक्षात येईल. मा. का. अ. सो. यांचे सुचनेनुसार तसेच कॅन्टिंन विभागाचे दिनांक ०२.०८.२०१२ रोजीचे डि.पी. नुसार मुख्य कॅन्टिन व नविन भक्तनिवास कॅन्टिन करीता दोन पोर्टबल गॅस लिकेज डिटेक्टर खरेदी करणे आवश्यक आहे. वेगवेगळया एजन्सीज यांचेकडुन विहित पद्धतीने दरपत्रक मागवून एक्सप्लोझीव्ह विभागाचे मान्यताप्राप्त कंपनीचे डिजीटल पोर्टेबल गॅस डिटेक्टर निम्नतम दराने खरेदी करता येईल. अंदाजे प्रती नगास रु. ४००००/- याप्रमाणे दोन नगास अंदाजे रु. ८०,०००/- (अक्षरी रुपये ऐंशी हजार मात्र) पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

तरी कॅन्टिन विभागासाठी दोन डिजीटल गॅस डिटेक्टर खरेदी करणे व त्याकामी अंदाजे रक्कम रु. ८०,०००/- (अक्षरी रुपये ऐंशी हजार मात्र) पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेकामी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टिन विभागासाठी दोन डिजीटल गॅस डिटेक्टर खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय न.३५** **मे.राहूल एंटरप्रायझेस, नाशिक यांनी दोन वेळा कॉर्नेलो खाद्यतेलाचा पुरवठा करणेस असमर्थता दर्शविलेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१२ (जुन-२०१२ ते सप्टेंबर-२०१२अखेर) किराणा माल पुरविणेबाबत दि.३०.०५.२०१२ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेत झालेल्या चर्चा वाटाघाटीत मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक याचें खाद्यतेलाचे खालीलप्रमाणे न्युनतम दर मान्य करण्यात येऊन त्यांना वरील नं.१ चे संदर्भीय पत्रान्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

| अ. नं. | मालाचा तपशिल | जात/ प्रकार | मागणी क्विंटल | दर प्रती क्विंटल | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | खाद्यतेल<br>मका, रिफाईन्ड ॲगमार्क<br>१५ कि.ग्रॅ.नवीन डबा पॅकिंग | कार्नोलो मका | ११६० | ८,१७५/- व्हॅटसह | ९४,८३,०००/- |

पुरवठा आदेशानुसार आज अखेर मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक यांनी ४२२.५० क्विंटल खाद्यतेलाचा पुरवठा केलेला आहे. जा.नं.१५९४ दि.१२.०७.१२ नुसार १७० क्विंटल व जा.नं.२१११ दि.१०.०८.१२ नुसार १७० मागणी केला असता, त्यांनी दि.१३.०८.१२ रोजीचे पत्रान्वये काही तांत्रिक बाबी निर्माण झाल्यामुळे गोडेतेल ऑईल मिलचे उत्पादन येत्या १० दिवसांसाठी बंद झाले असल्याने सद्यस्थितीत कॉर्नोलो ऐवजी स्टार सनफ्लॉवर खाद्यतेलाचा पुरवठा करणेस परवानगी मिळण्याची विनंती केली होती.

त्यावर दि.१३.०८.२०१२ रोजी टिपणी सादर करुन त्यावेळी तज्ञ समितीने दि.२८.०५.२०१२ रोजी जे नमुने निवडले होते त्या खाद्यतेलाचे दर सबंधीत पुरवठाधारकांकडून घ्यावे. तसेच मक्याचे तेल उपलब्ध होत नसल्यास पुरवठाधारकास सुर्यफुल तेल, जे खरेदी Process मध्ये निवडलेल्या नमुन्याचे खरेदी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार पुरवठाधारकांकडून खरेदी Process मध्ये निवडलेल्या नमुन्याचे दरपत्रके फॅक्सद्वारे मागविण्यात आली होती. त्यानुसार पुरवठाधारकांनी दिलेल्या दराचा तपशिल खालीलप्रमाणेः-

| **अ. नं.** | **पुरवठाधारकाचे नांव** | **ब्रॅण्ड** | **दि.३०.०५.२०१२ रोजी चर्चा वाटाघाटीमध्ये दिलेले दर प्रति क्विंटल** | **फॅक्स दरपत्रकाद्वारे दिलेले सध्याचे दर प्रति क्विंटल** |
|---|---|---|---|---|
| ०१. | राहुल एंटरप्रायझेस, नाशिक | कार्नेलो मका | **८,१७५/- व्हॅटसह** | दर दिलेले नाहीत. |
| ०२. | रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कं., नाशिक | तिरुपती मका | ९,५५५/- व्हॅटसह | ९,७९९.६५ व्हॅटसह |
| ०३. | आदर्श मार्केट, पुणे | किर्ती गोल्ड सुर्यफुल | ९,२४०/- व्हॅटसह | दर दिलेले नाहीत. |
| ०४. | बाफणा बजार, नाशिक | किर्ती गोल्ड सुर्यफुल | ९,५५५/- व्हॅटसह | **८,५२५/- व्हॅटसह** |
| ०५. | भारत राईस अॅण्ड ऑईल मिल, है.बाद | विशालड्राप सुर्यफुल | ८,२२६.७५ व्हॅटसह | ८,६०४/- व्हॅटसह |
| ०६. | एस.के.ऑईल इंडस्ट्रीज, जळगांव | फ्रायलाईट सुर्यफुल | ८,६९४/- व्हॅटसह | ९,१२५/- व्हॅटसह |

पुरवठाधारकांनी दिलेल्या दरपत्रकांमध्ये मे.बाफणा बजार, नाशिक यांचे किर्ती गोल्ड सुर्यफुल खाद्यतेलाचे दर सर्वात कमी असल्याने त्यांचेकडून १८० क्विंटल किर्ती गोल्ड सुर्यफुल खाद्यतेल प्रति क्विंटल रु.८,५२५/- व्हॅटसह या दराने खरेदी करण्यात आले. सदर खरेदीसाठी जादा आलेली खर्चाची रक्कम मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक यांचे बिलातून वसुल करण्यात आलेली आहे.

त्यानंतर मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक यांनी पुन्हा दि.१३.०९.२०१२ रोजीच्या पत्रान्वये गोडेतेल ऑईल मिलमध्ये काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे सध्या मागणीप्रमाणे पुरवठा करु शकत नाही. रविवार दि.१६.०९.२०१२ रोजी मी पुर्ववतप्रमाणे कॉर्नेलो गोडतेलाचा पुरवठा नियमितपणे करण्यास तयार असल्याचे कळविले आहे. दरम्यानचे काळात साईभक्तांना सेवा देण्यास अडचण निर्माण होऊ नये म्हणून दि.१३.०९.२०१२ ते दि.१६.०९.२०१२ पर्यंत २०० डबे (३० क्विंटल) सुर्यफुल किर्ती गोल्ड खाद्यतेलाचा पुरवठा मका कॉर्नेलो खाद्यतेलाच्या मंजुर दरामध्ये देण्यास तयार असल्याचे कळविले आहे.

मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक यांनी दि.१२.०९.२०१२ अखेर ७६२.१० क्विंटल खाद्यतेलाचा पुरवठा केलेला असून ३९७.९० क्विंटल खाद्यतेल येणे बाकी आहे.

उपरोक्तप्रमाणे मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक यांनी दोन वेळा खाद्यतेलाचा पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. त्यांनी अचानक माल पुरवठा बंद केल्यामुळे प्रसादालयाचे दैनंदिन कामकाजामध्ये अडचण निर्माण होत आहे.

मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक यांच्या करारनाम्यातील अट व शर्त क्र.८ नुसार कराराचे मुदतीत पार्टी नं.०२ यांनी मंजूर झालेल्या दराने व नमुन्याप्रमाणे माल पुरवठा करणे बंधनकारक आहे. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागविण्याचा अधिकारी पार्टी नं.२ यांना असणार नाही. अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पार्टी नं.०२ यांनी माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास त्या मालासाठी असलेली त्यांची पुर्ण सुरक्षा अनामत रक्कम दंड म्हणून संस्थान खाती जमा करणेत येईल. तसेच पार्टी नं.१ यांना बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन माल खरेदी करावा लागल्यास जादा येणाऱ्या खर्चाची नुकसान भरपाई पार्टी नं.०२ यांचेकडून वसुल केली जाईल व त्यांचे नांव काळ्या यादीत समाविष्ठ करण्यात येऊन, पुढील ३ वर्षांसाठी त्यांना पार्टी नं.०१ यांचे कोणत्याही खरेदी प्रक्रियेत सहभाग घेता येणार नाही असे नमुद आहे.

तरी उपरोक्त अटीनुसार मे.राहुल एंटरप्रायझेस,नासिक यांनी कार्नेलो गोडतेल न पुरविल्याने ते बाजारभावाने घेतल्याने अधिक रक्कम त्यांचे बिलातून वसुल करण्यात आलेली आहे. करीता मे.राहूल एंटरप्रायझेस, नासिक यांना यापुढील तीन वर्षासाठी खाद्यतेल पुरवठा करण्यासंबंधी खरेदी प्रक्रियेत सहभाग घेण्यास नाकारण्यात येवून त्यांचे नाव काळया यादीत टाकता येईल यावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.राहूल एंटरप्रायझेस, नाशिक यांनी दोन वेळा कॉर्नेलो खाद्यतेलाचा पुरवठा करणेस असमर्थता दर्शविली असल्यामुळे त्यांना यापुढील ३ वर्षासाठी खाद्यतेल पुरवठा करण्यासंबंधी खरेदी प्रक्रियेत सहभाग घेता येणार नाही. तसेच कॉर्नेलो**

**कंपनीचे खाद्यतेल एक वर्षासाठी कोणत्याही पुरवठाधारकांकडून संस्थानसाठी खरेदी करणेत येऊ नये, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक-खरेदी विभाग )

---

**विषय न.३६ मे.बाफणा बजार, नाशिक यांचेकडून वसुल करावयाचे रकमेबाबत.**

**प्रस्ताव-** मागील १५ ते २० दिवसापासून बनविण्यांत येणारे लाडू व सत्यनारायण पुजेसाठी बनविण्यांत येणा-या शिरा प्रसादाची चव कडवट लागत असलेबाबत स्थानिक नागरिक व साईभक्तांच्या तोंडी तक्रारी आल्याने व त्याबाबत वर्तमानपत्रात प्रसिध्दी आल्याने दि.२५.०८.१२ रोजी मा.त्रीसदस्य समितीने प्रसादालयात प्रत्यक्ष पाहणी करुन लाडू प्रसाद बनविणेचे प्रक्रियेबाबत माहिती घेऊन स्वतः लाडूची चव घेतली. त्यामध्ये कडवटपणा आढळल्याने त्यांनी महारतन बॅण्डचे गावरान तूपाचा पुरवठा त्वरीत बंद करुन दुस-या कंपनीचे गावरान तूप खरेदी करणेबाबत निर्णय घेतला.

त्यानुसार मे.इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी यांचे सोनाई ब्रॅण्डचे गावरान तुप प्रति क्विंटल रु.२३,७००/- + ५% व्हॅट = रु.२४,८८५/- मात्र या दराने खरेदी करणेबाबत निर्णय झाला. त्यानुसार तातडीची गरज म्हणून ६०० क्विंटल गावरान तुप वरील दराने खरेदी करणेबाबतचे खरेदी विभागाकडील दि.२७.०८.२०१२ रोजीचे टिपणीन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी यांचेकडून तुपाचा पुरवठा चालु झालेला आहे.

मे.बाफणा बजार, नाशिक यांचे करारनाम्यातील शर्त व अट क्र.२ मध्ये "मालासोबत मालाचे चलन व बिल असले पाहिजे. मालाच्या जातीत/दर्जात/प्रकारात काहीही कमी-जास्त आढळल्यास तो माल नाकारणेचा हक्क पार्टी नं.०१ हिस राहील. पुरविलेल्या मालात खराब व टाकाऊ माल आढळल्यास त्याची किंमत बिलातून वजावट करुन बिल आदा केले जाईल. त्याबद्दल तक्रार चालणार नाही."

शर्त व अट क्र.८ मध्ये "कराराचे मुदतीत पार्टी नं.०२ यांनी मंजूर झालेल्या दराने व नमुन्याप्रमाणे माल पुरवठा करणे बंधनकारक आहे. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागविण्याचा अधिकार पार्टी नं.२ यांना असणार नाही. अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पार्टी नं.०२ यांनी माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास त्या मालासाठी असलेली त्यांची पुर्ण सुरक्षा अनामत रक्कम दंड म्हणून संस्थान खाती जमा करणेत येईल. तसेच पार्टी नं.१ यांना बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन माल खरेदी करावा लागल्यास जादा येणाऱ्या खर्चाची नुकसान भरपाई पार्टी नं.०२ यांचेकडून वसुल केली जाईल व त्यांचे नांव काळ्या यादीत समाविष्ठ करण्यात येऊन, पुढील ३ वर्षांसाठी त्यांना पार्टी नं.०१ यांचे कोणत्याही खरेदी प्रक्रियेत सहभाग घेता येणार नाही. "

शर्त व अट क्र.९ मध्ये " पुरवठा करणेत आलेल्या मालाचे संपुर्ण बिल मालाची तपासणी करुन, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करणेत येईल. मालाच्या पुरवठ्याबाबत पार्टी नं.२ यांना आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. पार्टी नं.१ हे आवश्यकतेनुसार मा.अन्न आणि औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांचे प्रयोगशाळेत मालाची तपासणी करतील. त्यांचेकडील तपासणी अहवालानुसार पार्टी नं.२ यांना पुर्तता करावी लागेल", असे नमुद केलेले आहे.

मे.बाफणा बजार, नाशिक यांचे करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार त्यांचेकडून वसुल करावयाचे रकमेबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे :-

मे.बाफणा बजार, नाशिक यांची संस्थानकडे जमा असलेल्या रकमेचा तपशिल खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| १. गावरान तुप करिता जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम<br>(पावती क्र.७५ दि.०३.०७.२०१२ अन्वये जमा) | :- रु. ५,२८,१६०/- |
| २. इतर किराणा माला करिता जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम<br>(पावती क्र.७५ दि.०३.०७.२०१२ अन्वये जमा) | :- रु. ७१,८४०/- |
| ३. लेखाशाखेकडे प्रलंबित असलेल्या गावरान तुप बिलांची रक्कम<br>(बिल क्र.२३/१५.०८.१२ एकुण १००० डबे पैकी ५६४ डबे तुप वापरलेले आहे.) | :- रु.१८,३८,७८१/- |
| ४. लेखाशाखेकडे प्रलंबित असलेले खाद्यतेलाचे बिलाची रक्कम<br>(बिल क्र.२४/१८.०८.२०१२) | :- रु.१५,३४,५००/- |
| **एकुण जमा रक्कम** | **:- रु.३९,७३,२८१/-** |

(अक्षरी रक्कम रुपये एकोणचाळीस लाख त्र्याहत्तर हजार दोनशे एक्क्याऐंशी मात्र)

(उपरोक्त अ.क्र.३ मधील बिल नं.२३ दि.१५.०८.२०१२ नुसार प्राप्त १००० डब्यांमधील ५६४ डबे गावरान तुप वापरलेले असून शिल्लक ४३१ डबे अधिक बिल नं.२५ मधील ९०० डबे याप्रमाणे एकुण १३३१ डबे अन्न औषध प्रशासन महाराष्ट राज्य, अहमदनगर यांनी सील केलेले आहेत. तसेच बिल नं.२३ दि.१५.०८.१२ मधील ५ लुज डबे मंदिर विभागाकडून भांडार विभागाकडे जमा आहे. असे एकुण १३३६ डब्यांच्या देयकाची रक्कम रु.४३,५५,६९४/- मात्र प्रलंबित आहे.)

मे.बाफणा बजार, नाशिक यांचेकडून वसुल करावयाची रकमेबाबतचा प्रसादालय विभागाने डि.पी.क्र.२७०५/ दि.२९.०८.२०१२ नुसार कळविलेला (अ.क्र.१,२,३) तपशिल खालीलप्रमाणे :-

१. नष्ट करणेचे १३५९७९ नग लाडूची होणरी रक्कम :- रु. ८,१५,८७४/-
वजा अन्न व औषध प्रशासन यांनी तपासणीकामी :- रु. २४०/- :- रु.८,१५,६३४/-
खरेदी केलेले ४० लाडूंची रक्कम.
२. तळलेली ७२२ किलो बुंदी. :- रु. १,२७,०९७/-
३. जळालेले शिल्लक ९६५ किलो तुपाची रक्कम :- रु. २,०९,७४२.५०
४. मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी यांचे ६०० क्विंटल :- रु.१८,९०,०००/-
सोनाई ब्रॅण्डचे तुप खरेदी केल्याने जादा येणाऱ्या फरकाची रक्कम ------------------------
करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार वसुल करावयाची एकुण रक्कम :- रु.३०,४२,४७३.५०

(तसेच अन्न औषध प्रशासन, अहमदनगर यांनी सील केलेले महारतन ब्रॅण्डचे गावरान तुपाचे १३३१ डबे तसेच मंदिर विभागाकडील लुज पाच डबे भांडार विभागाकडे जमा आहेत. असे एकुण १३३६ डब्यांच्या बिलांची देय नसलेली रक्कमः- रु.४३,५५,६९४/- (अक्षरी रुपये त्रेचाळीस लाख पंचावन्न हजार सहाशे चौऱ्यान्नव मात्र) सदर माल परत घेऊन जाण्यास तयार असलेबाबत मे.बाफणा बजार, यांनी त्यांचे दि.२७.०८.१२ चे पत्रात नमुद केले आहे.)

मे.बाफणा बजार, नाशिक यांचेकडील भांडार विभागाकडे शिल्लक असलेले महारतन ब्रॅण्डचे १३३१ डबे (१९९.६५ क्विंटल) (बिल नं.२३ मधील ४३१ डबे व बिल नं.२५ मधील ९०० डबे) गावरान तुप अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य, अ.नगर यांचेमार्फत सील करण्यात आलेले आहेत. त्या बाबतचा त्यांचा अहवाल अद्याप प्रस्तावित आहे.

तरी मे.बाफणा बजार नाशिक यांचेकडून वसुल करावयाच्या रकमेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.बाफणा बजार नाशिक यांचेकडून करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार रु.३०,४२,४७३.५० मात्र रक्कम वसुल करण्यात यावी, तसेच अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य, अहमदनगर यांचेकडून कारवाईचा अहवाल मागवावा, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय न.३७** **श्री साईलीला इंग्रजी आंतरराष्ट्रीय स्वागत अंक विदेशात पाठविणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ ठ मध्ये " श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील " अशी तरतुद आहे.

या तरतूदीनुसार विदेशात श्री साईबाबांचे जीवन कार्याचा प्रचार-प्रसार व्हावा म्हणून मा.व्य.स.सभा दि.२४.०९.२०११ निर्णय क्र.७५५ च्या निर्णयान्वये आंतरराष्ट्रीय साईलीला इंग्रजी द्वैमासिक चालू करण्याचे ठरले असून, सदर मासिकाच्या संपादनासाठी श्री. रघुनाथ रेड्डी, तिरुपती यांची मानद संपादक म्हणून नियुक्ती करणेत आली आहे. श्री रेड्डी यांनी संपादीत केलेल्या स्वागत अंकाची २०,००० प्रतींची छपाई मा.व्य.स.सभा दि.१९.०२.२०१२ निर्णय क्र.२३८ नुसार मे.टॅको व्हीजन्स प्रा.लि., मुंबई यांचेकडून प्रती नग रु.१०८/- दराने करणेत आली असून, छपाई खर्च रु.२१,६०,०००/- झालेला आहे. श्री रेड्डी यांनी दिलेल्या यादीप्रमाणे विदेशात ज्या शहरांमध्ये अंक पाठवायचे आहेत, त्यांचे पत्ते टाकूण ५० नगाचे २९२ बंडल तयार करुन मुंबई कार्यालयात जमा आहेत.संस्थान आंतरराष्ट्रीय साईलीला इंग्रजी द्वैमासिक नव्यानेच सुरु करीत आहे हे विदेशातील सर्व साईभक्तांना विदीत व्हावे, तसेच विदेशातील साईभक्तांनी अधिकाधिक संख्येने सदर मासिकाचे सभासदत्व (Subscription) घ्यावे असे आवाहन स्वागत अंकात केले असून, पुढील नियमीत द्वैमासिक अंकांची वार्षिक वर्गणी वगैरेबाबत माहिती त्यात देणेत आली आहे. सदर स्वागत अंक विदेशात विनामूल्य वितरीत करणेकामी करावयाच्या तदनुषंगीक कार्यवाहीसाठी येणा-या अंदाजे रु.३०,००,०००/- चे खर्चास मा.व्य.स.सभा दि.२८.०४.२०१२ निर्णय क्र.३९२ नुसार मान्यता आहे. या कार्यवाहीचा भाग म्हणून, वितरणाचा खर्च रु.५/- लाखापेक्षा जास्त असल्याने, अधिनियामान्वये प्रचलीत तरतूदीनुसार दि.१९.०९.२०१२ चे मंजूर टिपणीनुसार एक्सपोर्ट कंपन्याद्वारा सागरी व हवाई मार्गाने अंक पाठविणेकामी दि.१४.०७.२०१२ अखेर दरपत्रके सादर करणेकामी दि.०३.०७.२०१२ च्या दोपहरका सामना मुंबई आवृत्तीत जाहीरात देणेत आली होती. याकामी जाहीरातीचा खर्च रु.२६,४००/- झालेला आहे. उपरोक्तकामी एकही निविदा प्राप्त झालेली नाही. मे.बाबा क्लिअरींग ॲन्ड फॉरवर्डींग प्रा.लि., मुंबई व वालीया एक्सपोर्ट कं., मुंबई यांचेची दूरध्वनीवरुन संपर्क साधून सदरकामी दरपत्रक भरणेबाबत कळविले होते. तथापि त्यांनी सांगीतले की, ज्या शहरात अंक पाठवायचे आहेत तेथील पार्टीने त्या देशातील विमानतळावरुन पार्सल ताब्यात घेणे आवश्यक आहे. आम्ही फक्त मुंबई ते विदेशातील विमानतळापर्यंत पार्सल पोहच करु. डोअर डिलीव्हरी देणार नाही. या कारणामुळे कोणीही दरपत्रक भरले नसावेत.

सदर विषय मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे निदर्शनास आणून दिला असता, सदर अंक पोष्टाने पाठविणेकामी कार्यवाही केलेस किती खर्च येईल याबाबत मुंबई येथून माहिती घ्यावी असे निर्देश दिले होते.

कार्यालय अधीक्षक,मुंबई कार्यालय यांनी त्याबाबतची माहिती सादर केली आहे.

१) विदेशातील शहरात बुक पोष्टाने कोणतेही पार्सल पाठविले जात नाही. त्यामुळे स्पीड पोष्टाने अथवा रजिष्टर पोष्ट पार्सलने अंक पाठवावे लागतील.

२) स्पीड पोष्टाने पार्सल पाठवायचे असल्यास ३५ किलो पावेतो पार्सल जाऊ शकते प्रेसकडून ५० नगांचे प्रती २१-२५४ कि.ग्रॅमचे २९२ पार्सल बंडल जमा आहेत. त्यास खालीलप्रमाणे खर्च येईल.

| अ.नं. | देशाचे नांव | प्रती बंडल खर्च | बंडल | अंदाजे एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | ऑस्टेलिया | १५,०११.०० | ५६ | ८४०६१६.०० |
| ०२ | युनायटेड किंगडम | १०,५२३.०० | ४० | ४२०९२०.०० |
| ०३ | न्युडीलंड | १४,८८८.०० | २२ | ३२७५३६.०० |
| ०४ | मलेशिया | ५,७४२.०० | ६० | ३४४५२०.०० |
| ०५ | कॅनडा | १५,२१९.०० | ४६ | ७०००७४.०० |
| ०६ | बहारीन | ५,५११.०० | ०१ | ५५११.०० |
| ०७ | युएसए | १४,९३६.०० | ६८ | १०१५६४८.०० |
| | | **एकूण** | **२९३** | **३६५४८२५.००** |

रजिष्टर्ड पोष्ट पार्सलने अंक पाठवायचे असल्यास एका बंडलचे वजन २० किलोपेक्षा जास्त नसावे. प्रेसकडून जमा झालेली २९२ बंडल्स २१.२५४ कि.ग्रॅमची असल्याने सर्व बंडल्स खोलून प्रत्येकी २० किलोची करुन परत पॅकींग करावी लागतील रजिष्टर्ड पोष्ट पार्सलसाठी खालीलप्रमाणे खर्च येईल.

| अ.नं. | देशाचे नांव | प्रती बंडल खर्च | बंडल | अंदाजे एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | ऑस्टेलिया | ५,५३० | ६० | ३३१८००.०० |
| ०२ | युनायटेड किंगडम | ५,६०८ | ४३ | २४११४४.०० |
| ०३ | न्युझीलंड | ५,५३० | २४ | १३२७२०.०० |
| ०४ | मलेशिया | ३,९८० | ६४ | २५४७२०.०० |
| ०५ | कॅनडा | ७,५०५ | ४९ | ३६७७४५.०० |
| ०६ | बहारीन | ३,९५० | ०१ | ३९५०.०० |
| ०७ | युएसए | ३,९५० | ७३ | २८८३५०.०० |
| | | **एकुण** | **३१४** | **१६,२०,४२९.००** |
| रिपॅकींग, वाहतुक व हमाली करणे कामी येणारा अंदाजे खर्च रु. | | | | **३०००००.००** |
| | | | **एकूण रु** | **१९२०४२९.००** |

रजिष्टर्ड पार्सलने अंक पाठविल्यास, तुलनेने खर्च खूपच कमी लागतो .तथापि २९३ बंडल खोलून २१.२५४ ऐवजी २० किलोचे करावे लागतील त्यासाठी लागणारा खर्च गृहीत धरला तरीही तुलनेने खर्च कमी येईल.

खालील बाबीवर निर्णय होणेस विनंती.

१) विदेशात रजिष्टर्ड पोष्ट पार्सलने अंक पाठविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.१९,२०,४२९/- चे खर्चास मान्यतेसाठी सादर.

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४.०७.२०१२ च्या सभेतील निर्णय क्र.४८२ नुसार पुढील नियमित साईलीला इंग्रजी आंतरराष्ट्रीय द्वैमासिक अंक छपाईबाबतचा विषय स्थगीत ठेवणेत आलेला आहे. सबब त्यावर अंतीम निर्णय होणे आवश्यक आहे. अंक छपाई न करता वेबसाईटवर प्रकाशित करता येईल असे नम्र मत आहे.

३) विदेशात अंक न पाठविता, विदेशातील जे साईभक्त शिरडीस दर्शनास येतील त्यांना तसेच विदेशातील सर्व मंदिरांचे व्यवस्थापकांना त्यांचे मागणीनुसार जनसंपर्क कार्यालयामार्फत विनामूल्य देणेबाबत विचार होणेस विनंती.

४) आंतरराष्ट्रीय साईलीला इंग्रजी स्वागत अंक छपाईकामी झालेला खर्च व मोफत वितरणकामी होणारा खर्च Publication Expenses खाते नावे टाकता येईल.

सबब १,२,३ व ४ यास निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८३६ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.३८ श्री साईनाथ सगुणोपासना (मराठी आरती) पुस्तकाचे उर्दू भाषेत भाषांतर करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री भूषणलाल कौल,जम्मुतावी यांनी श्री साईनाथ सगुणोपासना (मराठी आरती) पुस्तकाचा उर्दू भाषेत अनुवाद केला आहे. तथापि तो करताना मुळ अर्थात काही बदल झाले किंवा कसे याची खातरजमा संस्थानने उर्दू भाषा तज्ज्ञाकडून करुन घ्यावी. त्यासाठीचा खर्च ते देण्यास तयार आहेत. तसेच त्यानंतर सदर उर्दु अनुवादीत पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करावे असे त्यांनी दि.१८.०९.२०१२ चे पत्रान्वये कळविले आहे.

मा.व्य.समिती सभा दि.२४.०५.२००८ निर्णय क्र.४१५ नुसार प्रकाशनांची वाढती संख्या लक्षात घेऊन इतर कुठल्याही अन्य खाजगी प्रकाशनांचे हक्क स्वीकारण्यात येऊ नये असा निर्णय झाला आहे. तथापि सदर मराठी पुस्तकाचा ते उर्दू भाषेत अनुवाद करीत आहेत.

संस्थान प्रकाशनांचा जास्तीत जास्त भाषेत अनुवाद होऊन सर्व भाषिकांना त्याचा लाभ व्हावा म्हणून त्यांचा प्रस्तावाचा विचार करणे योग्य वाटते.

संस्थानचे प्रचलित नियमाप्रमाणे अनुवाद करुन तो मुळ मराठी पुस्तकाप्रमाणे योग्य असून मुळ अर्थात कोणताही बदल नाही असे पुणे विद्यापीठाकडून त्यांचे लेडरहेडवर प्रमाणपत्र व सीडी सादर करणेबाबत त्यांना कळविता येईल.सर्व बाबींची पूर्तता झाल्यानंतरच पुस्तकाचे संस्थानद्वारा प्रकाशित करणेबाबत कार्यवाही करणेत येईल.

सबब श्री. भूषण लाल कौल, जम्मुतावी यांनी उपरोक्त नमुद केलेप्रमाणे कार्यवाही पूर्ण केल्यानंतर सदर पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.८३७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.३९ सन २०१३ ची श्री साई एक्झ्युक्युटिव्ह दैनंदिनी छपाई करणेस मान्यतेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानद्वारा प्रतिवर्षी श्री साई दैनंदिनी प्रकाशित करुन विक्री केली जाते. सन २०१३ च्या २,५०,००० दैनंदिनी प्रती नग रु.५०/- दराने छपाईकामी कार्यादेश देणेत आले आहेत.

तथापि ब-याच भक्तांकडून संस्थानने डिलक्स एक्झ्युक्युटीव्ह दैनंदिनी विक्रीस ठेवाव्यात अशी मागणी होत आहे. त्यांचे मागणीचा विचार करुन प्रायोगिक तत्वावर २०१३ च्या ५००० नग डिलक्स इंग्रजी भाषेतील एक्झ्युक्युटिव्ह दैनंदिनी छपाई कराव्यात असे नम्र मत आहे.

छपाई प्रचलित नियमाप्रमाणे प्रकाशने विभागाकडील अधिकृत निवडक प्रेसधारकांचे यादीतील प्रेसधारकांना दर मागणी पत्रके पाठवून, प्राप्त दरपत्रके मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे उघडून, उपस्थित प्रेसधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निम्नतम दरधारकाकडून करुन घेता येईल.

छपाईकामी प्रती नग अंदाजे रु.३५०/- दराने रु.१७,५०,०००/- खर्च अपेक्षीत आहे. दैनंदिनी विक्रीस चांगला प्रतिसाद मिळाल्यास त्याच मंजूर दराने आवश्यक जादा प्रतींची छपाई करुन घेता येईल.

निर्णयार्थ व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.८३८ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन- २०१३ वर्षासाठी श्री साई एक्झियक्युटिव्ह दैनंदिनी छपाई करणेसाठी, संस्थानची प्रकाशने छपाईचे विहित कार्यपध्दतीने श्री साई एक्झियक्युटिव्ह दैनंदिनी छपाई करणेची प्रक्रिया पुर्ण होणेस बराचसा कालावधी लागेल व वेळेपुर्वी छपाईचे काम पुर्ण होणार नाही. त्यामुळे सन- २०१३ या वर्षाऐवजी सन- २०१४ या वर्षासाठी सदरची श्री साई एक्झियक्युटिव्ह दैनंदिनी छपाई करणेसाठी वेळेत छपाईची प्रक्रिया सुरु करणेत यावी, असे ठरले.**

**तसेच, यावेळी झालेल्या चर्चेत असेही ठरले की, संस्थानची प्रकाशने छपाई करणेसाठी प्रतिवर्षी सुमारे रु. दहा कोटी एवढा खर्च संस्थानला करावा लागतो. तसेच बऱ्याच वेळा छपाई केलेली संस्थान प्रकाशने वेळेवर उपलब्ध होऊ शकत नाहीत. हे विचारात घेता, संस्थानची प्रकाशने छपाई करणेसाठी संस्थानची स्वत:ची अद्ययावत प्रेस उभारणी करणे आवश्यक झालेले आहे. त्यादृष्टीने सर्व बाबींचा विचार करुन संस्थानची अद्ययावत प्रेस उभारणी करणेसाठी स्वतंत्र प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४० मा.व्यवस्थापन समितीच्या स्थायी मान्यतेनुसार दि.०१ एप्रिल २०११ ते दि.३१ मार्च २०१२ या आर्थिक वर्षात संस्थानतर्फे मान्यवरांना भेट देण्यात आलेले संस्थान प्रकाशने स्टॉकमधून जमा नावे करण्यात आली आहे त्यास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ चा कलम १७ (ठ) मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.१७ (ठ) समितीचे कर्तव्ये व अधिकार

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील "

मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१२.०६.२०११ च्या सभेतील निर्णय क्र.४२९ नुसार संस्थानतर्फे मान्यवरांना प्रकाशने भेट देण्यास मा.व्यवस्थापन समितीची स्थायी मान्यता आहे.

दि.२१.०९.२०११ च्या प्रस्तावावरील मान्यतेनुसार मान्यवरांना संस्थान प्रकाशित दैनंदिनी/ दिनदर्शिका सप्रेम भेट देणेकामी प्रशासकीय मान्यता आहे.

उपरोक्त स्थायी मान्यतेनुसार दि.१ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२ या कालावधीत संस्थानचे मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष,सदस्य,मा.कार्यकारी अधिकारी,मा उपकार्यकारी अधिकारी यांनी तसेच संस्थानअंतर्गत खात्यांचे संबंधीत संपर्कातील अधिका-यांना व वेगवेगळ्या क्षेत्रातील अतिमहत्त्वाच्या व्यक्तिंना त्यांचे शिर्डी भेटीत जनसंपर्क कार्यालयामार्फत उच्चपदस्थ शासकीय अधिकारी, सिने कलावंत, नामांकित लेखक, चावडी शताब्दी महोत्सवानिमित्त महापारायण सोहळा, साईभक्त

संमेलनात मान्यवरांना भेट म्हणून खालील दर्शविल्याप्रमाणे पुस्तके/फोटो व सी.डी प्रकाशने विभागाकडून मोफत वितरण करण्यात आलेले आहेत.

| अ. नं. | पी यु बी नं. | पुस्तकांचे नांव | भाषा | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पी यु बी नं.१ | श्री साई सच्चरीत्र | मराठी | ४३ | ७३.०० | ३१३९.०० |
| २ | पी यु बी नं.२ | श्री साई सच्चरीत्र | हिंदी | २२ | ३४.५० | ७५९.०० |
| ३ | पी यु बी नं.३ | श्री साई सच्चरीत्र | इंग्रजी | ११ | २४.४२ | २६८.६२ |
| ४ | पी यु बी नं.४ | श्री साई सच्चरीत्र | गुजराथी | १३ | ४३.०१ | ५५९.१३ |
| ५ | पी यु बी नं.५ | श्री साई सच्चरीत्र | कन्नड | २२ | २५.३५ | ५५७.७० |
| ६ | पी यु बी नं.६ | श्री साई सच्चरीत्र | तेलगु | १४ | ३७.३७ | ५२३.१८ |
| ७ | पी यु बी नं.७ | श्री साई सच्चरीत्र | तामीळ | १२ | ४६.०० | ५५२.०० |
| ८ | पी यु बी नं.१० | श्री साई लिलामृत | मराठी | ५ | १२.१० | ६०.५० |
| ९ | पी यु बी नं..११ | श्री साई लिलामृत | हिंदी | १२ | १३.९० | १६६.८० |
| १० | पी यु बी नं..१६ | श्री साईनाथ सगुणोपासाा आरती | गुजराथी | १ | २.२५ | २.२५ |
| ११ | पी यु बी नं..१९ | श्री साईनाथ स्तवन मंजरी | मराठी | १ | १.७२ | १.७२ |
| १२ | पी यु बी नं..२० | श्री साईनाथ स्तवन मंजरी | हिंदी | १ | २.८३ | २.८३ |
| १३ | पी यु बी नं..२४ | साई रुद्राध्याय ११ वा अध्याय | मराठी | ५२७ | २.५३ | १३३३.३१ |
| १४ | पी यु बी नं..२७ | भजनमाला | हिंदी | १ | २३.९० | २३.९० |
| १५ | पी यु बी न.३० | मुलांचे साईबाबा | हिंदी | १ | ३.७३ | ३.७३ |
| १६ | पी यु बी न.३१ | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | १ | ४.९६ | ४.९६ |
| १७ | पी यु बी नं.३४ | मुलांचे साईबाबा | तेलगु | १ | ५.६१ | ५.६१ |
| १८ | पी यु बी नं.३५ | मुलांचे साईबाबा | तामीळ | १ | ५.३५ | ५.३५ |
| १९ | पी यु बी नं.४३ | श्री साईंचे सत्यचरित्र | मराठी | ८ | ७४.०० | ५९२.०० |
| २० | पी यु बी नं४६ | श्री साई चरित्र | उर्दू | १६ | ४३.०१ | ६८८.१६ |
| २१ | पी यु बी नं.४८ | खापर्डे डायरी | मराठी | १ | ८.१५ | ८.१५ |
| २२ | पी यु बी नं.५४ | दैनंदिन साईबोध | मराठी | १ | ५७.४० | ५७.४० |
| २३ | पी यु बी नं.५५ | खापर्डे डायरी | तामिळ | १ | १३.६५ | १३.६५ |
| २४ | पी यु बी नं.५६ | श्री साईनाथ सगुणोपास-ना आरती | हिंदी | १ | ६.७८ | ६.७८ |
| २५ | पी यु बी नं.५९ | शिलधी | मराठी | १ | ५.९५ | ५.९५ |
| २६ | पी यु बी नं.६० | शिकवण व तत्वज्ञान | मराठी | १ | ११.५० | ११.५० |
| २७ | पी यु बी नं.६१ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती | तामिळ | १ | ९.९० | ९.९० |
| २८ | पी यु बी नं.६२ | श्री साईचरित्र | बंगाली | १ | ५१.२० | ५१.२० |
| २९ | पी यु बी नं.६६ | मुलांचे साईबाबा- विकास मेहता | इंग्रजी | १ | ५५.८९ | ५५.८९ |
| ३० | पी यु बी नं.६७ | श्री साई सच्चरित सार | हिंदी | १ | ५९.६१ | ५९.६१ |
| ३१ | पी यु बी नं.६८ | मुलांचे बाबा (विकास मेहता) | हिंदी | १ | ५५.२९ | ५५.२९ |
| ३२ | पी यु बी नं.७३ | एक फकीर की पाठशाला | हिंदी | १ | २८.४४ | २८.४४ |
| ३३ | पी यु बी नं ७४ | श्री साई समर्थ चरित्र (झरीन) | इंग्रजी | ८ | ९२.०० | ७३६.०० |
| ३४ | पी यु बी नं.७७ | श्री साई चरित्र | पंजाबी | १० | ७०.१७ | ७०१.७० |
| ३५ | पी यु बी नं ७८ | श्री साईचरित्र | ओरीया | ७४ | ५०.७४ | ३७५४.७६ |
| ३६ | पी यु बी नं.८५ | श्री साईचरित्र इंग्रजी (स्टर्लिंग) | इंग्रजी | ३५ | २३.३० | ८१५.५० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३७ | पी यु बी नं.८६ | श्री साईचरित्र इंग्रजी | नेपाळी | १० | ४८.०१ | ४८०.१० |
| ३८ | पी यु बी नं.८९ | श्री साईनाथ स्तवा मंजरी | तेलगु | ५२ | २.०९ | १०८.६८ |
| ३९ | पी यु बी नं.९० | श्री साईचरित्र | मल्याळम | ६१ | ६३.५० | ३८७३.५० |
| ४० | पी यु बी नं.९१ | श्री साईचरित्र | कोंकणी | ६७ | ८४.४९ | ५६६०.८३ |
| | | | | **पुस्तकांची एकुण रक्कम-** | | **१६२१०.२५** |

| अ. नं. | पी यु बी नं. | फोटोचे नाव | भाषा | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ४१ | पी यु बी नं.१३२ | श्री साईबाबा मुर्ती फोटो ३ डि | २.५x३.५ | २०८ | ६.५० | १३५२.०० |
| ४२ | पी यु बी नं.१३८ | श्री साईबाबा अक्रोलिक फ्रेम फायबर | १२x १७ | ७२ | ३९५ | २८४४०.०० |
| ४३ | पी यु बी नं.१४१ | गुरुस्थान फोटो | २.५x३.५ | १०० | ६.५० | ६५०.०० |
| | | | | **फोटोची एकुण रक्कम** | | **३०४४२.००** |

| अ. नं. | पी यु बी नं. | सीडीचे नाव | भाषा | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ४४ | पी यु बी नं..२०७ | साई बाबा ग्रेट संत ऑफ शिर्डी | सीडी रोम | १ | २४.०१ | २४.०१ |
| ४५ | पी यु बी नं.२०८ | मंदिर आरती | व्हीसीडी | १ | ३५.३० | ३५.३० |
| ४६ | पी यु बी नं.२०९ | शिर्डी दर्शा | व्हीसीडी | १ | २०.०१ | २०.०१ |
| ४७ | पी यु बी नं.२१० | मंदिर आरती | डीव्हीडी | १ | ४४.४२ | ४४.४२ |
| ४८ | पी यु बी नं..२११ | श्री साई चरित्र तेलगू एमपी३ | ऑडीओ सी.डी | १ | ५२.०० | ५२.०० |
| ४९ | पी यु बी नं.२१२ | श्री साई चरित्र मराठी एमपी ३ | ऑडीओ सी.डी | १ | ७०.५१ | ७०.५१ |
| ५० | पी यु बी नं..२१३ | श्री साई सच्चरित सार हिंदी एमपी३ | ऑडीओ सी.डी | २ | ५९.५० | ११९.०० |
| ५१ | पी यु बी नं..२१४ | मंदिर आरती | मराठी MP३ | २ | १६.५० | ३३.०० |
| ५२ | पी यु बी नं..२१५ | श्री सांई की आरतीयाँ | ऑडीओ सी.डी | १ | १५०.०० | १५०.०० |
| ५३ | पी यु बी नं..२१६ | श्री साई चरित्र तामिळ एमपी३ | ऑडीओ सी.डी | ६ | ३५.५० | २१३.०० |
| | | | | **सीडींची एकुण रक्कम** | | **७६१.२५** |

| अ. नं. | पी यु बी नं. | श्री साई दैनंदिनी | सन | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ५४ | पी यु बी नं.३०८ | श्री साई दैनंदिनी | २०१२ | ३७७८ | ५२.०० | १९६४५६.०० |
| | | | | **डायरीची एकुण रककम** | | **१९६४५६.००** |

| अ. नं. | पी यु बी नं. | कॅलेंडरचे नाव | सन | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ५५ | पी यु बी नं.४२३ | श्री साईबाबा थ्री डी कॅलेंडर B/W | २०११ | ४१ | २६१ | १०७०१.०० |
| ५६ | पी यु बी नं. ४२४ | श्री साईबाबा थ्री डी कॅलेंडर कलर | २०११ | ५ | २६१ | १३०५.०० |
| ५७ | पी यु बी नं..४२७ | श्री साईबाबा कॅलेंडर १ पाने | २०१२ | २९१३ | ७.०० | २०३९१.०० |
| ५८ | पी यु बी नं.४२८ | श्री साईबाबा कॅलेंडर १ पाने | २०१२ | २००३ | ११.५० | २३०३४.५० |
| ५९ | पी यु बी नं..४२९ | श्री साईबाबा कॅलेंडर ८ पाने | २०१२ | ३२३ | १८० | ५८१४०.०० |
| ६० | पी यु बी नं.४२५ | श्री साईबाबा थ्री डी टेबल कॅलेंडर | २०१२ | ५ | १४० | ७००.०० |
| ६१ | पी यु बी नं.४२६ | श्री साईबाबा थ्री डी कॅलेंडर कलर | २०१२ | ४४ | २४१ | १०६०४.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | **कॅलेंडर एकुण रककम-** | **१२४८७५.५०** |

| | |
|---|---|
| एकुण मोफत दिलेल्या पुस्तकांची रक्कम | **१६२१०.२५** |
| एकुण मोफत दिलेल्या फोटोची रक्कम | **३०४४२.००** |
| एकुण मोफत दिलेल्या सी डी  रक्कम | **७६१.२५** |
| एकुण मोफत दिलेल्या डायरीची रक्कम | **१९६४५६.००** |
| एकुण मोफत दिलेल्या कॅलेंडर  रक्कम | **१२४८७५.५०** |
| एकुण संभावना रक्कम | **३६८७४५.००** |

मा.व्यवस्थापन समितीचे स्थायी मान्यतेनुसार १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२ पर्यंत श्री साई साहित्य पोस्टेज स्टॉकमधुन मोफत देण्यात आलेली असल्याने त्यासाठी रक्कम रुपये - ३,६८,७४५/- इतका खर्च झाला आहे. सदर खर्च सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात Publication Expenses खाते जमा नावे करण्यात आलेला आहे.

माहितीसाठी व कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.८३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१ एप्रिल २०११ ते दि.३१ मार्च २०१२ या आर्थिक वर्षात प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थान प्रकाशने, मा.व्यवस्थापन समितीच्या स्थायी मान्यतेनुसार संस्थानतर्फे मान्यवरांना भेट देण्यात आलेली आहेत. सदरहू प्रकाशने, पोस्टेज स्टॉकमधून जमा नावे करुन यासाठी आलेल्या खर्चाची रक्कम रु.३,६८,७४५/- मात्र सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात Publication Expenses खाती जमा नावे करण्यात आलेली आहे, त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय न.४१** **चित्रीकरणाबाबत.**

**प्रस्ताव-** जॉयस सेबास्टीयन्स, मॅनेजीग डायरेक्टर, ॲग्नस डी मिडीया प्रा.लि., नवी दिल्ली यांनी त्यांचे दिनांक १७.०८.२०१२ चे पत्रात "धर्म हे मानवाच्या जिवनास आकार देतात. धार्मिकस्थळे हे मानवता आणि परमेश्वरामध्ये एक नाते स्थापन करतात. म्हणून प्रत्येक व्यक्तीला अशा धार्मिक स्थळांना भेटी द्याव्याश्या वाटतात. ॲग्नस डी मिडीया प्रा.लि. यांनी आत्म्याचा शोध घेण्यासाठी 'ट्रॉव्हलट्रेंज टीव्ही' या अंतरराष्टीय दुरचित्रवाहीनीव्दारे ४० देशात सदर कार्यक्रम प्रक्षेपीत करणेस मान्यता घेतलेली आहे. आपणा सर्वांना माहित आहे की, श्री शिर्डी साईबाबा हे जगप्रसिध्द ठिकाण आहे. साईभक्तांची उच्चकोटीची श्रध्दा पहाता आम्ही साईबाबावर पुर्ण एक भाग तयार करणार आहोत. या एका तासाच्या भागामध्ये मंदिराची सविस्तर माहिती असून त्यासाठी तीन दिवस चित्रीकरण करणार आहोत. आम्ही असे आश्वासीत करतो की मंदिर आहे तसे दाखवणार असून कोणाच्याही धार्मिक भावना दुखावनार नाही याची काळजी घेवू. आमच्या शोचा मुख्य उद्देश धार्मिक स्थळांची प्रत्यक्ष ओळख करुन देणे हा असून त्यामुळे हा कार्यक्रम बघण्याऱ्यांना धार्मिकते बाबत अधिक सविस्तर माहिती मिळेल. त्यामुळे त्यांचा अशा ठिकाणी भेटी देण्याचा उत्साह वाढेल. आम्ही असे आश्वासन देतो की संरक्षणाचे सर्व नियमा आम्ही पाळू. तरी आम्हाला दिनांक १८.०९.२०१२ ते २१.०९.२०१२ अखेर चित्रीकरणास परवानगी मिळावी. श्री.अलोक शुक्ला यांचे मार्गदर्शनाखाली ४ ते ६ व्यक्तींचा चमू चित्रीकरणाकरीता येणार असून आपण आमच्या चमूची राहण्याची व्यवस्था केल्यास आम्ही आपले आभारी राहू" असे कळविलेले आहे.

महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्ये व अधिकार" या शिर्षकाखाली अधिनियम नंबर १७ (२) मधील (ठ) मध्ये "श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील," तसेच (ड) मध्ये "श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता,श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कर्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल" अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

सदर तरतूदीच्या अनुषंगाने मागील मा.व्यवस्थापन मंडळाचे दिनांक २१.१०.२००४ व दिनांक ०८.०२.२००५ रोजीचे सभेतील अनुक्रमे निर्णय क्र.५२ व ७६ मध्ये दुरचित्रवाहिन्यांचे प्रतिनिधींना

**०१.** कमी गर्दीचे वेळी चित्रीकरण दुपारनंतर सर्वसाधारण एक तास

**०२.** गुरुवार, रविवार व गर्दीचे दिवशी आतील चित्रीकरणास शक्यतो परवानगी देवू नये.

**०३.** चित्रीकरण करतांना भक्तांचे दर्शनात कुठलाही अडथळा येवू नये.

याअटीशर्तीवर चित्रीकरण करण्याची परवानगी देण्यात येते. श्री.जॉयस सेबास्टीयन यांनी त्यांचे पत्रात कळविलेनुसार सुमारे चाळीस देशात हा कार्यक्रम प्रक्षेपीत होणार असल्याने बाबांच्या कार्याचा प्रचार व प्रसार होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे त्यांना चित्रीकरण करणेस परवानगी देणेस हरकरत नाही. याबरोबरच इतर दुरचित्रवाहीन्यांनीही अशा प्रकारच्या चित्रीकरणास परवानगी मागीतली तर त्याबाबतही एक धोरण निश्चित करावे असे मत आहे. तरी सदर बाबत चर्चा होवून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जॉयस सेबास्टीयन्स, मॅनेजीग डायरेक्टर, ॲग्नस डी मिडीया प्रा.लि., नवी दिल्ली यांना प्रस्तावातील अटी व शर्तीनुसार चित्रीकरणास परवानगी देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-जनसंपर्क विभाग प्रमुख)

---

**विषय न.४२** **श्री पुण्यतिथी उत्सवाचे थेट प्रक्षेपण करणेकामी मुंबई दुरदर्शन यांना परवानगी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.टी.एस.सेलवाकुमार, व्हिडीओ एक्झिक्यूटिव, दुरदर्शन केंद्र वरळी, मुंबई त्यांनी त्यांचे दिनांक १३.०९.२०१२ रोजीचे पत्रात,"शिर्डी येथील दसरा सोहळा हा जगभर चर्चेचा विषय असतो. प्रत्येक साईभक्त हा उत्सव "याची देही याची डोळा" बघण्यासाठी आसुसलेला असतो. यासाठी, अगदी समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचलेल्या, आमच्या मुंबई दुरदर्शन केंद्राच्या सह्याद्री वाहिनीवरुन दिनांक २४.१०.२०१२ रोजी हा सोहळा थेट प्रक्षेपित करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत. त्यासाठी दसरा उत्सवाचं प्रत्यक्ष चित्रिकरण करण्यासाठी आपण आम्हांला लेखी परवानगी द्यावी ही विनंती. जेणेकरुन हा दिव्य सोहळा महाराष्ट्र तसेच देशभरातले साईभक्त अनुभवू शकतील." असे कळविलेले आहे.

मागील मा.व्यवस्थापन मंडळाचे दिनांक २१.१०.२००४ व दिनांक ०८.०२.२००५ रोजीचे सभेतील अनुक्रमे निर्णय क्र.५२ व ७६ मध्ये दुरचित्रवाहिन्यांचे प्रतिनिधींना

०१. कमी गर्दीचे वेळी चित्रीकरण दुपारनंतर सर्वसाधारण एक तास

०२. गुरुवार, रविवार व गर्दीचे दिवशी आतील चित्रीकरणास शक्यतो परवानगी देवू नये.

०३. चित्रीकरण करतांना भक्तांचे दर्शनात कुठलाही अडथळा येवू नये.

या अटीशर्तीवर चित्रीकरण करण्याची परवानगी देण्यात येते. उत्सव काळामध्ये श्रींच्या दर्शनासाठी प्रचंड गर्दी असते. भक्तांच्या दर्शनामध्ये अडथळा येवू नये म्हणून मंदिरामध्ये थेट प्रक्षेपण करणेकामी कोणत्याही एका दुरचित्रवाहीनीचा चित्रीकरण कॅमेरा ठेवून व्हिडीओ डिस्ट्रीब्युटरच्या सहाय्याने इतर दुरचित्रवाहीन्यांना चित्रीकरण देण्यात येते. दोन वर्षांपासून मुंबई दुरदर्शन ही दुरचित्रवाहीनी श्री पुण्यतिथी उत्सवाचे थेट प्रेक्षपण करीत आहे.

आता श्री.टी.एस.सेलवाकुमार, व्हिडीओ एक्झिक्यूटिव, दुरदर्शन केंद्र वरळी, मुंबई यांनी यावर्षीच्या श्री पुण्यतिथी उत्सवाचे थेट प्रक्षेपण करणेकामी परवानगी मिळणेस विनंती केलेली आहे. तरी त्यांना शासकीय दुरचित्र वाहीनी असल्यामुळे श्री पुण्यतिथी उत्सवामध्ये मंदिराचे आतील व बाहेरील कार्यक्रमाचे थेट प्रेक्षपण करणेस परवानगी देता येईल. मात्र मुंबई दुरदर्शन ही शासकीय दुरचित्रवाहीनी असल्यामुळे त्यांनी केलेले चित्रीकरण ते इतर दुरचित्रवाहीन्यांना देण्यास नकार देतात. त्यामुळे मुंबई दुरदर्शनसह कोणत्याही एका खाजगी दुरचित्रवाहीनीचा कॅमेरा समाधी मंदिरामध्ये ठेवून त्याव्दारे करण्यात येणारे चित्रीकरण व्हिडीओ डिस्ट्रीब्युटरच्या सहाय्याने देण्याची व्यवस्था करता येईल.

तथापि सदर बाबत चर्चा होवून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आजपर्यंत श्री पुण्यतिथी उत्सवाचे थेट प्रक्षेपण करणेसाठी दुसऱ्या कोणत्याही दुरचित्रवाहीनीचे अर्ज आलेले नाहीत व मुंबई दुरदर्शन ही शासकीय दुरचित्रवाहीनी असल्यामुळे त्यांना पुण्यतिथी उत्सवाचे थेट प्रक्षेपण करणेस परवानगी देण्यात यावी. तसेच दुसऱ्या खाजगी कंपनीने परवानगी मागीतल्यास मुंबई दुरदर्शनसह कोणत्याही एका खाजगी दुरचित्रवाहीनीचा कॅमेरा समाधी मंदिरामध्ये ठेवून त्याद्वारे करण्यात येणारे चित्रीकरण व्हिडीओ डिस्ट्रीब्युटरच्या सहाय्याने देण्याची व्यवस्था करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-जनसंपर्क विभाग प्रमुख)

---

**विषय न.४३** **दर्शन / आरती पास वितरणाबाबत.**

**प्रस्ताव-** जनसंपर्क कार्यालयामार्फत महत्वाच्या/अतिमहत्वाच्या व्यक्तींची व्ही.आय.पी.पास देवून दर्शन/आरती व्यवस्था करण्यात येते. त्यासाठी खालीलप्रमाणे प्रचलित नियमावलीचा आधार घेण्यात येतो.

| अ.नं. | शिर्षक | तपशिल |
|---|---|---|
| **०१** | अतिमहत्वाच्या व्यक्ती | मा.राष्ट्रपती, मा.उपराष्ट्रपती, मा.पंतप्रधान, मा.उपपंतप्रधान, मा.राज्यपाल, मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री व सत्सम, मा.सर्वोच्च न्यायालयाचे व उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, मा.जनरल, मा.ॲडमिरल, मा.एअर मार्शल व या संबंधीतांचे पाहुणे. |
| **०२** | महत्वाच्या व्यक्ती | मा.खासदार, मा.आमदार, मा.जि.प.अध्यक्ष व त्यांच्याकडून आलेली शिफारस पत्रे. |
| **०३** | वरिष्ठ सरकारी अधिकारी | मा.आय.ए.एस.,मा.आय.पी.एस.,मा.आय.आर.एस., मा.आय.एफ.एस. व |

| | | |
|---|---|---|
| | | तत्सम, त्याचप्रमाणे सिनीयर कमिशन्ड मिलीटरी ऑफीसर्स. |
| **०४** | श्री साईबाबा संस्थानचे विश्वस्त | मा.विश्वस्तांचे पाहूणे व संस्थानचे माजी विश्वस्त व कुटुंबीय. |
| **०५** | देणगीदार | रु.५०,०००/- व त्यापेक्षा अधिक रक्कमेची रोख देणगी अथवा वस्तु रुपाने देणगी देणाऱ्या देणगीदार भक्तांचे व त्यांचे कुटुंबीय, पाहुणे (देणगीचे स्वरुप बघून) |
| **०६** | वयोवृध्द | वय वर्ष ६५ व त्यापेक्षा अधिक वय असणा-या व्यक्ती व त्यांचे समवेत एक. |
| **०७** | आजारी व्यक्ती | सर्व प्रकारच्या दुर्धर आजाराने आजारी असणा-या व्यक्ती,गरोदर स्त्रिया, नवीन बाळंत झालेल्या स्त्रिया व अपंग व्यक्ती आणि त्यांचे समवेत प्रत्येकी एक व्यक्ती. |
| **०८** | महान साधुसंत | भारतातील सर्व धर्माचे साधू संत. |
| **०९** | पत्रकार | ॲक्रीडीशन कार्ड धारक पत्रकार तसेच स्थानिक विविध वर्तमानपत्राचे प्रतिनिधी, दुरचित्र वाहीन्यांचे प्रतिनिधी व त्यांचे पदाधिकारी, पाहुणे. |
| **१०** | राजकीय व्यक्ती | सर्व अधिकृत राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष व त्यावरील पदस्थ व्यक्ती. |
| **११** | पदयात्री | फक्त दर गुरुवारी येणारे पंचक्रोशितील पदयात्री / पालखी पदयात्री |
| **१२** | भारतीय लष्करातील वरिष्ठ अधिकारी | भारतीय लष्करातील सर्व विभागांचे उच्चपदस्थ अधिकारी व लष्करी जवान. |
| **१३** | कार्यालयीन आदेशानूसार | मा.कार्यकारी अधिकारी सो., मा.उपकार्यकारी अधिकारी सो., मा.प्रशासकीय अधिकारी सो.यांचेकडून संस्थान संबंधीत येणारे पाहुणे. |

तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) च्या जनसंपर्क कार्यालयाकडे संपूर्ण भारतातून महत्वाचे/अतिमहत्वाच्या व्यक्तींना दर्शन/आरती पासेस मिळणेसाठी खालील मान्यवरांकडून शिफारस पत्रे दाखल होत असतात.

१) मा.राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांचे कार्यालयातून सचिव यांचे स्वाक्षरीने दाखल होणारी शिफारस पत्रे अथवा फॅक्स.

२) मा.केंद्रीय व केंद्रीय राज्य मंत्री यांचे स्वाक्षरीने अथवा त्यांचे स्विय सहाय्यक यांचे स्वाक्षरीने शिफारस केलेली पत्रे अथवा फॅक्स.

३) महाराष्ट्र राज्य व इतर राज्यातील राज्यपाल यांचे कार्यालयातून त्यांचे सचिवांचे/स्विय सहाय्यकाचे स्वाक्षरीने शिफारस पत्रे अथवा फॅक्स.

४) संपूर्ण भारतातील खासदार अथवा त्यांचे स्विय सहाय्यक यांचे स्वाक्षरीने दाखल होणारी शिफारस पत्रे अथवा फॅक्स.

५) महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री कार्यालय तसेच उर्वरीत कॅबीनेट/राज्यमंत्री यांचे कार्यालयाकडून मा.मंत्रीमहोदय स्वतः अथवा त्यांचे स्विय सहाय्यक यांचे स्वाक्षरीने शिफारस संदर्भात दाखल होणारी पत्रे अथवा फॅक्स.

६) भारतातील इतर राज्यातील कॅबीनेट व राज्यमंत्री यांचे स्वतः अथवा त्यांचे स्विय सहाय्यक यांचे स्वाक्षरीने शिफारस संदर्भात दाखल होणारी पत्रे अथवा फॅक्स.

७) महाराष्ट्रातील विधानसभा व विधानपरिषदेचे मा.आमदार तसेच त्यांचे स्विय सहाय्यक यांचे स्वाक्षरीने शिफारस संदर्भात दाखल होणारी पत्रे अथवा फॅक्स.

८) महाराष्ट्र राज्यातील विविध महामंडळांवर शासनाने नियुक्त केलेले अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा असलेले) स्वतः अथवा त्यांचे स्विय सहाय्यक यांचे स्वाक्षरीने शिफारस संदर्भात दाखल होणारी पत्रे अथवा फॅक्स.

९) सर्व राजकीय पक्षांचे अध्यक्ष/जिल्हाध्यक्ष स्तरावरील मान्यवर यांचे स्वाक्षरीने दाखल होणारी शिफारस पत्रे.

१०) भारतातील विविध राज्यांचे उच्च न्यायालय यांचे कार्यालयातील रजिष्ट्रार यांचे स्वाक्षरीने दाखल होणारी तसेच कोपरगांव,राहाता न्यायालयाकडून सादर होणारी पत्रे अथवा फॅक्स.

११) भारतातील व भारताबाहेरील साईमंदिरातील पदाधिकाऱ्यांकडून दाखल होणारी शिफारस पत्रे अथवा फॅक्स.

१२) महाराष्ट्र शासन तसेच इतर राज्यातील उच्च पदांवर कार्यरत असलेली अधिकारी वर्ग (IAS, IPS, IRS, IES) यांचे स्वाक्षरीने दाखल होणारी शिफारस पत्रे.

१३) स्थानिक पातळीवरील खालील विभागांकडून प्राप्त होणारी शिफारस पत्रे.

- शिर्डी पोलीस स्टेशन, तहसिल कार्यालयाचे सर्कल ऑफीसर, तलाठी.
- शिर्डी नगरपंचायत व सर्व नगरसेवक.
- शिर्डी सिंचन शाखा.
- सार्वजनिक बांधकाम विभाग.
- महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी.
- दुरसंचार निगम लि. शिर्डी.

- राष्ट्रीयकृत बँका (शिर्डीतील), जिल्हा बँक.
- महाराष्ट्र राज्य वीज वितरण महामंडळ, शिर्डी व राहाता.
- पंचायत समिती, राहाता.
- शिर्डीतील प्रतिष्ठीत नागरिक व विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी.
- शिर्डीतील विविध शैक्षणिक संस्था.
- शिर्डी पोस्ट ऑफिस, रेल्वे ऑफिस व आबकारी कर कार्यालय.
- महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, उपप्रादेशीक परिवहन अधिकारी,श्रीरामपूर.
- स्थानिक विविध वर्तमानपत्राचे व दुरचित्रवाहीन्यांचे प्रतिनिधी.

१४) तसेच जनसंपर्क कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक २५८६११ वर शिर्डी तसेच परिसरातून दररोज ४०० ते ५०० दुरध्वनी संदेश येत असतात. त्यात स्थानिक नगरसेवक, विविध संस्थांचे पदाधिकारी, प्रतिष्ठीत नागरीक, व्यावसायीक वर्ग यांचेकडून प्राप्त होणारे दुरध्वनी संदेश यांचा समावेश असतो.

१५) औरंगाबाद, नाशिक, पुणे, अहमदनगर येथील लष्करी अधिकारी व कार्यालयाचे शिफारस पत्र.

मात्र मा.अध्यक्ष सो.यांनी मा.उप का.अ.सो.याना व्ही.आय.पी दर्शन/आरती पासेस बाबत खालीलप्रमाणे निर्देश दिलेले असून सदरचा विषय त्रिसदस्यीय समितीचे बैठकीत तातडीने घेणेबाबत सुचना केलेल्या आहेत.

**०१.** दर्शन/आरती पासेस हे संस्थानचे माजी अध्यक्ष, माजी उपाध्यक्ष, माजी विश्वस्त, शिर्डी नगर पंचायतचे माजी नगराध्यक्ष, आजी माजी उपनगराध्यक्ष, आजी माजी नगरसेवक हे स्वतः अगर त्यांचे कुटुंबिय आले तरच त्यांना देण्यात यावे. पासेस देणेकामी त्यांच्या शिफारशी ग्राहय धरण्यात येवू नये अथवा त्यांचे शिफारशीवर कुणालाही पासेस देण्यात येवू नयेत.

**०२.** शिर्डी नगरपंचायतीचे फक्त विद्यमान नगराध्यक्ष यांच्याच शिफारशीवर त्यांच्या इतर पाहुण्यांना पासेस देण्यात यावेत. अथवा फक्त त्यांचीच शिफारस याकामी ग्राहय धरावी.

सध्या सुरु असलेल्या प्रचलित पध्दतीतही मा.अध्यक्ष सो. यांनी सुचित केलेप्रमाणे मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत सांगोपांग चर्चा करुन खालीलप्रमाणे बदल करता येतील.

| अ.नं. | शिर्षक | तपशिल |
|---|---|---|
| **०१** | अतिमहत्वाच्या व्यक्ती | मा.राष्ट्रपती, मा.उपराष्ट्रपती, मा.पंतप्रधान, मा.उपपंतप्रधान, मा.राज्यपाल, मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री व सत्सम, मा.सर्वोच्च न्यायालयाचे व उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, मा.जनरल, मा.ॲडमिरल, मा.एअर मार्शल. |
| **०२** | महत्वाच्या व्यक्ती | मा.खासदार, मा.आमदार, मा.जि.प.अध्यक्ष व त्यांच्याकडून आलेली शिफारस पत्रे. |
| **०३** | वरिष्ठ सरकारी अधिकारी | मा.आय.ए.एस., मा.आय.पी.एस., मा.आय.आर.एस., मा.आय.एफ.एस. व तत्सम, त्याचप्रमाणे सिनीयर कमिशन्ड मिलीटरी ऑफीसर्स. |
| **०४** | श्री साईबाबा संस्थानचे विश्वस्त | विद्यमान मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष मा.विश्वस्त यांचे कुटुंबिय व त्यांनी केलेल्या शिफारशी, संस्थानचे माजी अध्यक्ष, माजी उपाध्यक्ष, माजी विश्वस्त व त्यांचे कुटुंबीय. |
| **०५** | देणगीदार | रु.५०,०००/- व त्यापेक्षा अधिक रक्कमेची रोख देणगी अथवा वस्तु रुपाने देणगी देणारे देणगीदार भक्त व त्यांचे कुटुंबीय (देणगीचे स्वरुप बघून) |
| **०६** | वयोवृध्द | वय वर्ष ६५ व त्यापेक्षा अधिक वय असणा-या व्यक्ती व त्यांचे समवेत एक. |
| **०७** | आजारी व्यक्ती | सर्व प्रकारच्या दुर्धर आजाराने आजारी असणाऱ्या व्यक्ती, गरोदर स्त्रिया, नवीन बाळंत झालेल्या स्त्रिया व अपंग व्यक्ती आणि त्यांचे समवेत प्रत्येकी एक व्यक्ती. |
| **०८** | महान साधुसंत | भारतातील सर्व धर्माचे साधू संत. |
| **०९** | पत्रकार | ॲक्रीडीशन कार्ड धारक पत्रकार तसेच स्थानिक विविध वर्तमानपत्राचे प्रतिनिधी, दुरचित्र वाहीन्यांचे प्रतिनिधी व त्यांचे पदाधिकारी. |
| **१०** | राजकीय व्यक्ती | सर्व अधिकृत राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष व त्यावरील पदस्थ व्यक्ती. |
| **११** | पदयात्री | फक्त दर गुरुवारी येणारे पंचक्रोशितील पदयात्री / पालखी पदयात्री. |
| **१२** | भारतीय लष्करातील वरिष्ठ अधिकारी | भारतीय लष्करातील सर्व विभागांचे उच्चपदस्थ अधिकारी व लष्करी जवान. |
| **१३** | कार्यालयीन आदेशानूसार | मा.कार्यकारी अधिकारी सो., मा.उपकार्यकारी अधिकारी सो., मा.प्रशासकीय अधिकारी सो.यांचेकडून संस्थान कामासंबंधीत येणाऱ्या व्यक्ती. |

याबरोबरच राज्यातील देवस्थानांच्या दर्शनव्यवस्थेबाबत महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभागाने दिनांक ०७.०९.२०१० रोजी पारीत केलेल्या आदेशाची माहीती मा.त्रिसदस्यीय समितीस व्हावी असे नम्र मत आहे.

महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचा क्रमांक : संकीर्ण - २०१०/३५/ (प्र.क्र.८५)/ का.सोळा, मंत्रालय, मुंबई, दि.०७.०९.२०१० रोजीचे आदेशाव्दारे उत्सवाच्या दिवशी व इतर महत्वाच्या दिवशी मंदिरामध्ये भाविकांना दर्शन देण्याबाबत खालीलप्रमाणे शासन निर्णय झालेला आहे.

०१) देवस्थानातील उत्सवाच्या दिवशी तसेच इतर महत्वाच्या दिवशी कोणत्याही व्यक्तीस नियमीत रांगेव्यतिरिक्त अन्य कोणत्याही मार्गाने दर्शन घेण्यास परवानगी देण्यात येऊ नये व तशी कोणतीही स्वतंत्र व्यवस्था करण्यात येऊ नये.

०२) कोणत्याही देवस्थानांमध्ये उत्सवाच्या दिवशी व इतर महत्वाच्या दिवशी कोणत्याही मार्गाने (शुल्क, देणगी, फी इ.) रक्कम आकारुन दर्शनासाठी प्रवेश देण्यात येऊ नये.

०३) प्रत्येक देवस्थान समितीने संबंधित देवस्थानातील महत्वाचा उत्सवाचा दिवस व गर्दीचा दिवस कोणता आहे याबाबत दर्शनी भागावर स्पष्टपणे दिसेल अशा प्रकारे ठळक अक्षरात फलक लावणे बंधनकारक राहील. तसेच याबाबत समितीने संबंधित सहायक धर्मादाय आयुक्तांना माहिती देणे आवश्यक राहील.

०४) कोणत्याही देवस्थान समितीने महत्वाच्या सणाच्या दिवशी व इतर केव्हाही दर्शनाकरीता पासेस वा प्रवेश पत्रिका वितरीत करु नयेत.

०५) कोणत्याही देवस्थानामध्ये उत्सवाच्या व इतर महत्वाच्या दिवशी सर्व भाविकांना समानतेने एकाच रांगेतून प्रवेश देण्यात यावा, जेणेकरुन सर्वसामान्य भाविकांमध्ये अन्याय झाल्याची भावना निर्माण होणार नाही. तसेच विश्वस्त, अधिकारी व पोलिस यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन भक्तांना सामान्य रांगेव्यतिरिक्त इतर कोणत्याही मार्गाने प्रवेश देऊ नये.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन महत्वाच्या दिवशी तसेच इतर दिवशीही रांगेचे सुयोग्य नियोजन करुन सर्वसामान्य भाविकांना शांततेने दर्शन घेण्याची व्यवस्था सर्व देवस्थान समित्यांनी करणे आवश्यक आहे. सदर सूचनांचे उल्लंघन झाल्यास त्याची शासनाकडून गंभीर दखल घेण्यात येईल व संबंधितांवर आवश्यक कारवाई करण्यात येईल. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असा आहे.

उपरोक्त आदेशावर दि. १६.०९.२०१० रोजीच्या मंजूर टिपणीन्वये मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १०.१०.२०१० रोजीचे सभेत चर्चा होवून 'उपरोक्त प्रस्तावाची अंमलबजावणी करणेस येणाऱ्या अडचणी मा.मंत्री महोदय यांना मा.अध्यक्ष महोदय यांनी अवगत करुन द्याव्यात' असे ठरले होते. त्याप्रमाणे पत्र तयार करण्यात येवून त्यावर तत्कालीन अध्यक्ष सो.यांची स्वाक्षरी सुध्दा झाली होती. परंतु मा.अध्यक्ष सो. यांनी सदरचे पत्र तुर्त देणे स्थगीत ठेवावे असे सांगितल्याने पुढील कार्यवाही झालेली नाही. तरी उपरोक्त दोन्ही विषयांवर मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत चर्चा होवून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय पुढे ढकलण्यात आला.**

(कार्यवाही-जनसंपर्क विभागप्रमुख)

---

**विषय न.४४ औद्योगिक प्रशिक्षण केंद्रास Xerox Machine खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थ्यांची तिमाही,सहामही, नऊमाही, वार्षिक पुर्व परीक्षा, कौशल्य स्पर्धा परीक्षा या प्रकारच्या परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षाना आवश्यक असणा-या प्रश्नपत्रिका या निदेशकामार्फत काढल्या जातात. प्रत्येक परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेच्या १८०० ते २००० झेरॉक्स प्रती काढल्या जातात. अशा एकुण ०५ प्रश्नपत्रिकाच्या प्रत्येक परीक्षेच्यावेळी काढाव्या लागतात. तसेच कार्यालय व भांडार विभगाच्या झेरॉक्स प्रतीही काढाव्या लागतात. श्री साईबाबा इंग्लीश मिडीयम स्कूलकडील झेरॉक्स मशीनवर बहुतेकवेळा त्यांचीच कामे चालू असतात. त्यामुळे झेरॉक्सची अडचण निर्माण होते.

M/s Ricoh India Ltd, India Corporate Office,२[nd] Floor,Section Aurum Building,Plot No.४,District Centre Jasola, New Delhi ११००२५. या कंपनीने भारत सरकारशी Rate Contract no.DCMOM-EB/IT-३/RC-D१०Q००००/ ०४१३/ ८३F०३६३/ १८८५ Dated ३०JUL-१२ का या पत्रानुसार Rate Contract केलेले आहे. सदरील Rate Contract नुसार सरकारी कार्यालयास त्या दरानुसार झेरॉक्स मशीन पुरविण्यात येतात.

कंपनीचे प्रतीनीधी श्री प्रमोद दशरथ पवार यांनी सदरील Rate Contract ची प्रत व पाम्पलेट दि.०४/०९/२०१२ रोजी औ.प्र.संस्थेस दिली आहे. खालील नमुद केलेनुसार औ.प्र.केंद्रास झेरॉक्स मशीन खरेदी केल्यास सोईचे ठरेल.

| अ.क्र. | झेरॉक्स मशीनचा तपशिल | रेट कॉन्ट्रक्टनुसार दर |
|---|---|---|
| 01 | Aflcio MP 200 (Digital Copier with Printer (Size A- | 86,433.85 |

| | | |
|---|---|---|
| | 3) Minimum copying speed (cpm):20/20,Paper NOS Size (Original/Image):A3/A3,RAM (MB):16, Bye Pass 50 SHEET:Zoom: 50T0200 %,Category: DUPLEX,networking feature:YES<br>Quantity :- 01 No. | |
| | Add Vat Tax 5% | 4,321.70 |
| | Total | 90,755.55 |
| | Round up | 90,756.00 |

वरील नमुद केलेप्रमाणे भारत सरकारचे Rate Contract नुसार Zerox Machine खरेदी करणेस रक्कम रु.९०,७५६/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी M/s Rich India Ltd, India, New Delhi ११००२५ यांचेकडून Rate Contract नुसार Xerox Machine रु.९०,७५६/- खरेदी करणेस व येणा-या खर्चास निर्णयासाठी मा.त्रिसदस्य समिती समोर सादर.

**निर्णय क्र.८४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, औद्योगिक प्रशिक्षण केंद्रासाठी M/s Rich India Ltd, India, New Delhi यांचेकडून Rate Contract नुसार Xerox Machine खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९०,७५६/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही-प्राचार्य, आय.टी.आय.)

---

**विषय न.४५ एल.ई.डी.प्रोजेक्टर खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** **१)** मा.व्य.समितीचे दिनांक १४/०७/२०१२ चे सभेतील विषय क्र. ८७ निर्णय क्र. ५३३ अन्वये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरिता Sony व BENQ कंपनीचा एल.सी.डी.प्रोजेक्टर खरेदीकामी रु. १,००,०००/- पर्यंतच्या खर्चास मान्यता मिळालेली आहे.

**२)** दरम्यानच्या काळात मे.प्रमोद एन्टरप्राईजेस,ठाणे यांनी LED Projector चा Demo मा.कार्यकारी अधिकारी व मा.उपकार्यकारी अधिकारी यांना दाखविला. सदरचा Projector हा In-built Computer सह असून कोणत्याही पडदयाचे (भिंतीचे) Touch Screen मध्ये रुपांतर करतो. अशा प्रकारचे LED Projector त्यांनी 'विश्वात्मक जंगली महाराज आश्रम,कोकमठाण' येथील शैक्षणिक संकुलात पुरविल्याचे त्यांनी सांगितले. यापुर्वी प्रोजेक्टर जोडण्यासाठी स्वतंत्र Computer LapTop यांची आवश्यकता असे परंतू Demo दाखविलेला प्रोजेक्टर In-built Computer सह असल्यामुळे सदरच्या प्रकारचा LED Projector खरेदी करण्याबाबत चर्चा झाली व कोटेशन मागविण्याचे ठरले (अशा प्रकारचा In-built Computer सह Projector Sony व BENQ कंपन्यांचा सध्या बाजारात उपलब्ध नाही.)

**३)** जा.नं.एसएसएस/कनिष्ठ/२३८५/२०१२ दि. २९.०८.२०१२ कोटेशन मागणी करण्यात आली आहे. आलेल्या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | Pramod Enterprise Thane | Proactive Computers Thane | Recon Technologies Mumbai |
|---|---|---|---|---|
| 1 | LED projector with 100 Watts led lamp in built intel cpu input > 4USB ports, 1 lan port<br>Computer specs > Intel Core 2 Duo 2.1 Ghz Processor, 4 GB RAM, 500 GB HDD Features > 85% iniformity, 80% offset, Music 2 FM, inbuilt speakars. 100 watts LED Lamp, Brightest amoung LED projector. | 55,000/- | 94,900/- | 96,300/- |
| 2 | Cordless Keyboard and mouse set. | 1,200/- | | |
| 3 | Multiple choice question Electronic Exam system for 40 Students | 11,000/- | | |
| 4 | Interactive module (to Convert any surface to interactive) | 15,000/- | | |
| 5 | Foldable Screen 6* 4 feet | 4,500/- | | |
| | Total Price | 86,700/- | | |
| | Price After Discount | 77,000/- | | |
| | Vat @ 12.5% | 9,625/- | | |
| | Final Price | 86,625/- | 94,900/- | 96,300/- |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार प्रमोद एन्टरप्राईजेस,ठाणे यांनी मुळ किंमतीवर दिलेल्या डिस्काऊंटनुसार त्यांचे दर सर्वात न्युनतम येतात.

प्रोजेक्टर खरेदीकामी रु. ८६,६२५/- इतका खर्च येणार असून रु. १,००,०००/- पर्यंतच्या रकमेस मान्यता आहे. तरी वर दिलेल्या तपशीलात नमुद केल्यानुसार न्युनतम दराने LED Projector खरेदी करता येईल.

प्रस्तावावर विचार होणेस विनंती.

**निर्णय क्र.८४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे न्युनतम दराने LED Projector खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.८६,६२५/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्राचार्य,कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय न.४६ श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के, जनसंपर्क अधिकारी, प्रकाशने विभाग यांना तडजोडीत ठरलेप्रमाणे रुपये १७,५०,०००/- रक्कम आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के हे दि.२१-०४-१९९२ पासून ते दि.२०-०४-१९९४ अखेर पर्यंत या परिविक्षाधिन कालावधीत जनसंपर्क अधिकारी म्हणून संस्थान सेवेत कार्यरत होते.तथापी मुळ व वाढीव परिविक्षाधीन कालावधीमध्ये श्री.म्हस्के यांचे काम समाधानकारक आढळुन न आल्यामुळे दि.२०-०४-१९९४ रोजी त्यांची सेवा संपुष्टात आणण्यात आली.सदर सेवा समाप्ती संदर्भात श्री.म्हस्के यांनी मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे संस्थान विरुध्द तक्रार (यु.एल.पी.) क्र.४१/१९९४ हि कोर्ट केस दाखल केली होती. त्यामध्ये मा.कामगार न्यायालयाने श्री.म्हस्के यांना सलग सेवा धरुन, मागील काळातील बॅक वेजेस सेवा समाप्ती तारखेपासून देवुन (माहे जुलै-१९९६ ते माहे नोंव्हेंबर २००२ हा कालावधी वगळून ) पुर्ववत कामावर हजर करुन घ्यावे असा आदेश दि.०५-०१-२००६ रोजी श्री.म्हस्के यांचे बाजूने दिला होता.

मा.कामगार न्यायालयाचा दि.०५-०१-२००६ रोजीचा आदेश बेकायदेशीर ठरवून, रद्द होवून मिळावा याकरीता संस्थानने श्री.म्हस्के यांचे विरुध्द मा.औदयोगीक न्यायालय, अहमदनगर येथे रिव्हिजन (युएलपी) क्र.११/२००६ व श्री.म्हस्के यांनी माहे जुलै ९६ ते माहे नोंव्हेंबर २००२ या कालावधीतील बॅक वेजेससह कामावर रुजू करुन घ्यावे या मागणीसाठी संस्थान विरुध्द रिव्हिजन (युएलपी) क्रं.१९/२००६ दाखल केले होते.सदर दोन्हीही रिव्हिजन संदर्भात मा.औदयोगीक न्यायालय, अहमदनगर यांनी दि.०३-०७-२००८ रोजी श्री.म्हस्के यांना पुर्ववत कामावर न घेता, व बॅक वेजेस न देता नुकसान भरपाई पोटी रु.७०,०००/- आदा करणेत यावे.असा आदेश देवून रिव्हिजन (युएलपी ) क्रं.११/२००६ पार्टली अलाऊड केले व रिव्हीजन (युएलपी) क्रं.१९/२००६ डिसमिस करुन निकाली काढले.सदर आदेशास अनुसरुन श्री.म्हस्के यांना रु.७०,०००/- दि.२४-०७-२००८ रोजीचे डिमांड ड्राफ्ट अन्वये अदा करणेत आले.

त्यानंतर श्री.म्हस्के यांनी मा.औदयोगीक न्यायालय, अहमदनगर यांचे दि.०३-०७-२००८ रोजीचे आदेशा संदर्भात संस्थान विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्रं.५६२०/२००८ दाखल केले.त्यामध्ये मा.सिंगल जज्ज, उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१५-०१-२०१० रोजी आदेश करुन सदर रिट पिटीशन ॲडमीट करुन, मा.औदयौगीक न्यायालयाचे दि.०३-०७-२००८ रोजीचे आदेशास स्थगिती (स्टे) दिला होता.सदर दि.१५-०१-२०१० रोजीचा आदेश रद्द होवून मिळावा म्हणून संस्थानने श्री.म्हस्के यांचे विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथील डिव्हिजनल बेंच समोर लेटर्स पेटंन्ट अपिल क्रं.५९/२०१० दाखल केले होते त्यामध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०८-०८-२०११ रोजी "रेसपॉन्डन्ट श्री.म्हस्के यांनी दि.०५-०९-२०११ पासून पुर्ववत डयुटीवर हजर व्हावे.त्यांना कायदयाप्रमाणे प्रत्येक महिन्यास वेतन देण्यात यावे.कामगार न्यायालयाने दिलेल्या बॅक वेजेसला स्थगिती देण्यात आली" असा आदेश दिला आहे.

सदर आदेशास अनुसरुन श्री.म्हस्के हे दि.०५-०९-२०११ पासून संस्थानचे प्रकाशने विभागात जनसंपर्क अधिकारी म्हणून पुर्ववत सेवेत रुजू झाले आहे.तथापी श्री.म्हस्के हे दि. ०५-१०-२०११ पासून कामावरुन गैरहजर आहे.दरम्यानचे काळात श्री.म्हस्के यांचे प्रकरणां संदर्भात मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०९-२०११ रोजीचे सभेमध्ये चर्चा होवून "मा.औरंगाबाद खंडपीठाने लेटर्स पेटंन्ट अपील क्रं.५९/२०१० मध्ये दि.०८-०८-२०११ रोजी केलेला आदेश हा अंतरिम आदेश आहे.श्री.म्हस्के यांचे संबधीत मुळ रिट पिटीशन न्याय प्रविष्ठ असून, प्रलंबीत आहे.त्यात श्री.म्हस्के यांनी दि.२०-०४-१९९४ पासून जनसंपर्क अधिकारी पदावर सलग सेवा धरुन, त्यानुसार सर्व आर्थीक लाभ मिळावेत अशी मागणी केलेली आहे. ही बाब विचारात घेवून, श्री.म्हस्के यांनी त्यांची पुढील उर्वरित संस्थान सेवा सोडून दयावी व चालू असलेल्या कोर्ट केसेस विना अट मागे घ्याव्यात.या अटीवर तडजोडीने त्यांना रु.१७,५०,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख पन्नास हजार) मात्र देण्यात यावेत. मात्र कोर्ट केस

काढून घेतल्यानंतर व उर्वरित संस्थान सेवा सोडण्याबाबतचा तडजोडनामा मंजुर झाल्यानंतर त्यांना रक्कम आदा करावी."असा आयत्या वेळेचा निर्णय क्रं.७६०(०९) संमत झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०९-२०११ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्रं.७६० (०९) यास अनुसरुन श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांनी जनसंपर्क अधिकारी या पदाचा राजीनामा मंजुर करणेबाबत दि.२८-०३-२०१२ रोजीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "मा.व्यवस्थापन मंडळ, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांच्या बरोबर तडजोड होवून, दि.२४-०९-२०११ च्या व्यवस्थापन समितीच्या सभेतील विषय क्रं.१८ व निर्णय क्रं.७६० नुसार हायकोर्टातील प्रलंबीत मुळ दावा काढुन घ्यायचा व संस्थान सेवा सोडून दयायची.या अटीवर रु.१७,५०,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख पन्नास हजार) देण्याचा निर्णय विश्वस्तमंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मंजूर झाला.या निर्णयाला अधिन राहून मी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाकडे प्रलंबित असलेली याचीका क्रं.५६२०/२००८ काढुन घेण्यासाठी केलेल्या अर्जावर सुनावणी होवुन हा अर्ज मा.न्यायमुर्ती चंदीवालसाहेब यांच्या खंडपीठाने २९ फेब्रुवारी २०१२ मध्ये मंजुर केला आहे.सोबत त्याची प्रत जोडली आहे तसेच याच अर्जाद्वारे आपणाला कळवु इच्छितो की, जनसंपर्क अधिकारी या पदाचा मी राजीनामा देत असून तो तात्काळ मंजुर करावा ही विनंती.

संस्थानचे जा.क्रं.एसएसएस/वशी-७ए/५११५/२०१२ दि.१२ जानेवारी २०१२ च्या पत्रान्वये मी सर्व अटीची पुर्तता केलेली आहे.माहे सप्टेंबर २०११ या महिन्याचे देय वेतन व तडजोडीपोटी मंजुर केलेली रक्कम रु.१७,५०,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख पन्नास हजार) कुठलीही कपात न करता तात्काळ मिळावी "असे म्हटलेले आहे.

त्याचप्रमाणे श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांनी दि.१५-०९-२०१२ रोजीचा विनंती अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " श्री साईबाबा संस्थानने घातलेल्या सर्व अटींची पुर्तता केलेली आहे. राजीनामा पत्र पाठवून साडेपाच महिने उलटून गेले तरी मला संस्थानकडून अद्यापही रक्कम मिळालेली नाही. यासंदर्भात मी अनेकदा मा.कार्यकारी अधिकारी यांना समक्ष भेटून मागणी केलेली आहे. माझी आर्थीक स्थिती चांगली नसल्याने मला पैशाची अत्यंत गरज आहे. तरी माझे देय्य पैसे त्वरीत देणेत यावे " असे म्हटलेले आहे.

श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के, जनसंपर्क अधिकारी, प्रकाशने विभाग यांनी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०९-२०११ रोजीचे सभेमध्ये झालेल्या तडजोडीस अनुसरुन मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ व प्रलंबीत असलेले रिट पिटीशन क्रं.५६२०/२००८ हि कोर्ट केस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे पुरसीस दाखल करुन, सदर कोर्ट केस काढुन (विड्रॉन) करुन घेतली आहे. तसा मा.जस्टीज श्री.के.यु.चंदीवाल सो.यांनी दि.२९ फेब्रुवारी २०१२ रोजी रिट पिटीशन क्रं.५६२०/२००८ संदर्भात "१) Heard.On instructions,the petitioner withdraws the petition.A pursis for withdrawal of petition is filed, same is taken on record. २) Writ Petition is disposed of as withdrawn Rule discharged.No Costs."असा आदेश करुन सदर रिट पिटीशन ५६२०/२००८ निकाली काढले आहे. तसे संस्थान हायकोर्ट ॲडव्होकेट, श्री.आर.एन.धोर्डे, औरंगाबाद यांनी दि.०१-०३-२०१२ रोजीचे पत्रान्वये संस्थानला लेखी कळविलेले आहे. व मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील रिटपिटीशन क्र.५६२०/२००८ संदर्भातील दि.२९-०२-२०१२ रोजीचे आदेशाची प्रत देखील संस्थानला प्राप्त झालेली आहे. तथापी श्री.ताराचंद म्हस्के यांनी स्वंतत्रपणे विनाअट राजीनामा अर्ज, तडजोडीमध्ये ठरल्या प्रमाणे उर्वरित संस्था सेवा सोडण्याबाबतचा तडजोडनामा (अंडरटेकींग) रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर अदयापर्यत करुन दिलेला नाही.

सबब, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०९-२०११ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्रं.७६०(०९) व श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांचे दि.२८ मार्च २०१२ रोजीचे अर्जास अनुसरुन, तडजोडीत ठरले प्रमाणे श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के,जनसंपर्क अधिकारी, प्रकाशने विभाग यांनी संस्थान सेवा सोडणे कामी स्वतंत्र राजीनामा अर्ज व तडजोडीत ठरलेप्रमाणे रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर उर्वरित संस्थान सेवा सोडून दिलेबाबतचा तडजोडनामा (अंडरटेकींग) इत्यादी कागदपत्रांची पुर्तता करुन दिलेनंतर तडजोडीत ठरलेप्रमाणे त्यांना एकुण रक्कम रु.१७,५०,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख पन्नास हजार) मात्र संस्थानचे लेखाशाखेमार्फत चेक (धनादेश) द्वारे आदा करणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांचे संदर्भात, उपरोक्त प्रकरणी, संस्थान कामगार कायदे सल्लागार ॲड.अशोकराव पाटील यांनी मा.अध्यक्ष महोदय यांचेबरोबर चर्चा करावी व चर्चेत ठरेल त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय न.४७ कार्डीयाक रुग्णवाहिका वाहन क्र.एमएच-१७/ एजी- १०१६ चे दुरुस्ती कामाबाबत.**

**प्रस्ताव-** दि.०३/०९/२०१२ रोजी श्री साईबाबा रुग्णालयातुन श्री सोले तुळशीराम लालसिंग हे पेशंट नाशिक येथे पुढील उपचाराकरीता घेवुन जाणे कामी कार्डीयाक रुग्णवाहिका क्रं.एमएच-१७/एजी-१०१६ हे वाहन पाठविण्यात आले होते. नाशिक येथे पेशंट ॲडमीट केले नंतर परतीचे प्रवासात रात्री ०१.३० चे सुमारास शिंदेपळसे गावानजीक आली असता रुग्णवाहीका अचानक बंद पडली. रुग्णवाहीका चालू होत नसलेने या बाबत वाहन चालक, श्री चौधरी यांनी दुरध्वनीद्वारे श्री साईबाबा रुग्णालयचे रिसेप्शन व वाहन विभागात कळविले.

दुसरे दिवशी सकाळी एक मालवाहतुक वाहन व मेॅकनिक यांना शिंदेपळसे येथे पाठविले. सर्व युनिट चेक केलेनंतर ECM युनिट गरम होत असलेने सदर दुरुस्ती कामाकरीता रुग्णवाहीका संस्थान वाहनास टोवींग करुन नाशिक येथील दातार ॲटो कुलींग यांचेकडे सोडणेत आले. सर्व सेंसर चेक केले असता ECM युनिट मधील सेसर खराब झालेचे त्यांनी सांगितले. सदर सेंसर नवीन टाकुन वाहन चालु करणेत आले. तथापि, इंजीनमध्ये आवाज आलेने रुग्णवाहीका इंजिन टॅपेंट कव्हर खोलुन पुन्हा पाहणी केली असता. रॉकर असेम्बली फिटींगचा एक तुकडा तुटुन इंजीन टायमिंग चेन मध्ये अडकुन चेन तुटलेचे व रॉकर फिटींग मधुन निघुन व टॅपेड कव्हरवर आदळले त्यामुळे टॅपेड कव्हरला तडा गेलेचे दिसुन आले. टायमिंग चेन टाकणे करीता एसी गॅस पाईप खोलावे लागले त्यामुळे ए.सी. गॅस रिफीलींग करावा लागला.

ईसीएम सेंसर, टायमिंग चेन, एसी गॅस चार्जींग, रॉकर, इंजिन ऑईल चेंज व त्या अनुशंगिक इतर स्पेअर पार्टस टाकुन दुरुस्ती करुन घेणे कामी खालील तपशिला प्रमाणे खर्च आलेला आहे.

| **अ.नं.** | **पार्टीचे नांव** | **बील नंबर /दिनांक** | **रक्कम (रु.)** |
|---|---|---|---|
| ०१. | दातार ॲटो कुलींग, नाशिक | १२२-०६/०९/२०१२ | ६,५५०.०० |
| | | १२४-११/०९/२०१२ | १९,५१०.०० |
| | | एकुण रक्कम | २६,०६०.०० |
| | | डिस्काउंट | १,०००.०० |
| | | **एकुण देय रक्कम (रु.)** | **२५,०६०.००** |

उपरोक्त प्रमाणे सदर वाहनाकरीता ईसीएम सेंसर, टायमिंग चेन, एसी गॅस चार्जींग, रॉकर, इंजिन ऑईल चेंज व त्या अनुशंगिक इतर स्पेअर पार्टस टाकुन दुरुस्ती करुन घेणे कामी रुपये २५,०६०/- (अक्षरी रक्कम रुपये पंचवीस हजार साठ मात्र) खर्च आलेला आहे.

उपरोक्त प्रमाणे कार्डीयाक रुग्णवाहीका दुरुस्ती कामाकरीता आलेल्या रु.२५,०६०/- (अक्षरी रक्कम रुपये पंचवीस हजार साठ मात्र) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, कार्डीयाक रुग्णवाहिका वाहन क्र.एमएच-१७/ एजी- १०१६ चे दुरुस्तीसाठी आलेल्या रु.२५,०६०/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

---

**विषय न.४८ साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी साई कॉम्प्लेक्स इमारतीचे व नविन प्रसादालय परिसरात व्यवसाय चालविण्यास परवानगी मिळणेबाबत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.ऑप सोसायटी लि.शिर्डी यांचे पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** श्री क्षेत्र शिर्डी येथे येणारे साईभक्तांना विविध सोयी सुविधा मिळाव्यात यादृष्टीने श्री साई संस्थान ए.क्रे.को. ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थानने संस्थ्रंान परिसरांत कांही ठिकाणी गाळे/स्टॉलस्, मोकळी जागा कार पार्कींग, क्लोकरुम, एस.टी.डी.बुथ, प्रसाद नॉव्हेल्टी, दुध स्टॉल, मोबाईल क्लोकरुम, पादत्राणे गृह, इ. व्यवसायासाठी वापरांस दिलेल्या आहेत.

अशाप्रकारे सोसायटीस संस्थानने जागा उपलब्ध करुन दिलेमुळे साईभक्तांना सोयी सुविधा मिळणेस मदत होत आहे. त्याचबरोबर सोसायटीसही संस्थान परिसरात व्यवसायास जागा दिलेमुळे लाभ होत आहे. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रडीट को.ऑप. सोसायटी लि. शिर्डी. यांनी आता दि.२७/०७/२०१२ रोजीचे पत्राने- संस्था ही संस्थान मध्ये काम करणा-या संस्थान कर्मचा-यांचीच नोंदणीकृत सहकारी संस्था असून संस्था संस्थान मान्यतेने संस्थान परिसरात श्री साई भक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी स्नानगृह , क्लोकरुम , मोबाईल कॅमेरा क्लोकरुम पादत्राणे गृह, कारपार्किंग , प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर, एस.टि.डी. बुथ तसेच थंडपेय व दुग्धजन्य पदार्थ विक्रीचे स्टॉल चालवित असुन त्या माध्यमातुन श्री साई भक्तांना योग्य दरात उत्तमोत्तम सेवा सुविधा पुरवित आहे. त्याच बरोबर संस्थेमार्फत संस्थेच्या सभासदांना व कामगारांना त्यांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी कर्जरुपाने मोठ्या प्रमाणात अर्थ सहाय्य करत असल्याने संस्था हि संस्थेचे सभासद व कर्मचारी यांची कामधेनु आहे, अशी माहिती सादर केली आहे.

संस्था साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी संस्थानचे नविन प्रसादालय इमारतीचे परिसरात व साई कॉम्प्लेक्स इमारतीतील संस्थानचे वापरात नसलेले गाळयामध्ये थंड पेय, आईस्क्रिम, दुध व दुग्धजन्य पदार्थ, प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर चालविण्यास उत्सुक असून व्यवसाय चालविण्यास

परवानगी मिळावी, अशी विनंती केलेली आहे. तसेच संस्था संस्थानचे नियमाप्रमाणे सेवाआकार भरण्यास तयार असल्याचे म्हटले आहे.

यापुर्वीही सोसायटीने कार्यकारी अधिकारी यांना उपरोक्त आशयाचे पत्रे पाठविलेली होती. नविन प्रसादालय परिसरात व्यवसायासाठी गाळे/जागा उपलब्ध करुन देणेबाबत अद्याप काहीही ठरलेले नाही. तसेच प्रसादालय परिसरांत व्यवसायासाठी जागा उपलब्ध नाही, असे प्रसादालय विभागाने कळविलेले आहे. तसेच साई कॉम्प्लेक्समध्ये रिकामा असलेला गाळा राष्ट्रियकृत बँकांचे ए.टी.एम. साठी लिलावाने देण्याचे नियोजीत आहे. व त्याबाबतचा दि.०६/०४/२०१२ रोजीचा मा.व्यवस्थापन समितीचा ठराव झालेला आहे. त्यामुळे सदरचे दोन्हीही अर्ज दप्तरी दाखल करण्यात आलेले आहेत.

यापुर्वी सेंट्रल बँकेकडून नविन प्रसादालय परिसरात ए.टी.एम.साठी जागेची मागणी यापुर्वी केलेली होती. त्यावर दि.०६/०४/२०१२ रोजीचे सभेत निर्णय क्र.३५३ अन्वये-

यावर सविस्तर चर्चा होऊन संस्थानचे साई कॉम्प्लेक्स, भक्तनिवासस्थान, द्वारावती निवासस्थान, साई आश्रम -०१ व ०२ तसेच श्री साई प्रसादालय या ठिकाणी भक्तांच्या सोयीसाठी राष्ट्रीयकृत बँकाचे ए.टी.एम. सुरु करणेकामी जागा निश्चित करुन, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. तसेच सदर ए.टी.एम.सुरु करणेसाठी प्रत्येक ठिकाणी किमान १६० स्क्वे.फुट एवढी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी व जागेशिवाय ए.टी.एम.साठीच्या सर्व बाबी, तेथील सुरक्षा व्यवस्था इ. संबंधीत बँकानी करावे, असे ठरले आहे.

उपरोक्त ठरावाचे निर्णयानुसार बांधकाम विभाग, यांना पत्र पाठविले होते व सदर पत्राच्या प्रती संबंधीत विभागांना पाठविल्या होत्या. त्यावेळी (०१) प्रसादालय विभागाने व्यवसायासाठी प्रसादालय परिसरात जागा उपलब्ध नसल्याचे कळविलेले आहे. तसेच साई कॉम्प्लेक्स इमारतीतील गाळे संस्थानचे डोनेशन काऊंटर व बुक स्टॉल कामी वापरांत आहे. तसेच रिकामा गाळा राष्ट्रीयकृत बँकाचे ए.टी.एम.साठी देणेचे नियोजित आहे.

यापुर्वी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को.ऑप सोसा.लि.शिर्डी यांना संस्थान परिसरात उपरोक्त ठिकाणी एकूण १२ ठिकाणी उपरोक्तप्रमाणे व्यवसाय चालविणेस गाळा/जागा लिव्ह अँड लायसन्स तत्वावर मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने देण्यात आलेले आहेत. आता त्यांनी नविन प्रसादालय परिसर व साई कॉम्प्लेक्स येथे उपरोक्तप्रमाणे व्यवसाय करणेस परवानगी मागितलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१० रोजीचे ठरावाप्रमाणे मंदिर परिसरातील व्यवसाय त्यांनी अद्यापपावेतो स्थलांतरीत केलेले नाहीत. श्री संजय काळे यांनी सदर मुद्दा सोसायटीचे व्यवसायाबाबत उच्च न्यायालयात मुद्दे उपस्थित केलेले आहेत. सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे, करीता सदर विषय दि.१८/०७/२०१२ रोजीचे सभेमधील निर्णयाप्रमाणे स्थगीत ठेवणेत आलेला आहे. मंदिर परिसरातील व्यवसाय अद्याप त्यांनी स्थलांतरीत केलेले नाहीत.

उपरोक्त सर्व बाबींचा व परिस्थितीचा विचार करता श्री साई संस्थान ए.क्रे.को.ऑप सोसायटी लि.शिर्डी यांचे विनंतीस अनुसरुन नविन प्रसादालय परिसर व साई कॉम्प्लेक्स या ठिकाणी व्यवसायासाठी केलेले स्टॉलस् / जागा वापरांस देणेबाबत उपलब्ध करुन देता येणार नाही, असे दिसून येते. पुढील विचारार्थ व निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८४७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि., शिर्डी यांची नविन श्री साई प्रसादालय परिसर अथवा साई कॉम्प्लेक्स या ठिकाणी व्यवसायासाठी जागा मिळणेबाबतची विनंती अमान्य करण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.४९ श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि., शिर्डी यांना व इतर सहकारी संस्थान व खाजगी व्यावसायीक यांना चालविण्यात देण्यात आलेल्या भक्तनिवास इमारतीतील गाळयांचे बाबत.**

**प्रस्ताव-** भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीचे आतील व बाहेरील बाजुस मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने खालील गाळे चालविण्यास दिलेले आहे.

| अ.क | व्यवसायाचे नांव | मासिक परवाना फी | कालावधी | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्रसाद नॉव्हेल्टी<br>अ) नॉव्हेल्टी स्टोअर नं.-१<br>ब) नॉव्हेल्टी स्टोअर नं.- २,<br>क) प्रसाद स्टोअर नं.-१, | <br>रु.५,१००/-<br>रु.५,१००/-<br>रु.५,१००/- | मा.व्यवस्थापन समितीचे दि. १०/०१/२०१० दि.०१/०६/२००९ ते दि. ३१/०५/२०१० सदर गाळयांचा लिलाव करणेबाबत दि. ०६/०४/२०१२ चे सभेत ठराव | <br>०१) भक्तनिवास डी ब्लॉक नं. ३<br>०२) भक्तनिवास डी ब्लॉक नं. २<br>०३) भक्तनिवास डी ब्लॉक नं. ४ |
| ०२ | दुध स्टॉल<br>अ) दुध स्टॉल नं.०४ | <br>रु. ५,१००/- | | ०१) न.भ.निवास कॅन्टीन शेजारील गाळा नं. ५ |
| ०३ | क्लोकरुम<br>अ) न.भक्तनिवास क्लोकरुम (लिलावाचे वेळी खाली करुन | <br>तिन्ही ठिकाणचे क्लोकरुमचे एकत्रीत | | क्लोकरुम<br>१) न.भक्तनिवास मेन गेट जवळील |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | द्यावयाचा गाळा )<br>ब) सुलभ क्लोकरुम,<br>क) साईप्रसाद क्लोकरुम | भाडे रु.५,१४८/- | झाला आहे. | २) सुलभ शौचालय इमारतीतील<br>३) जुने चौकशी कार्यालय शेजारील |
| ०४ | श्री विजय रामचंद्र ग्वालानी, राहणार - शिर्डी | ६,६५५/- | दि.०१/०१/२०१२ ते दि. ३०/११/२०१२ | अे-विंग, गाळा नं.०६ बाहेरील |
| ०५ | सौ.रत्ना नंदु कोळपकर, राहणार शिर्डी. | ५४,५७१/- | | अे- विंग आतिल गाळा नं. ०१ |
| ०६ | श्रीरामपुर दुध संघ बाभळेश्वर, बाभळेश्वर ता.राहाता, जि.अ.नगर | ६२,५५७/- | | डी- विंग आतिल गाळा नं.०५ |
| ०७ | श्री अशोक सुर्यभान पवार, राहणार- शिर्डी, ता.राहाता, | ५५,९०२/- | | डी- विंग आतिल गाळा नं.०७ |
| ०८ | प्रवरा फळे फुले भाजीपाला उत्पादक, लोणी, तालुका-राहाता | २९,२८२/- | | डी- विंग आतिल गाळा नं.०८ |
| ०९ | कर्मचारी संघटना राजेंद्र जगताप, शिर्डी ता.राहाता, जि.अ.नगर | २९,२८२/- | | डी- विंग बाहेरील गाळा नं.११ |
| १० | श्री साई संस्थान एम्प्लॉईज को.ऑप. सो. ता.राहाता, जि.अ.नगर | १६,६३८/- | | डी- विंग बाहेरील गाळा नं.१२ |
| ११ | श्री किरणकुमार आर. येमुलपल्ली, रा. शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर | ६,७८८/- | | डी- विंग बाहेरील गाळा नं. १३ |

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि. १०/०१/२०१० चे सभेतील निर्णय क्र. ९१ अन्वये तक्त्यातील अ.क्र.नं. १ ते ३ चे गाळे व मा.व्यवस्थापन समितीचे दि. १४/०१/२०१२ चे सभेतील निर्णय क्र. १६७ अन्वये तक्त्यातील अ.क्र.नं. ४ ते ११ हे गाळे चालविण्यास देणेबाबत निर्णय झाला.

२) अ.क्र.नं. १ ते ३ च्या स्टॉलची / गाळयांची मुदत दि. ३१/०५/२०१० रोजी संपुष्टात आली आहे. सोसायटीने दि. ०६/०५/२०१० च्या पत्राने पुढील ५ वर्षासाठी मुदतवाढ मिळणेस विनंती केली होती. त्यास अनुसरुन दि. ०४/०७/२०१० रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विषय नं. ७३ ठेवण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ५९४ नुसार पुढील प्रमाणे निर्णय झालेला आहे. "... भक्तनिवास इमारतीचे बाहेरील दक्षिण बाजूचे ०५ गाळयांचा संस्थानचे कामासाठी वापर करावा, तसेच इमारतीचे आतील बाजूचे सध्या श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप सोसायटीच्या ताब्यात असलेल्या ०५ गाळयांचा ११ महिने कालावधीसाठी लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर वापरास देणेसाठी जाहिर लिलाव करावा. त्याचबरोबर सदरची कार्यवाही होईपर्यंत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप सोसायटीकडून ०५ गाळयांची मुदत संपलेल्या तारखेपासून मागील मान्य दराने परवाना फी वसूल करण्यात यावी, असे ठरले आहे.. "

३) प्रस्तुतचे ठरावास अनुसरुन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप सो. लि. शिरडी यांना जा.क्र. एसएसएस / विधी /९७२७/२०१० दि. ०५/१०/२०१० चे पत्राने लिलावाची कार्यवाही पुर्ण होईपर्यत ५ गाळयांची मागील मान्य दराने परवाना फी संस्थान जमा करणेस कळविलेले आहे.

४) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०६/०४/२०१२ चे सभेतील विषय नं. ९३ निर्णय क्र. ३५४ चे ठरावाप्रमाणे नविन भक्तनिवासस्थान इमारती मधील श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप सो. लि. शिर्डी यांना वापरास दिलेल्या ३ गाळे, १ मोकळी जागा ( कॅन्टीन शेजारी ) व १ रुम ( क्लोकरुमची ) चा जाहिर लिलाव करणेकामी वर्तमान पत्रात प्रसिध्दीस द्यावयाचे जाहिरातीचे मसुद्यास व वर्तमान पत्रात प्रसिध्दीसाठी येणाऱ्या खर्चाचे मान्यतेसाठी दि.२१/०६/२०१२ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करण्यात आली होती. त्यावर मा.हुजूर यांनी ५०० रुम येथील वापरांस दिलेले सर्व व्यावसायीक गाळे बंद करावे असे वाटते याबाबत येत्या मा. त्रिसदस्य समितीचे सभेचे वेळी सदरचा विषय चर्चेसाठी घ्यावा असे ही सुचीत केलेले आहे.

५) तसेच दि. ०३/०७/२०१२ चे साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाचे टिपणीने दि. ३०/०६/२०१२ रोजी मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या आपत्ती व्यवस्थापन बैठकीमध्ये चर्चिल्या गेलेल्या मुद्यामध्ये साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीतील ए विंग बाहेरील बाजूचा गाळा नं. ०६ व डि विंग बाहेरील बाजूचा गाळा नं. १२ या दोन्ही गाळयात खाद्यपदार्थ शिजविणेकामी एल.पी.जी. गॅस टाक्यांचा वापर करण्यात येतो सदर ठिकाणी काही दुर्घटना घडल्यास जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण सदर ठिकाणी नेहमी साईभक्तांची वर्दळ असते. या ठिकाणी आपत्ती ओढवल्यास प्रतिबंधक उपाययोजना सदर ठिकाणी उपलब्ध नाही. त्यामुळे खबरदारीचा उपाययोजना म्हणून सदर गाळे बंद करावे असे ठरले आहे.

६) श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीने दि.२८/०६/२०१२ चे पत्राने असे कळविले आहे कि, मा.ना. श्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दि. १२/०५/२०१२ रोजीचे पत्राने मा.जिल्हाधिकारी सो. यांना असे सुचित केले आहे की, संस्थानने सोसायटीस ५०० रुम येथे वापरांस दिलेल्या ५

गाळ्यांचा लिलाव करणेचा निर्णय त्रिसदस्यीय समितीने घेतलेला आहे. सदर गाळ्यांचा लिलाव न करता दर अकरा महिन्यांनी संस्थेस भाडे तत्वावर देणेबाबत संस्थेने विनंती केलेली आहे. कृपया त्रिसदस्यीय समितीने घेतलेल्या निर्णयास स्थगिती देऊन गाळे संस्थेस भाडेतत्वावर देणेबाबत उचित कार्यवाही करावी. सदरच्या पत्राची प्रत मा.श्रीमती रुबल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना अग्रेषीत केली आहे. सदर पत्राची झेरॉक्स प्रत सोसायटीने इकडेस पाठविलेली आहे.

तरी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप सो. लि. शिर्डी यांना व इतर सहकारी संस्था व खाजगी व्यवसायीक यांना चालविण्यास देण्यात आलेल्या श्री साईबाबा भक्तनिवास इमारतीतील गाळे संस्थानचे वापरास घेणेबाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८४८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि., शिर्डी तसेच इतर सहकारी संस्था व खाजगी व्यवसायीक यांना त्यांचे व्यवसायासाठी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान या इमारतीमध्ये देण्यात आलेल्या सर्व गाळयांचे कराराचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर खाली करुन घेण्यात यावेत व ते गाळे संस्थानचे वापरास घेण्यात यावेत, असे ठरले.**

(कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.५० श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि., शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थान परिसरात कायम स्वरुपी व्यवसाय मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को- ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी मा.ना. श्री राधाकृष्ण विखे पा. कृषि व पणन मंत्री, महाराष्ट्र राज्य मुंबई यांना दि. १०/०४/२०१२ रोजी पत्र देवून सोसायटीच्या कारभारा विषयी, सभासद संख्या, कर्मचारी संख्या व शासनाकडे जमा केलेल्या महसुलाबाबत माहिती दिलेली आहे. व याच पत्रान्वये संस्थानचे अधिनियमात दुरुस्ती करणेबाबत विनंती केलेली आहे.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ चे कलम क्र १७(३) मधील तरतुदीनुसार विश्वस्तव्यवस्थेची स्थावर मालमत्ता एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्ट्याने राज्य शासनाचे पुर्वमंजुरी शिवाय समितीकडून देता येणार नाही अशी तरतुद आहे. त्यांचे संस्थेस मंदिर परिसर व संस्थान परिसरात प्रत्येक ठिकाणी जागा / स्टॉल्स भाडे, विद्युत बील व इतर वसुली निश्चीत करुन कायम स्वरुपी मिळणेसाठी संस्थान अधिनियमात / नियमावली मध्ये तरतुद करणेस सोसायटीने विनंती केलेली आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियमावली तयार करण्याचे काम मा.सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई येथे अंतीम टप्प्यात आहे. तसेच सन २००४ चा अधिनियम क्र. १४ चे कलम क्र. १७(३) नुसार, तसेच मंत्रालय, न्यायालय अथवा इतर शासकीय कर्मचाऱ्यांच्याही सहकारी पतसंस्था असुन त्या सर्व पतसंस्थांना मालक संस्थेच्या किंवा विभागांचे स्थावर मालमत्तेत अथवा त्याचा परिसरात अग्रक्रमाने ( मालक संस्थेकडून ) जागा / गाळे उपलब्ध करुन दिलेले आहेत. त्याच प्रमाणे श्री साईबाबा संस्थान मधील काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार रजि. नं. २३,१८३ दि. ३०/०१/१९५७ ने स्थापन असलेल्या सहकारी संस्थेस मंदिर व संस्थान परिसरात प्रत्येक ठिकाणी साईभक्तांचे सेवेसाठी व्यवसाय करणेसाठी जागा / स्टॉल उपलब्ध करुन देणे व त्याप्रमाणात भाडे, विद्युत बिल व इतर वसुली नियमित करुन दर अकरा - अकरा महिन्यांनी भाड्यामध्ये अल्प प्रमाणात वाढ करुन व्यवसाय कायम स्वरुपी संस्थेस मिळणेसाठी संस्थान अधिनियमात तरतुद करणेबाबत सोसायटीची विनंती आहे.

सोसायटीने संस्थानकडे मुदतवाढ मिळणेबाबत वारंवार विनंती अर्ज केलेले आहेत परंतू उलट पत्रांनी संस्थानकडून वारंवार जागा / स्टॉल खाली करुन देणेबाबत कळविण्यात येत असल्याने, सहकारी संस्थेचे भवितव्य धोक्यात येत असून संस्थेचे २३२ कामगारांचे व २४०० सभासदांचे मोठ्या प्रमाणात आर्थीक नुकसान होणार आहे. असे सोसायटीचे म्हणणे आहे.

संस्थानचे मंदिर परिसरात व संस्थान परिसरात खाजगी व्यक्तींना सदरचे व्यवसाय दिले तर साईभक्तांना मनमानी किंमतीला प्रसाद खरेदी करावा लागेल, तसेच शासनासही मोठ्या प्रमाणावर महसुल मिळणार नाही व योग्य प्रमाणात कर्मचारी रोजगारही उपलब्ध होणार नाही. त्यामुळे संस्थेसह परिसरातील सहकारी संस्थाही धोक्यात येतील. त्यामुळे मा. मंत्री महोदयांनी या प्रश्नात लक्ष घालून श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को- ऑप.सोसायटी लि.शिर्डीस अग्रक्रमाने संस्थेस संस्थान परिसरात व्यवसाय देणेबाबत अधिनियमात तरतुद व्हावी अशी विनंती केली आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को- ऑप.सोसायटी लि.शिर्डीने सदर पत्राची प्रत मा.ना. पृथ्वीराजजी चव्हाण, मुख्यमंत्री तथा विधी व न्याय मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना पाठविली आहे. त्या पत्रावर कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांनी संदर्भ क्र. २ चे पत्राने संस्थान परिसरात कायम स्वरुपी व्यवसाय मिळण्यासाठी संस्थान अधिनियमात तरतूद करण्याचे मागणीचे अनुषंगाने संस्थानचा मुद्देनिहाय अभिप्राय शासनास पाठविण्यात यावेत असे कळविले आहे.

महाराष्ट्र शासनाचे पत्रानुसार सोसायटीचे निवेदनाबाबत खालील प्रमाणे अभिप्राय शासनास पाठविता येईल त्यांस मान्यता असावी.

१) श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को- ऑप.सोसायटी लि.शिर्डी हि संस्थानचे कायम कर्मचाऱ्यांची सहकारी पतपेढी आहे. सदरची सोसायटी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार रजि. नं. २३, १८३ दि. ३०/०१/१९५७ नोंदणी कृत सोसायटी आहे.

२) प्रस्तुत सोसायटीस संस्थान परिसरात त्यांचे विविध व्यवसाय चालविणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर जागा दिलेली आहे. जागेचे वापराची मुदत संपुष्टात आल्यानंतर वेळोवेळी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मुदतवाढ दिलेली असून त्यांचे मार्फत श्री साई भक्तांना सुविधा प्राप्त होणेस मदत होत आहे. भक्तांची सुरक्षितता व वर्दळ लक्षात घेऊन मंदिर परिसरातील सोसायटीचे काही व्यवसाय हलविणेबाबत सोसायटीस कळविणेत आलेले असून त्यांनी सदर व्यवसाय अद्याप पावेतो स्थलांतरीत केलेले नाहीत. त्याबाबतची पुढील कार्यवाही चालू आहे. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को. ऑपरेटीव्ह सोसायटी हि संस्थान कर्मचाऱ्यांची सोसायटी आहे. त्यामुळे संस्थान कर्मचारी सभासदांना व कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे कर्ज प्राप्त होते. सोसायटीचे विविध व्यवसायांचे उपक्रमामुळे इतर संस्थांनाही रोजगार प्राप्त होणे सहाजिकच आहे. त्याचप्रमाणे शासनास कर देखील मिळतो ही वस्तुस्थीती आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को. सोसायटीस समाधी मंदिर परिसरातील जागा खाली करुन मागीतल्या आहेत. सदर ठिकाणी भक्तांची वर्दळ असते, साईभक्तांचे सोयीचा विचार होऊनच पतपेढीस समाधी मंदिर परिसरातील जागा खाली करणेस कळविलेले आहे. परंतू अद्याप पावेतो त्यांनी जागा खाली केलेली नाही.

श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट ॲक्ट २००४ चा ( कलम १७(३) ) विचारांत घेता एक वर्षा पेक्षा अधिक मुदतीसाठी संस्थानची मिळकत शासनाचे परवानगी शिवाय देता येत नाही. सदरची बाब विचारात घेता पतपेढीस १ - १ वर्षाचे मंजूरीने लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर जागा वापरांस परवानगी दिलेली आहे. व त्याप्रमाणे जागेचा वापर त्यांचेकडून चालूच आहे.

मंत्रालय, न्यायालय अशा इतर शासकीय कर्मचाऱ्यांचे पतसंस्थेस मालक संस्थेचे किंवा विभागाचे स्थावर मालमत्तेत अथवा त्याच परिसरात अग्रक्रमाने (मालक संस्थेकडून ) जागा / गाळे उपलब्ध करुन दिले असल्याचे सोसायटीने पत्रात नमुद केलेले आहे. परंतू याबाबत ठोस किंवा लेखी माहिती उपलब्ध नाही. सदरची माहिती श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. ऑपरेटीव्ह सोसायटीने सादर केलेली नाही. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. ऑपरेटीव्ह सोसायटी ही सहकारी कायद्याअंतर्गत नोंदणी झालेली स्वतंत्र संस्था आहे. मालक संस्था म्हणून

संस्थानकडून त्यांना नियमाप्रमाणे सहकार्य अपेक्षीत आहे. त्याच प्रमाणे कर्मचाऱ्यांचे हिताची जपवणूक करणे हे संस्थेचे उद्दीष्ट आहे. त्याचप्रमाणे साईभक्तांचे सुविधांस अग्रक्रम देणे हे संस्थानचे ध्येय आहे. करीता त्याकामी मालक संस्थेस सहकार्य असणे आवश्यक आहे. याबाबी विचारात घेवून संस्थान परिसरात प्राधान्याने भक्तांच्या सोयीसाठी जागा वापरांस देणेबाबत अग्रक्रम देऊन त्यानंतर पतपेढीस जागा वापरास देणे बाबत सहकार्य करणेबाबत ( Not as of right ) अधिनियमात तरतुद करणेबाबत शासन स्तरावर विचार करता येईल. असा अभिप्राय शासनाकडे सादर करता येईल.

सोसायटीची उलाढाल हि संस्थानने सोसासटीस साईभक्तांचे सोयीसाठी करावयाचे व्यवसायाव्दारे (उदा. वाहन पार्किंग, क्लोकरुम, प्रसाद नॉव्हेल्टी स्टोअर, गरम पाणी पुरवठा, थंडपेय / दुध व दुग्ध जन्यपदार्थ, मोबाईल-कॅमेरा क्लोकरुम, पादत्राण गृह, ) होते. सोसायटीचे उत्पादनावर सभासदांना व सोसायटीचे कर्मचाऱ्यांना जिवन मान उंचावण्यासाठी सवलतीच्या दरात कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. तसेच सोसायटी मार्फत साईभक्तांना सुविधा पुरविण्यात येतात. खाजगी व्यावसायीकांना सदरचे व्यवसाय दिल्यास सोसायटीचे उत्पन्न बंद होईल व सोसायटीचे अस्तीत्व धोक्यात येईल. असे सोसायटीचे म्हणणे आहे. संस्थान परिसरात भक्तांचे सोयीसाठी काही उपक्रम राबविणे व त्यासाठी जागा वापरांस द्यावयाची असल्यास त्याबाबत परिस्थीतीनुसार निर्णय घेणेचे अधिकार संस्थानने राखून ठेवले आहेत. त्यामुळे सोसायटीचे अस्तीत्वावर काही परिणाम होणार असेल तर त्याची जबाबदारी संस्थानवर येणार नाही. भक्तांचे सोयीसाठी असे व्यवसायांस जागा लिलावाने देणे अथवा जागा वापर बंद करणे याचा अधिकार संस्थानचा आहे. याबाबी देखील संबंधीत संस्थेने ( पतपेढीने ) विचारांत घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त बाबी विचारात घेऊन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्ता, शिर्डी अधिनियम २००४ मध्ये कलम १७ (३) मधील तरतुदीनुसार विश्वस्तव्यवस्थेची स्थावर मालमत्ता एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता हस्तांतरीत राज्य शासनाचे पुर्वमंजुरी शिवाय समितीकडून देता येणार नाही अशी तरतुद आहे. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को- ऑप.सोसायटीची मागणी संस्थान हद्दीत कायम स्वरुपी व्यवसायास जागा मिळावी अशी आहे. सध्याचे तरतुदी मध्ये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट

को- ऑप.सोसायटी लि.शिर्डीस अग्रक्रमाने शासनाचे नियमाप्रमाणे लायसन्सी / भाडे आकारणी करुन अधिनियमातील कलम १७ (३) अनुसरुन ३ वर्षा पावेतो ११ - ११ महिन्याचे कालावधी प्रमाणे किंवा यथायोग्य कालावधी साठी प्रति वर्षी मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन (लाईट बील, डिपॉझीट, वगैरे आकारुन) संस्थान परिसरात जागा / स्टॉल भक्तांना सुविधा देणेसाठी शासन स्तरावर अधिनियमात दुरुस्ती करणेबाबत विचार करता येईल असे शासनास कळविणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८४९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

(कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय न.५१ शिर्डी नगरपंचायतीस, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प आणि त्यासाठी आवश्यक पायाभुत सुविधा निर्माण करण्यासाठी व लगतची जागा खरेदी करणेसाठी रुपये २० कोटी अर्थ सहाय्य मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.अध्यक्षा, नगरपंचायत शिर्डी यांनी जा.क्र.न.पं./साप्र/कावि-१/४२३/२०१२, दि.१५.०९.२०१२ चे पत्राने, खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

वरील विषयाचे अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी साहेब व प्रदुषण नियंत्रण बोर्ड यांचे सुचनेनुसार शिर्डी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी खरेदी करावयाच्या २५ एकर जागेपैकी नगरपंचायतीने शिंगवे शिवारात १०.३० एकर जागा रु.१.७८ कोटी रकमेस दि.०६.०९.२०१२ रोजी खरेदी केली आहे. सदर जागेवर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारणी करुन या जमीनीलगत विक्रीस असलेली १९ एकर जागा खरेदी करावयाची आहे.

खर्चाचे प्राथमिक अंदाजपत्रक खालीलप्रमाणे

| अ.नं. | बाब | अंदाजित खर्च (रु.लक्ष) |
|---|---|---|
| १ | वाढीव १९ एकर जमीन खरेदी करणे (प्रती एकर रु.१६.५० लाख ) | ३१३.५० |
| २ | वॉलकंपाऊंड | १००.०० |
| ३ | विद्युत व्यवस्था (एक्सप्रेस फिडर) | २००.०० |
| ४ | पाणी व्यवस्था | ००१.५० |
| ५ | पोहच रस्ता व अंतर्गत रस्ते | ०७५.०० |
| ६ | शेड कॉन्क्रीटीकरण / गोडावुन व कर्मचारी निवास | १००.०० |
| ७ | सेंद्रीय खत प्रकल्प | ५००.०० |
| ८ | गॅस प्रकल्प | ३००.०० |
| ९ | विद्युत निर्मीती प्रकल्प | ३००.०० |
| १० | जळाऊ विटा/ कोळसा निर्मीती प्रकल्प | १००.०० |
| ११ | प्लॅस्टीक पुर्नवापर प्रकल्प | १००.०० |
| १२ | शास्रोक्त भुमि भराव | १००.०० |
| १३ | अद्ययावत वहाने (हायड्रोलीक कॉम्पॅक्टर,जे.सी.बी. इ.) | २००.०० |
| १४ | इतर | २००.०० |
| | **एकूण** | **२५९०.००** |

शिर्डी नगरपंचायतीने शिंगवे येथील स.नं.६९/२/३ या जागेवर घनकरचा व्यवस्थापन प्रकल्प व त्यासाठी आवश्यक पायाभून सुविधा निर्माण करणेसाठी त्याचप्रमाणे प्रकल्पालगतची १९ एकर जागा खरेदीसाठी अंदाजे रु. २० कोटी नगरपंचायतीस अर्थसहाय्य मिळावे अथवा सदरची कार्यवाही श्री साईबाबा संस्थानमार्फत व्हावी, अशी विनंती केली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा अधिनियम १४ कलम २१ (२) (एक) नुसार विश्वस्तव्यवस्थेच्या पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृहे किंवा इतर धर्मदाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधीत असलेली एखादी नोदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी, किंवा

स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी मा. छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने अनुदान देण्याची तरतुद आहे.

प्रस्ताव अवलोकनार्थ व निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.८५० यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-प्रशासन शाखा, वशी-०३ )

---

**विषय न.५२** **दि.२० जुलै २०१२ श्री साईसच्चरीत पारायण सोहळा कार्यक्रमपत्रिका.**

**प्रस्ताव-** श्री.संजय भास्करराव काळे, कोपरगांव यांनी मा.अध्यक्ष महोदय यांना अग्रेषीत केलेल्या दि.२०/०८/२०१२ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

" २७ मार्च २०१२ रोजीच्या मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचे आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान वर त्रिसदस्य समितीची नियुक्ती झाली. सदर समितीचे अध्यक्ष आपण आहात. मा.कार्यकारी व जिल्हाधिकारी अहमदनगर हे इतर दोन सदस्य आहेत.

दि.२०/०७/२०१२ ते २८/०७/२०१२ पर्यत हनुमान मंदिर शेजारील पारायण मंडपात संस्थान ने आयोजित केलेल्या श्री साईसच्चरीत पारायण सोहळयाच्या कार्यक्रम पत्रिकेवर शेवटच्या पानावर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था ( शिर्डी ) व्यवस्थापन समिती असे नामोल्लेख करुन उपकार्यकारी अधिकारी डॉ.यशवंतराव वसंतराव माने यांचे नाव टाकण्यात आलेले आहे.

सदरच्या नावाखाली जरी सदस्य असे लिहीलेले नसले तरी सामान्य माणूस त्यांना पत्रिकेप्रमाणे समितीचा सदस्य समजण्याचा गोंधळ करतो. अशा प्रकारे व्यवस्थापन समितीच्या यादीमध्ये नाव छापुन मा.उच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या समिती मध्ये त्यांनी बेकायदा अतिक्रमण केलेले आहे.

मा.उच्च न्यायालयाने, समिती गठण करतांना समितीतील सदस्यांचा स्पष्ट उल्लेख केलेला असतांना कार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी अधिकारी यांनी उच्च न्यायालयाच्या आदेशांचा अवमान केलेला आहे.

ज्या संस्थेचे अध्यक्ष प्रधान जिल्हा न्यायाधिश आहे त्या संस्थेच्या कार्यकारी व उपकार्यकारी अधिकाऱ्यांने अशा प्रकारे उच्च न्यायालयाचा अवमान करणे अपेक्षीत नाही. सदर अवमानास गांभीर्यपुर्वक कारावाईने दुरुस्ती व्हावी. सदर अधिकारी न्यायालयाच्या आदेशाच्या अवमान याचिकेस पात्र आहेत. कारवाई व्हावी. "

श्री साईचरित्र पारायण सोहळा श्रावण मासामध्ये नाटयरसिक संच, ग्रामस्थ व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने साजरा केला जातो. श्रावण मासामध्ये श्री साईचरित्र पारायणांचा सोहळा आयोजित करण्याची मुळ संकल्पना नाटय रसिक संच शिर्डी व ग्रामस्थांची आहे. सदर सोहळा " शिर्डीकरांचा आनंदोत्सव " म्हणून नाटय रसिक संच व ग्रामस्थ व संस्थानच्या वतीने गेल्या १८ वर्षापासून साजरा करण्यात येतो. यात प्रमुख्याने नाटय रसिक संच यांचा प्रमुख सहभाग असतो. संस्थान आर्थिक मदत करते. सदरच्या निमंत्रण पत्रिकेवर विश्वस्त मंडळातील सदस्यांचा, कार्यकारी अधिकारी, नाटयरसिक संचाचे पदाधिकारी, यांचा नामोउल्लेख असतो हा कार्यक्रम केवळ संस्थानचा स्वतंत्र कार्यक्रम नाही.

सदर कार्यक्रम धार्मिक स्वरुपाचा खेळीमेळीच्या आनंदी वातावरणाचा असतो. सन २०११ च्या पत्रिकेत व्यवस्थापन समितीच्या १६ सदस्यांची तसेच त्याखाली कार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी अधिकाऱ्यांची नावे छापण्यात आलेली आहेत. नंतर सन २०१२ च्या निमत्रंण पत्रिकेत व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व २ सदस्यांचे नावे व त्यांचे सदस्य असल्याचे स्पष्ट नमूद आहे. त्याखाली डॉ.यशवंतराव माने,उपकार्यकारी अधिकारी असे छापलेले आहे. त्यात उपकार्यकारी अधिकारी या पदनामाचा स्पष्टपणे नामोउल्लेख केलेला आहे.सदस्य व्यवस्थापन समिती असा कुठेही उल्लेख नाही.त्यामुळे ते सदस्य असावेत असा समजण्याचा गोंधळ होण्याचे कारण संयुक्तीक नाही . सबब यात मा.उच्च न्यायालयाचा अवमान होईल अशी वस्तुस्थिती नाही.

"सदर अधिकारी न्यायालयाच्या आदेशाच्या अवमान याचिकेस पात्र आहेत" असे तक्रारदाराने जे नमुद केले आहे, ते उपरोक्त वस्तुस्थिती पाहता त्यांचे म्हणणे योग्य नाही असे नम्र मत आहे.

सदरचा विषय मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत निर्णयासाठी सादर

**निर्णय क्र.८५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-प्रशासन शाखा, वशी-०५)

---

**विषय न.५३** **श्री पुण्यतिथी उत्सव- २०१२ चे किर्तनकार व कलाकार निश्चिती करणे/ बिदागी निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी तर्फे श्री पुण्यतिथी उत्सव २०१२ हा दि.२३/१०/२०१२ ते दि.२६/१०/२०१२ अखेर चार दिवस साजरा होणार आहे.

**अ) कीर्तन कार्यक्रम :-**

उत्सवात ४ दिवस नारदीय पध्दतीने किर्तन कार्यक्रम होत असतात. मागील श्री पुण्यतिथी उत्सवात ४ दिवसाचे किर्तनासाठी रु. ९००१/- बिदागी देण्यात आलेली होती. खालील २

कीर्तनकारांनी श्री पुण्यतिथी उत्सव- २०१२ मध्ये कीर्तन कार्यक्रम मिळावा म्हणून संस्थानकडे अर्ज केलेले आहेत, त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | किर्तनकार नांव |
|---|---|
| १ | श्री मनुमहाराज कोकलेगांवकर, श्री.सदगुरु छाया, ३/३/१३९, चिखलवाडी, नांदेड-४३१६०१ मो.नं.९४२०६६७५४९ |
| २ | ह.भ.प. महेशबुवा काणे, २/ अनिकेत अपार्टमेन्ट, रेल्वेस्टेशन जवळ, वालोपे, चिपळूण, जि.रत्नागिरी, पीन ४१५ ६०५ मो-९४२०८४१५६७, ९०११२२१३१५ |

मागील उत्सवाप्रमाणे किर्तनकारास रु.९००१/- (नऊ हजार एक मात्र ) मानधन देणेबाबत व उपरोक्त पैकी किर्तन कार्यक्रम कोणास द्यावा, या बाबतचा निर्णय होणेस विनंती.

**ब) कलाकार कार्यक्रम :**

पुण्यतिथी उत्सव ४ दिवसाचा असल्याने किमान ४ कार्यक्रम आयोजित करावे लागतात.

**१)** संस्थानतर्फे लंडन येथे दिनांक १९/०९/२०१० रोजी भजनसंध्या कार्यक्रम आयोजित केला होता. त्यावेळी पं.श्री.सुरेशजी वाडकर यांना भजनसंध्यासाठी रक्कम रुपये दहा लाख अग्रीम म्हणून देण्यात आलेली होती. त्यांना व त्यांच्या कलाकारांना व्हीसा न मिळाल्यामुळे ते कार्यक्रमास उपस्थित राहु शकले नाही. व्हीसा वगैरे कामाचा खर्च वजा जाता त्यांच्याकडून संस्थानची रक्कम रुपये ४,४६,३१२/- येणे आहे. हि रक्कम अधिक रुपये ५०,०००/- याप्रमाणे एकुण रक्कम रुपये ४,९६,३१२/- मानधनावर श्री रामनवमी उत्सव २०१२ यामध्ये साईभजन संध्या कार्यक्रम आयोजित केला होता. त्या कार्यक्रमासाठी येणेचे कबूल केले होते. परंतू ते येऊ शकले नाही. जा.नं.एसएसएस/ वशी-५/ २५३१/ २०१२ दि.०७/०९/२०१२ रोजी पुण्यतिथी उत्सव २०१२ मध्ये त्यांनी कार्यक्रम स्विकारावा म्हणून पत्र देण्यात आलेले आहे. सदर कार्यक्रम स्विकारणेबाबत त्यांचेकडून अद्याप पावेतो स्विकृती पत्र मिळालेले नाही.

**२)** पुण्यतिथी उत्सव २०१२ चे उत्सवात कार्यक्रम मिळणेकामी खालीलप्रमाणे अर्ज आलेले आहे. त्यापैकी अ.नं. १ ते ४ यांनी विनामुल्य कार्यक्रम मिळावा म्हणून विनंती केलेली आहे. अ.नं. ६ ते ९ यांचे कार्यक्रम संस्थानमध्ये झालेले आहे. अ.नं.१० यांनी मानधनाची मागणी केलेली आहे.

पं.श्री.सुरेशजी वाडकर यांची कार्यक्रम स्विकारल्याबाबतची समंती आलेली नाही. आल्यास त्यांचा एक कार्यक्रम ठेवता येईल. परंतु ते न आल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून अजुन एक कार्यक्रम ठेवता येईल. ४ दिवसाचे खालील नमूद केलेल्या ४ कलाकारांना कार्यक्रम देता येईल. पं.श्री.सुरेशजी वाडकर यांचा कार्यक्रम असेल त्या दिवशी दोन कार्यक्रमांना वेळ विभागून देता येईल.

| अ. नं. | कलाकाराचे नांव | कार्यक्रम तपशील | कलाकार संख्या | बिदागी |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती जयंतीमाला,<br>कला क्रिती केंद्र, १०९, अर्मनगर भाग-१,<br>भुनगोलोस, वरसोव्हा, अंधेरी , मुंबई -४०००६१.<br>मो-९८२१०८७४३९, ९८१९४९१७९७ | कथक नृत्य व संगित | १० | विनामुल्य |
| २ | श्री.मधुकर भूवड, मुंबई<br>C/o श्री.रमेशभाई संहेता, मुंबई<br>मो.नं.९८६९१३४४१७, ९३२२४०५५०९ | श्री साईबाबांच्या जीवनपटावर एक नाटीका व साई भक्ती गीतांचा कार्यक्रम. | ५० | विनामुल्य |
| ३ | महेशप्रसाद रामकृष्ण लिमये<br>शुभम क्रिएशन्स मुंबई | स्वरांजली<br>गीत , संगीत | | विनामुल्य |
| ४ | साईकृतिजी मनिष शर्मा,<br>श्रध्दा भक्ती इन, प्लॉट नं.५, छत्रपतीनगर,पोष्ट-शिर्डी जि.अहमदनगर.<br>मो-८९७५०८५८३३ | साईकथा व भजन | | विनामुल्य |
| ५ | के.व्ही.सत्यनारायणा.<br>के.व्ही.एस. ब्रीधवन गांधीनगर, एलरु-५३४ ००२ ए.पी. इंडिया.<br>मो.९८४८१ २२४१३, ८९८५१०४५०० | कुचीपुडी नृत्य | १५ | विनामुल्य |
| ६ | श्री.शुभ्रम बहल<br>८/६६, आर्य नगर, कानपुर -२०८००२<br>मो-९८३८५९००००, ९८३८०००१११<br>श्री पुण्यतिथी २०११ मध्ये कार्यक्रम झालेला आहे. | लीला श्री साईची ,प्रवचन /भजन कार्यक्रम | ५ ते ६ | विनामुल्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | सौ.सुनिता टिकारे<br>४,टि.एच.कटरीया मार्ग, माहिम,<br>मुंबई -४०००१६, मो-९८६७८१२७४२<br>शिर्डी महोत्सव २०११ मध्ये कार्यक्रम झालेला आहे. | शास्त्रीय संगीत, अभंग, भजन | | आपण जे मानधन दयाल ते मान्य |
| ८ | देवरावजी कुळमेथे<br>मु.संभाजीनगर, भोरमळ, रेल्वे ट्रॅक्शन गेटसमोर, पो.नासिकरोड, ता.जि.नाशिक.<br>मो-९४०५३५६८८९, ९२२५७३८६५०<br>श्री पुण्यतिथी २०११ मध्ये कार्यक्रम झालेला आहे. | गीतकार, संगीतकार, गायक व प्रवचनकार कार्यक्रम | ६ ते ७ | आपण द्याल ते मानधन |
| ९ | श्री.विजया ज्योती श्रीनिर्मला नृत्य निकेतन, ६-९३/१ संथीनगर, पेन्डूथ्री, विशाखापटणम् , आंध्रप्रदेश, ५३११७३<br>मो.९१७७३५४४९१, ९३९४७४३१८८<br>लिम्का रेकॉर्ड व ग्रिनींज रेकॉर्ड,<br>श्री गुरुपौर्णिमा २०१२ मध्ये कार्यक्रम झालेला आहे. | नृत्याचा कार्यक्रम | १७ | रु.१००००/- |
| १० | कु.सुरभि केतन कुलकर्णी ,<br>C/o श्री.केतन चंद्रकांत कुलकर्णी<br>यशोधन, श्रीराम मंदीर रोड, कोपरगांव<br>मो-९४२२२२६८५०, ८०८७४९८९८३ | गीत सुरभि | १० | रु.२१०००/- |

उपरोक्त श्री पुण्यतिथी २०१२ चे उत्सवाचे ४ दिवसाचे कालावधीसाठी कलाकार व त्यांचे मानधन निश्चितीबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री पुण्यतिथी उत्सव २०१२ हा दि.२३/१०/२०१२ ते दि.२६/१०/२०१२ अखेर ४ दिवस साजरा होणार आहे. (अ) किर्तन कार्यक्रम- या उत्सवात नारदीय पध्दतीने किर्तन, गोपाळकाला व दहिहंडीसाठी किर्तनकार श्री. मनुमहाराज कोकलेगांवकर, नांदेड यांना मागील पुण्यतिथी उत्सवाप्रमाणे रु.११,०००/- मात्र मानधन देऊन त्यांचे किर्तनाचा कार्यक्रम ठेवणेत यावा. तसेच (ब) कलाकार कार्यक्रम- उत्सवाचे ४ दिवसाचे कालावधीसाठी जे कलाकार विनामुल्य कार्यक्रम करणेस तयार असतील त्यांना प्राधान्य देणेत येऊन प्रत्येक दिवशी दोन याप्रमाणे निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम ठेवण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-प्रशासन शाखा, वशी-०५)

---

**विषय न.५४** **कोजागिरी पौर्णिमा उत्सव- २०१२ बाबत.**

**प्रस्ताव-** अध्यक्ष, डॉ.अण्णासाहेब गव्हाणकर साईसेवा ट्रस्ट, कुर्ला, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये सालाबादप्रमाणे सोमवार दि.२९/१०/२०१२ रोजी ८१ वा कोजागिरी पौर्णिमा उत्सव साजरा करण्यास व त्याप्रित्यर्थ खालीलप्रमाणे कार्यक्रम करणेस परवानगी मागीतली आहे.

| अ.नं. | तपशील | संस्थानला करावा लागणारा खर्च |
|---|---|---|
| १ | सोमवार दि.२९/१०/२०१२ रोजी कोजागिरी पौर्णिमा,<br>सायंकाळी ७.०० ते ११.०० पर्यत - साई दरबारात अभंग, भजन , भक्तीगीते, प्रवचन, पारंपारीक लोकगीते साईभक्त सादर करतील.<br>रात्रौ १२.००वा.नंतर मंदिराच्या आवारात मराठी रंगभूमी व चित्रपट क्षेत्रातील नामवंत कलाकारांच्या सोबतीने बहुरंगी, बहुडंगी अशा लोकरंजनाचा कार्यक्रम सादर करणार आहेत.<br>सदर कार्यक्रमाकरीता त्यांनी रंगमंच, प्रकाश, ध्वनी योजना, इत्यादी सुविधा मिळणेस विनंती केलेली आहे.<br>१) ४०x३५ चा सुसज्ज रंगमंच व रंगमंचावर गायक, निवेदक व वाद्यवृंदासाठी माईक व्यवस्था ,स्टेजवर विद्युत व्यवस्था, वेषभुषेसाठी दोन मेकअप रुम असावेत. महिला कलावंताचा मेकअपरुम बंदीस्त असावा तसेच दोन आरसे असावेत.<br>२) रात्रौ १२.०० व २.०० वा. कलावंतांसाठी चहाची व्यवस्था व्हावी.<br>३) कलावंत व साईभक्त मिळून ३०० भक्त मंडळी असुन त्यांचेसाठी- अ) १५ रुम्स व दोन हॉल्स उपलब्ध करुन दयावेत. (ब) भंडा-याचे जेवण बनवण्यासाठी साईप्रसाद इमारतीतील पहिल्या माळयावरील गॅलरी असलेल्या २ खोल्या मिळाव्यात. त्याचे नियमानुसार भाडे भरणेस तयार आहेत.<br>४) भोजनासाठी कलावंतांना व संस्थेच्या सभासदांना भोजनालयाच्या पहिल्या मजल्यावरील हॉलमध्ये जेवणाची परवानगी मिळणे बाबत. | रु.२६,०००/-मात्र स्टेज, मेकअपरुम, व बैठकव्यवस्थेसाठी खर्च. (नियमानुसार विद्युत आकारभरुन घेऊन ) संस्थानमार्फत मोफत.<br><br>सशुल्क निवास व्यवस्था<br><br>सशुल्क भोजन व्यवस्था. |

सुरवातीपासून दरवर्षी स्टेज, मेकअपरुम, बैठकव्यवस्था, ध्वनीक्षेपनव्यवस्था, कलाकारांना चहा इ. संस्थानमार्फत करण्यात येते. तसेच त्यांची नेहमीप्रमाणे सशुल्क भोजन व निवास व्यवस्था व वीज वापर ५ केव्हीपेक्षा जास्त असेल तर वीज पुरवठयाची व्यवस्था सबंधीत अयोजकांनी स्वत: करावयाची आहे. जर वीज वापर ५ केव्हीपेक्षा कमी असेल तर आयोजकाकडून डिपॉझिट म्हणून रक्कम रु.३०००/- भरुन घेणे. मिटरप्रमाणे (महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या चालू आकारानुसार ) वापरलेले वीजेचे बील देऊन डिपॉझिट मधून या बीलाची रक्कम वजा करुन घेऊन राहिलेली रक्कम त्यांना परत करता येईल.

मागील वर्षी सदरचा कार्यक्रम १६ गुंठे जागेत घेण्यात आला होता. कोजागीरी पौर्णिमेस रात्रौ शेजारती नंतर समाधी मंदिर बंद होते. व सदरचा कार्यक्रम रात्रभर असतो त्यामूळे या वर्षी देखील सदर कार्यक्रम १६ गुंठे जागेत घेता येईल.

सालाबादाप्रमाणे डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर साईसेवा ट्रस्ट, कुर्ला, मुंबई यांना उपरोक्त कार्यक्रम करणेस परवानगी देणेबाबत व स्टेज, मेकअप रुम, बैठक व्यवस्था इत्यादीसाठी अंदाजे खर्च रु.२६०००/- खर्चास मान्यता असावी.

सदर कार्यक्रम हा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चा नसून डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर साईसेवा ट्रस्ट, कुर्ला, मुंबई या ट्रस्टमार्फत साजरा केला जातो. तरी स्टेज, मेकअप रुम, बैठक व्यवस्था इ.साठी अंदाजे रुपये २६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८५३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्रशासन शाखा, वशी-०५)

---

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१ हरबरादाळ खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१२ (जुन-२०१२ ते सप्टेंबर-२०१२अखेर) किराणा माल पुरविणेबाबत दि.३०.०५.२०१२ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेत झालेल्या चर्चा वाटाघाटीत मे.संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड यांचे हरबरादाळीचे खालीलप्रमाणे न्युनतम दर मान्य करण्यात येऊन त्यांना वरील नं.१ चे संदर्भीय पत्रान्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

| अ.नं. | मालाचा तपशिल | जात/ प्रकार | मागणी क्विंटल | दर प्रती क्विंटल | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | हरबराडाळ, बिगरपॉलीश | A | २३३० | ५,५४१/- | १,२९,१०,५३०/- |

पुरवठा आदेशानुसार आज अखेर मे.संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड यांनी २७७० क्विंटल हरबरदाळीचा पुरवठा केलेला केलेला आहे. पुरवठा आदेशानुसार एकुण परिमाणाच्या २५% जादा माल पुरविणे पुरवठाधारकांवर बंधनकारक आहे, त्यानुसार मे.संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड यांचेकडून मुळ मागणी २३३० क्विंटल + २५% जादा ५८२.५० = एकुण २,९१२.५० क्विंटल हरबरादाळ पुरविणे बंधनकारक आहे, त्यापैकी २७७० क्विंटल हरबरादाळीचा पुरवठा झालेला आहे, त्यांचेकडून अद्याप २११ क्विंटल हरबरादाळीचा पुरवठा होणे बाकी आहे.

सध्या माहे ऑक्टोबर-२०१२ ते मार्च-२०१३ अखेर सहा महिन्यांसाठी प्रसादालय व कॅन्टीन विभागास आवश्यक किराणा माल खरेदीची प्रक्रिया चालु असून, सदर खरेदीबाबतचा विषय मंजुरीकरिता मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानचे कायदे सल्लागार यांचेमार्फत दाखल करण्यात आलेला आहे. मा.न्यायालयाचे मान्यतेनंतर प्रचलित पद्धतीने खरेदीबाबतची प्रक्रिया सुरु होईल, या संपुर्ण कार्यवाहीस साधरणत: १ महिन्याचा कालावधी लागणे अपेक्षित आहे.

दरम्यानचे काळात प्रसादालयास लाडू प्रसाद बनविणेस हरबरादाळीची आवश्यकता आहे. प्रसादालय विभागाने त्यांचेकडील डी.पी.क्र.११७८ दि.०३.१०.२०१२ अन्वये उत्सवकाळात भक्तांना बुंदीप्रसाद देणेसाठी तसेच लाडूप्रसाद बनविण्यासाठी पुढील एका महिन्यासाठी साधरणत: ७०० क्विंटल हरबरादाळीची आवश्यकता असल्याचे सांगितलेले आहे.

यापैकी सध्याचे मागणीतील २११ क्विंटल हरबरादाळ मे.संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड यांचेकडून मंजुर दराने खरेदी करता येईल.

उर्वरीत ५०० क्विंटल तसेच उत्सव कालावधी असल्याने जादा हरबरादाळीची गरज भसणार असल्याने १०० क्विंटल जादा मागणी करता येईल. वरील ६०० क्विंटल हरबरादाळ खरेदी संदर्भात हरबरादाळीचे पुरवठाधारक मे.संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड यांचेशी दुरध्वनीद्वारे चर्चा केली असता, सध्याचे मंजुर दरात, मंजुर नमुन्याप्रमाणे हरबरादाळ पुरविणे शक्य नसलेबाबत त्यांनी कळविलेले आहे.

तरी माहे ऑक्टोबर-२०१२ ते मार्च-२०१३ अखेर सहा महिन्यांसाठी प्रसादालय व कॅन्टीन विभागाची खरेदी प्रक्रिया पुर्ण होईपावेतो पुढील १ महिन्यासाठी आवश्यक ६०० क्विंटल हरबरादाळ

नियमीत पुरवठाधारकांकडून तातडीची गरज म्हणून नमुने व दरपत्रके मागवून खरेदी करणेस मान्यता मिळणेस विनंती.

सध्या हरबरादाळीचे बाजारभाव रु.६,५००/- मात्र प्रती क्विंटलप्रमाणे आहेत, त्या दराने ६०० क्विंटल हरबरादाळ खरेदीस रक्कम रु.३९,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरची रक्कम ऑक्टो.-१२ ते मार्च-१३ अखेर किराणा मालासाठी असलेले अंदाजपत्रकीय तरतुदीतून खर्च करता येईल.

तरी ६०० क्विंटल हरबरादाळ नियमीत पुरवठाधारकांकडून तातडीची गरज म्हणून नमुने व दरपत्रके मागवून खरेदी करणेस मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.त्रीसदस्य समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे २११ क्विंटल हरबरादाळ मे.संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड यांचेकडून मंजुर दराने खरेदी करणेत यावी.**

**तसेच, जुन-२०१२ ते सप्टेंबर-२०१२ या कालावधीसाठी किराणा माल खरेदी करतेवेळी ज्या निविदाधारकांचे हरबरादाळीचे नमुने निवड करणेत आले होते. त्या निविदाधारकांकडून निवड करण्यात आलेल्या नमुन्यांप्रमाणे हरबरादाळीचे फेरकोटेशन मागणी करुन ६०० क्विंटल हरबरादाळ न्युनतम दराने खरेदी करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग/ विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२** **प्रसादालय व कॅन्टीन विभाग किराणा माल खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दि.०५.०५.२०१२ रोजीचे निर्णयानुसार सन २०१२ चे चार महिन्यांकरिता (जुन-१२ ते सप्टेंबर-१२) प्रसादालय, मंदिर व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा माल व निविदा मागवून खरेदी करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.०५.२०१२ रोजी झालेल्या त्रिसदस्य सभेमध्ये मान्यता दिली आहे. त्यानुसार दि.१२-१३.०५.२०१२ चे वर्तमानपत्रात किराणा माल निविदा विक्रीबाबत जाहिरात प्रसिद्ध निविदा विक्री करणेत आलेली होती.

पात्र निविदाधारकांनी निविदेसोबत पाठविलेले नमुने मा.त्रीसदस्य समितीने गठित केलेल्या तज्ञ समितीने दि.२८.०५.२०१२ रोजी सुयोग्य नमूने निवडले व निवडक नमुन्याच्या निविदाधारकांना दि.३०.०५.२०१२ रोजीचे मा.त्रीसदस्य समिती सभेपुढे चर्चा वाटाघाटीसाठी आमंत्रित करण्यात आले होते. सदर सभेत लिफाफा क्र.१ (मुळ निविदा) उघडण्यात आले. प्रत्येक किराणा मालासाठी पात्र असलेल्या नमून्यांच्या सर्व निविदाधारकांना दरांबाबत चर्चा वाटाघाटीसाठी एकत्र बोलवून सर्वासमक्ष उपस्थित निविदाधारकांशी किराणा मालाचे दरांबाबत चर्चा वाटाघाटी करण्यात येऊन त्यांनी निविदेमध्ये भरलेल्या दरामध्ये सुट देण्यास सांगण्यात आले होते. दिलेल्या दरांमधून न्युनतम दर स्विकारण्यात येऊन सबंधीत पुरवठाधारकांना माहे जुन-२०१२ ते सप्टेंबर-२०१२ अखेर किराणा माल पुरविणेकामी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

पुरवठा आदेशानुसार सर्व पुरवठाधारकांकडून मालाचा पुरवठा नियमीत चालु आहे. पुरवठाधारकांना माल पुरविण्याकामी दिलेली मुदत (सप्टेंबर-२०१२) संपलेली आहे, तसेच बहुतांशी पुरवठाधारकांकडून एकुण परिमाणाच्या २५% जादा मालाचा पुरवठा देखील झालेला आहे.

सध्या माहे ऑक्टोबर-२०१२ ते मार्च-२०१३ अखेर सहा महिन्यांसाठी प्रसादालय व कॅन्टीन विभागास आवश्यक किराणा माल खरेदीची प्रक्रिया चालु असून, सदर खरेदीबाबतचा विषय मंजुरीकरिता मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानचे कायदे सल्लागार यांचेमार्फत दाखल करण्यात आलेला आहे. मा.न्यायालयाचे मान्यतेनंतर प्रचलित पद्धतीने खरेदीबाबतची प्रक्रिया सुरु होईल, या संपुर्ण कार्यवाही साधरणतः १ महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे.

त्यामुळे पुढील सहा महिन्यांची किराण माल खरेदी प्रक्रिया पुर्ण होईपावेतो प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा माला अभावी साईभक्तांना भोजनप्रसाद, लाडूप्रसाद, चहा, कॉफी व दुध इ.सुविधा देण्यास अडचण निर्माण होऊ नये म्हणून, जे पुरवठाधारक मागील मंजुर दरामध्ये (२५% जादा माला व्यतिरिक्त) किराणा माल देण्यास तयार आहेत, त्यांचेकडून मागील मंजुर दराने माल खरेदी करता येईल, तसेच ज्या पुरवठाधारकांचा पुरवठा (जादा २५% सह) पुर्ण झालेला आहे व ते पुरवठाधारक मागील मंजुर दराने माल पुरविण्यास असमर्थता दर्शवितील असा माल नियमीत पुरवठाधारकांकडून दरपत्रके घेऊन, न्युनतम दर धारकाकडून खरेदी करता येईल.

तरी माहे ऑक्टोबर - २०१२ ते मार्च-२०१३ अखेर प्रसादालय व कॅन्टीन किराणा माल खरेदीची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत जे पुरवठाधारक मागील मंजुर दरामध्ये किराणा माल देण्यास तयार आहेत, त्यांचेकडून मागील मंजुर दराने माल खरेदी करणेस, तसेच ज्या पुरवठाधारकांचा पुरवठा पुर्ण

(२५% सह) झालेला आहे व ते पुरवठाधारक मागील मंजुर दराने माल पुरविण्यास असमर्थता दर्शवितील असा माल नियमीत पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागवून, न्युनतम दर धारक यांचेकडून खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव मा. त्रीसदस्य समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८५५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरचे खरेदीबाबत परवानगीसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठापुढे संस्थानचे वकीलामार्फत अर्ज सादर करावा, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग/ विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ 'साई आश्रम' भक्तनिवास प्रकल्पाचे नियोजीत उद्घाटन समारंभाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईंचे दर्शनार्थ येणाऱ्या साईभक्तांसाठी संस्थानतर्फे दर्शन, निवास, प्रसाद भोजन इत्यादी सुविधा उपलब्ध करण्यात येतात. तथापी शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांच्या गर्दीत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने सध्याची निवासव्यवस्था अपुरी पडत आहे. त्यासाठी साईभक्तांना शिर्डी येथे आल्यानंतर निवासाची व्यवस्था सहजरित्या विनविलंब उपलब्ध व्हावी याकरीता नविन भक्तनिवास इमारतींचे बांधकाम करणे संस्थान व्यवस्थापन समितीचे विचाराधीन होते.

दानशूर साईभक्त मा.श्री. के.व्ही.रमणी संस्थापक-तथा-कार्यकारी विश्वस्त शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी दि.२४/११/२००५ चे पत्राव्दारे साईभक्तांसाठी भक्तनिवास इमारतींचे बांधकाम त्यांचे ट्रस्टतर्फे देणगीदाखल करुन देणेची तयारी असलेबाबतचा प्रस्ताव संस्थानकडे सादर केला होता. त्यावर दि.१८/१२/२००५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.७८३ अन्वये संस्थानतर्फे जागा उपलब्ध करुन देणे व बांधकामाचा सर्व खर्च शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी करणे यासाठी आवश्यक करारनामा करुन घेण्यात यावा असे ठरले. त्यानुसार संस्थान व शिर्डी साई साई ट्रस्ट, चेन्नई यांचे दरम्यान दि.०४/०२/२००६ रोजी करारनामा (MOU) करण्यात आला आहे. त्यानुसार " साई आश्रम" या भक्तनिवास प्रकल्पातील इमारतींचे बांधकाम शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी पूर्ण केले आहे. तसेच संस्थानतर्फे करण्यात येत असलेले परिसर विकासाचे कामही आता पूर्णत्वाचे टप्प्यावर आहे.

यापैकी साई आश्रम भाग-१ चे बांधकाम मौजे शिर्डी येथिल संस्थान मालकीचे सर्व्हे नं. १०७,१०८,१०९ पै. मधिल ५ हे ८० आर १७ चौ.मी. क्षेत्रफळाचे भूखंडावर करण्यात आलेले आहे. त्यामधिल एकूण १२ निवासी इमारतींमधिल १५३६ खोल्यांची निवास क्षमता ६१४४ व्यक्ती इतकी आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

**<u>SAI ASHRAM PACKAGE – I:</u>**

| Sr. No. | Block Details | No. Of Blocks | No. of Rooms per Block | Total No. Of Rooms | Builtup Area (Sqm) | | | | Total Builtup Area (Sqm) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | G. F | F. F | S. F | T. F | |
| 01 | A-Block (IWC) | 05 | 128 | 640 | 1150.64 | 1111.00 | 1111.00 | 1111.00 | 22418.20 |
| 02 | A-Block (EWC) | 07 | 128 | 896 | 1160.34 | 1120.70 | 1120.70 | 1120.70 | 31657.08 |
| 03 | R-Block | 01 | -- | -- | 1342.02 | 1128.00 | -- | -- | 2470.02 |
| 04 | OAT | 01 | -- | -- | 2411.00 | -- | -- | -- | 2411.00 |
| 05 | D.G.Room | 01 | -- | -- | 320.75 | | | | 320.75 |
| | | Total Rooms | | 1536 | | Total Builtup Area (Sqm) | | | 59277.05 |

साई आश्रम भाग-२ चे बांधकाम मौजे निमगांव कोऱ्हाळे येथिल संस्थान मालकीचे गट नं. १७२ मधिल ६ हे ७९ आर क्षेत्राचे भूखंडावर करण्यात आलेले आहे. त्यामधिल एकूण ०६ निवासी इमारतींमधिल १९२ हॉल्सची निवासक्षमता ३४५६ व्यक्ती इतकी आहे. त्याचा तपशिल खालिलप्रमाणे

**SAI ASHRAM PACKAGE – II:**

| Sr. No. | Block Details | No. Of Blocks | No. of Halls per Block | Total No. Of Halls | Builtup Area (Sqm) | | | | Total Builtup Area (Sqm) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | G. F | F. F | S. F | T. F | |
| 01 | B- Block | 06 | 32 | 192 | 1177.89 | 1131.35 | 1131.35 | 1131.35 | 27431.64 |
| 02 | R -Block | 01 | -- | -- | 1342.02 | 1128.00 | -- | -- | 2470.02 |
| 03 | D.G.Room | 01 | -- | -- | 320.75 | | | | 320.75 |
| | | Total Halls | | 192 | Total Builtup Area (Sqm) | | | | 30222.41 |

वरीलप्रमाणे 'साई आश्रम ' प्रकल्प सुमारे एका महिन्याचे कालावधीत पूर्ण करुन प्रकल्पाचा उद्घाटन समारंभ मान्यवर व्यक्तीच्या हस्ते आयोजीत करण्याचे विचाराधीन आहे.

सदरहू उद्घाटन समारंभासाठी अपेक्षित खर्चाचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | रक्कम (रु. लाखात) |
|---|---|---|
| ०१ | मंडप, स्टेज, बॅरीकेडींग, स्वागत कमानी उभारणे | ७.०० |
| ०२ | विद्युत रोषणाई व पुष्पसजावट खर्च | २.०० |
| ०३ | निमंत्रण पत्रिका, माहितीपत्रके छपाई फ्लेक्स बोर्ड, बॅनर्स तयार करणे | १.०० |
| ०४ | इतन अनुषंगिक बाबींसाठी येणारा खर्च<br>(मान्यवरांचे सत्कार, कलाकार, नाष्टा - जेवण इ.) | २.०० |
| | **एकूण अपेक्षित अंदाजे खर्च :-** | **रु. १२.०० लक्ष** |

तरी वरीलप्रमाणे उद्घाटन समारंभ पूर्वतयारी करणेस व वरीलप्रमाणे अपेक्षित अंदाजे खर्चास मान्यता मिळणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.८५६ यावर सविस्तर चर्चा होऊन, 'साई आश्रम' भक्तनिवास प्रकल्पाचे उद्घाटन समारंभाची पूर्वतयारी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४. विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.८५७** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**(१)** श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयांमध्ये सर्प दंश किंवा कुत्र्यांचा दंश झालेल्या रुग्णांना यापुढे मोफत वैद्यकिय सेवा पुरविण्यात याव्यात. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

**(२)** मंदिरातील पुजारी व चोपदार यांना कपडे बदलणेसाठी व विश्रांती घेण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी. (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

**(३)** सद्याचे प्राप्त परिस्थितीत काळाची गरज म्हणून श्री साईबाबांचे मंदिर व मंदिर परिसराचे संरक्षणासाठी C.I.S.F. चे डायरेक्टर जनरल यांचेशी पत्रव्यवहार करुन, त्यांचेमार्फत संस्थानसाठी संरक्षण यंत्रणा शक्य तेवढया लवकर कार्यान्वीत करणेबाबत कार्यवाही करणेत यावी.

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

**(४)** अहमदनगर, नाशिक जिल्हयातील अंध, अपंग, मतिमंद, मुकबधिर तसेच धार्मिक शिक्षण संस्था/ शाळा, वृध्दाश्रम, अनाथाश्रम अशा नोंदणीकृत असलेल्या संस्थांनी संस्थानकडे भोजन प्रसाद मागणी केल्यास व संस्थानचे श्री साईप्रसादालयातुन स्वतः भोजन प्रसाद घेऊन जाण्याचे योजल्यास, त्यांना प्रसादालय विभागाचे अन्नदान कक्षामार्फत मोफत भोजन देण्यात यावे.

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

वरील निर्णय क्र. ८०० ते ८५७ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्रौ ०९.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (किशोर मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी